सोलापूर तरुण भारत
आसमंत



**छत्रपती शिवाजी महाराज हे उभ्या महाराष्ट्राचे दैवत आहेत. आजही हे नाव मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवते. या जाणत्या राजाने विविध निर्णय घेत क्रांती घडवून आणल्याचे पाहायला मिळते. कृषी, लष्कर, समाज, संरक्षण, संस्कृती, भाषा आदी विषयांमध्ये त्यांनी घडवलेले बदल मूलगामी परिणाम करणारे ठरले आणि बघता बघता सर्वसामान्य माणूस स्वराज्याशी जोडला गेला. अशा या स्वराज्यरक्षकाला १९ फेब्रुवारी रोजी असलेल्या जयंतीनिमित्त मानाचा मुजरा.**

# क्रांतीकारी शिवराय

निमित्त

पांडुरंग बलकवडे
प्रख्यात इतिहास अभ्यासक

छत्रपती शिवाजी महाराजांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वातील नानाविध पैलू आपण जाणतो. जयंतीनिमित्त क्रांतिकारी शिवराय हा विचार उलगडून दाखवण्याजोगा ठरतो. आपल्या जीवितकाळात त्यांनी घडवून आणलेल्या विविध क्षेत्रातील क्रांती हा केवळ औत्सुक्याचाच नव्हे, तर अभ्यासाचा विषय आहे. सर्वप्रथम आपण त्यांच्या कृषी क्रांतीबाबत जाणून घेऊ...

शहाजीराजांच्या जहागिरीचे कारभारी म्हणून राजांनी वयाच्या पंधराव्या-सोळाव्या वर्षी काम पाहण्यास सुरुवात केली आणि उद्ध्वस्त झालेली जहागिरी पुनर्वसाहत करण्याचे काम केले. त्यांनी कृषी क्रांतीच्या माध्यमातून अर्थक्रांतीही केली. शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे उत्पन्न वाढते तेव्हा आपोआपच राज्याचे उत्पन्न वाढते हे राजे जाणून होते. त्यामुळे राजांनी त्यास प्राधान्य दिले. अशा प्रकारे समाज संपन्न झाल्यामुळे सामाजिक क्रांतीला पोषक वातावरण निर्माण झाले आणि ही क्रांती घडली.

राज्यातील प्रत्येक वर्गातील हाताला काम मिळाल्यामुळे तो संपन्न झाला आणि परस्परांमधील दरी कमी झाली. म्हणूनच ही सामाजिक क्रांतीही महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल. समाज समरस होतो तेव्हा त्या एकसंध समाजात राष्ट्रवाद निर्माण होणे अजिबात कठीण नसते. राज्यांच्या कालखंडापूर्वी इथे विविध सत्तांचे अधिपत्य होते. त्यांच्याकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचाराने जनता त्रासली होती. पण प्रभू श्री रामचंद्रासारखा शिवाजी नावाचा एक राजा राज्य करतो आहे आणि त्याच्यामुळे आपण सुखी झालो आहोत, हे सुख शाश्वत टिकावे या हेतूने राष्ट्रवादाची मुख्य भूमिका जनतेने स्वीकारली आणि हे राष्ट्र माझ्यासाठी आहे, हा विचार मनामनात बिंबला. हा राजा माझ्या सुखासाठी काम करतो ही भावना जनतेच्या मनात निर्माण झाली.

सर्वसामान्य नागरिक असा विचार करतो तेव्हा राजा आणि राज्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाला आपली वाटते. या कल्पनेतूनच सामान्य जनता शिवाजी राजा आणि स्वराज्याच्या रक्षणाला सिद्ध झाली. अनेक वर्षे या देशात अशी कल्पनाच जन्माला आली नव्हती. स्वयंप्रेरणेने सामान्य मनुष्य राजाच्या आणि त्याच्या राज्याच्या रक्षणाला सिद्ध झाल्याचे पूर्वी कधीच दिसले नव्हते. म्हणूनच मी याला महाराजांनी जगात निर्माण केलेला एक नवा राष्ट्रवाद असे म्हणतो. या राष्ट्रवादाचा परिणाम असा की, राजांपश्चात राजा राज्यात नव्हता, कोणतीही व्यवस्था नव्हती, पण तरीदेखील सामान्य जनता तत्कालिन जगातील सर्वात बलाढ्य सत्ताकेंद्र असणाऱ्या औरंगजेबाशी लढण्यास सज्ज होती. अशी स्थिती असते तेव्हा त्या साम्राज्याला जगातील कोणतीही शक्ती पराभूत करू शकत नाही. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या राष्ट्रवादाचे हे सर्वात मोठे परिमाण आहे, असे वाटते.

शिवाजी महाराजांचे स्वराज्य इतक्या मोठ्या प्रमाणावर कसे वाढले, यामागील कारणांचा विचार करतानाही काही मुद्दे लक्षात येतात. आधी सांगितल्याप्रमाणे शिवाजी राजांनी जनतेसाठी सुराज्य आणि स्वराज्य निर्माण केले आणि अवघ्या काही तालुक्यांच्या जवळ राहणारे लोक, प्रजा आपल्याही भागात असेच सुख, समृद्धी, शांतता, सुरक्षितता यावी अशी अपेक्षा धरू लागले. साहजिकच ही परिस्थिती शिवाजी महाराजांना स्वराज्यविस्तार करण्यास अनुकूल ठरत गेली. त्यांनी आदिलशाही, मुघलशाही, कुतुबशाही अशा सत्तांवर आक्रमणे केली तेव्हा त्या त्या राज्यातील प्रजा अन्यायकारी सत्ताधीशांना साथ न देता शिवाजीराजांचे स्वागत करत होती. म्हणूनच अतिक्रमणकर्त्यांचे स्वागत करणाऱ्या या घटना सर्वार्थाने अनोख्या म्हणाव्या लागतील. अगदी तळागाळातील समाजाने शिवरायांचे स्वागत केल्याचे, साथ दिल्याचे इतिहास सांगतो तेव्हा इतक्या वेगाने शिवरायांच्या साम्राज्याचा विस्तार होण्यामागील रहस्य समजते. जनतेच्या उत्स्फूर्त सहभागाखेरीज हे शक्यच झाले नसते. मुद्रेत उल्लेखित केल्याप्रमाणे प्रतिपदेच्या चंद्रापासून पौर्णिमेच्या चंद्रापर्यंत हे राज्य वाढत जाणार असल्याची कल्पना प्रत्यक्षात येण्यास ही बाब कारणीभूत आहे, हे समजून घ्यावे लागेल. स्वराज्य विस्तारण्यास मी राज्यक्रांती म्हणतो. यातूनच हिंदवी स्वराज्य उभे राहिले.

एकदा स्वराज्य उभे राहिले की शत्रूशी संघर्ष होणे साहजिकच होते. अशा प्रकारे शत्रूचे प्रदेश जिंकून घेत असताना त्यांचा आदिलशाह, कुतुबशाह आदींशी संघर्ष झालाच. पण तो विषम संघर्ष होता. एकीकडे पाच-दहा हजार तर एका बाजूला लाखोंचे सैन्य असे स्वरूप होते. मात्र, इतक्या विषम संघर्षातही छोटा गट विजयी झाल्याचे जगात कधीच कुठे दिसले नाही. अर्थातच हे घडवून आणण्यामागे शिवाजी राजांची लष्करी विचारांमधील क्रांती कारणीभूत होती. याद्वारे त्यांनी युद्धशास्त्रातही क्रांती घडवली. त्यानुसार त्यांनी गनिमी कावा स्वीकारला आणि कमीत कमी मनुष्यबळ, कमीत कमी साधनसामग्री, कमीत कमी पैसा यासह कसे यशस्वी व्हायचे याचे उदाहरण जगाला दाखवून दिले. जणू आधुनिक युद्धशास्त्रच त्यांनी विकसित केले. हिंदू धर्मानुसार परंपरागत युद्धशास्त्रामध्ये आपण धर्मयुद्ध खेळत होतो. शत्रूने आव्हान दिले तर त्यास प्रतिसाद देणे, हे क्षत्रियाचे कर्तव्य असल्याचे मानत होतो. मात्र, राजांसमोरचा शत्रू सावध आणि सशक्त होता तर आपण बेसावध होतो आणि शक्ती कमी होती. असे असताना केवळ शत्रूने आव्हान दिले म्हणून दहा हजार विरुद्ध एक हजार अशा बलानिशी त्याच्याशी लढले तर दुबळ्यांचा पराभव होणार हे ठरलेले सूत्र आहे. म्हणूनच याचा अभ्यास करून महाराजांनी शत्रूने आव्हान दिल्यामुळे नव्हे, तर मी माझ्या अनुकूल भूमीवर आणि अनुकूल वेळीच लढणार, हा नवा विचार मांडला आणि त्यानुसारच कृती केली. यातूनही विजयासाठी लढण्याची त्यांची भूमिका स्पष्ट होते. पूर्वी भारतावर झालेल्या परकीय आक्रमणांचा सामना करताना आपण कर्तव्याच्या भावनेतून लढलो होतो. म्हणूनच आपण सतत पराभूत होत होतो. मात्र, जगाचा इतिहास बघता रानटी समाजाने सुसंस्कृत समाजावर नेहमीच लष्करी विजय मिळवलेला असल्याचे दिसते. सुसंस्कृत माणूस अहिंसक बनत जात असल्याचे बरेचदा दिसते. ही परिस्थिती बदलण्यासाठी, सर्वसामान्यांना भयमुक्त करण्याचे ठरवून महाराजांनी संघटितरीत्या मुकाबला करण्याचे धडे दिले. थोडक्यात, महाराजांच्या यशामागे त्यांच्या या विचारांचे योगदानही खूप मोठे आहे. एक प्रकारे आपण याला मानसशास्त्रीय युद्धशास्त्रही म्हणू शकतो. आज आधुनिक युगात ही संकल्पना शिकवली, राबवली जाते, अंगिकारली जाते. मात्र, शिवाजी महाराजांनी पूर्वीच तिचा यशस्वीरीत्या वापर केल्याचे आपल्याला बघायला मिळते. शिवरायांनी अफझलखानाला प्रतापगडाच्या पायथ्याशी येण्यास भाग पाडले. तिथेही शत्रूचा अभ्यास करण्याच्या त्यांच्यातील वैशिष्ट्याचा परिचय घडतो. शत्रूचे बलस्थान आणि दुर्बलस्थान या दोहोंचाही अभ्यास करणे हे गनिमी काव्याचे एक महत्त्वाचे अंग आहे. शिवरायांनी हे सूत्र नेमकेपणाने पाळले. यायोगेही त्यांनी युद्धशास्त्रात महाक्रांती घडवून आणली. शत्रू बेसावध असताना अचानक छापा घालून त्याचा बीमोड करण्याचे तंत्र त्यांनी आत्मसात केले. हे सगळे अभ्यासल्यानंतर त्यांनी घडवून आणलेली सांस्कृतिक क्रांतीदेखील अभ्यासावी लागेल. पूर्वी हा देश अनेक धर्मांध, परकीय शक्तींच्या ताब्यात होता. त्यांनी भारतीय हिंदू संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांची श्रद्धास्थाने नष्ट करण्याचा चंग बांधला होता. मंदिरे तोडली होती. सर्वसामान्यांवर अन्याय, अत्याचार करून आपला धर्म लादण्याचे कुकर्म त्यांनी केले होते. मात्र, शिवाजी महाराजांनी हिंदू समाजाला संवर्धनाद्वारे शक्ती दिली आणि त्यासाठी पहिली गोष्ट केली ती म्हणजे मंदिरे पाडून बांधलेल्या मशिदी त्यांनी पाडल्या आणि तिथे पुन्हा मंदिरांची उभारणी केली. यातून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आणि मशिद बांधण्यासाठी मंदिर पाडावे लागत नाही, हा स्पष्ट संकेतही दिला. (पान ४ वर)



# द्विपक्षीय सहकार्य वाढविण्यावर भर

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अमेरिका दौऱ्याचे फलित

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच फ्रान्स आणि अमेरिकेचा दौरा केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर अवघ्या महिन्याभरात हा दौरा पार पडला आहे. तसेच फ्रान्समध्येही 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' परिषदेला मोदींनी संबोधित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात यावेळी झालेल्या द्विपक्षीय बैठकीत अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. तसेच अनेक क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावरही भर देण्यात आला. दरम्यान, काही महत्वाच्या गोष्टींवर चर्चा आणि करार करण्यात आले आहेत. जे करार दोन्ही देशाच्या प्रगतीसाठी महत्वपूर्ण ठरणार आहेत.**



लक्ष्यवेध

प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ऐतिहासिक फ्रान्स आणि अमेरिका दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष होते. नरेंद्र मोदींनी दोन्ही देशांना यापूर्वीही अनेकदा भेटी दिल्या आहेत. १४ जुलै २०२३ रोजी फ्रान्सच्या राष्ट्रीय दिनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर २६ जानेवारी २०२४ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाला फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अमेरिकेच्या बाबतीत बोलायचे, तर 'कोविड १९' कालखंडाचा अपवाद वगळता, जवळपास प्रत्येक वर्षी नरेंद्र मोदींनी अमेरिकेला भेट दिली आहे. डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा आणि मोठ्या बहुमतासह अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर नरेंद्र मोदींची ही पहिलीच भेट होती. शपथविधीनंतर ट्रम्प यांनी आमंत्रित केलेल्या पहिल्या काही नेत्यांमध्ये मोदींचा समावेश आहे. अध्यक्ष झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी वादग्रस्त निर्णय घेण्याचा सपाटा लावला असून, त्यांचा तडाखा संपूर्ण जगाला बसला आहे. भारतही त्याला अपवाद नसला, तरी ट्रम्प यांनी अमेरिकेच्या परराष्ट्र तसेच संरक्षण धोरणात आमूलाग्र बदल केले असून, त्यांचा भारताला मोठा फायदा होणार आहे. या दौऱ्यात भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय भागीदारीची सखोल चर्चा झाली. तसेच भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडोर'वरही मुक्त चर्चाही या दौऱ्यात झाली आहे. या चर्चेत संरक्षण सहकार्य, व्यापार संबंध आणि दक्षिण आशियातील राजकीय उलथापालथ आणि भारत-अमेरिकेचे हितसंबंध, हे विषयही चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. याला पार्श्वभूमी आहे ती चीन आणि इराणमधील ४०० अब्ज डॉलर्सच्या, मोठ्या धोरणात्मक भागीदारीची. या भागीदारीमध्ये ऊर्जा, व्यापार आणि लष्करी क्षेत्रातले सहकार्य समाविष्ट आहे. बैठकीदरम्यान रशिया-युक्रेन युद्धावरही चर्चा झाली असून, ते संपवण्यासाठीच्या उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली आहे. या दौऱ्यात महत्त्वाच्या अनेक विषयावर करार देखील करण्यात आले.

### एफ-३५ जेट्स आणि लष्करी सामग्री-

संरक्षण क्षेत्रात भारत आणि अमेरिकेत मोठा करार झाला आहे. या करारानुसार, अमेरिका आता भारताला F35 स्टेल्थ लढाऊ विमान पुरवणार आहे. याबद्दल अध्यक्ष ट्रम्प यांनी, यावर्षीच ते भारतासोबतच्या लष्करी विक्रीत लक्षणीय वाढ करणार आहेत. याशिवाय, आम्ही आता भारताला F35 स्टेल्थ लढाऊ विमाने देऊ. अशी घोषणा केली.

### ट्रम्प आयएमईसीसाठी तयार-

पश्चिम आशियातील संघर्षाचा, 'आयएमईसी'ला साहजिकच फटका बसत होता. मात्र, ट्रम्प पुन्हा एकदा अमेरिकेच्या अध्यक्षपदी आल्यानंतर, 'आयएमईसी'च्या मार्गातील अडथळे दूर होण्याचा शक्यता निर्माण झाली आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे, गाझामधील युद्धबंदी आणि तीन ओलिसांच्या सुटकेनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा केली आहे की, सौदी अरेबियादेखील लवकरच 'अब्राहम करारा'त सामील होईल. हा तोच करार आहे, ज्यानंतर इस्रायलचे 'युएई' आणि इतर अरब देशांशी असलेले संबंध सामान्य झाले. सौदी अरेबियाने अद्याप इस्रायलला मान्यता दिलेली नाही. जर सौदी अरेबिया आणि इस्रायलमधील संबंध सामान्य झाले, तर त्याचा फायदा भारतालाही होईल. यामुळे 'आयएमईसी'ची उभारणीदेखील सुनिश्चित होईल. अमेरिका भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉरसाठी तयार आहे. खरं तर, हा एक असा कॉरिडॉर आहे. ज्याद्वारे शिया, अरबी आखात आणि युरोपमधील आर्थिक एकात्मता आणि कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळू शकते. याशिवाय, या मार्गाने आर्थिक वाढ देखील होण्यास मदत होणार असल्याचे तज्ञांचे मत आहे. या कॉरिडॉरकडे चीनच्या रोड अँड बेल्ट प्रोजेक्टला विरोध म्हणून पाहिले जात असल्याने त्याचे महत्त्व वाढते.

कोरोना महामारीनंतर जागतिक पुरवठासाखळी हा विषय, केंद्रस्थानी आला आहे. जगातील प्रत्येक देश पर्यायी पुरवठासाखळीचा विचार करत असून, भारताने २०२३ सालापासूनच यामध्ये विशेष पुढाकार घेतला होता. भारतात झालेल्या 'जी२०' शिखर परिषदेमध्ये 'आयएमईसी'वर शिक्कामोर्तब झाले होते. सौदी अरेबिया, युरोपियन युनियन, भारत, संयुक्त अरब अमिराती, फ्रान्स, जर्मनी, इटली आणि अमेरिका यांच्यामध्ये, सामंजस्य करार झाला होता. 'आयएमईसी'अंतर्गत दोन स्वतंत्र कॉरिडोर प्रस्तावित आहेत. पूर्व कॉरिडॉर जो भारताला अरबी आखाताशी जोडेल आणि उत्तर कॉरिडॉर अरबी आखाताला युरोपशी जोडेल. (पान ४ वर)



# बॉर्डर सिक्युरिटी फोर्स

## भारत-बांगलादेश सीमेचे रक्षण कसे करते?

राष्ट्रक्षा

ब्रि. हेमंत महाजन

भ्र. ९०९६७०१२५३

पाच-सहा कोटी बांगलादेशी भारतात घुसले आहेत आणि त्याकरिता अर्धसैनिक दल बीएसएफ जबाबदार आहे. प्रत्येक बटालियन १० ते १२ बीओपींवर सीमेवर तैनात करते. अशा सीमेवर ७१४ बीओपीज आहेत. प्रत्येक बीओपीमधील अंतर साडेतीन ते साडेसहा किलोमीटर इतके असते. बीओपीमधील भागावर ऑब्झर्व्हेशन पोस्ट किंवा पेट्रोलिंग (गस्त) करून लक्ष ठेवले जाते. रात्रीच्या वेळी बीओपीचे जवान सीमेवर घात लावायचा प्रयत्न करतात.

**सीमा सुरक्षेकरिता बीएसएफचे अधिकार:** सीमेवर असलेल्या बीएसएफकडे अत्यंत मर्यादित अधिकार आहेत. बीएसएफने पकडलेल्या स्मगलर्स/तस्करांना, अपराध्यांना, घुसखोरांना राज्य पोलिसांकडे द्यावे लागते आणि मतपेटीच्या राजकारणामुळे राज्य पोलिस अशा पकडल्या गेलेल्या घुसखोरांना काही काळातच सोडतात. स्वत: बीएसएफ त्यांच्याविरुद्ध खटला चालवू शकत नाही. सीमेवर तस्करी हे मोठ्या प्रमाणावर सुरू असते. या तस्करीमध्ये पशूंची तस्करी, खोट्या नोटा, भारतीय नाणी, हत्यारे, दारूगोळा, मादक पदार्थ यांसह इतर अनेक दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या वस्तूंची तस्करी चालू असते. याखेरीज कोळसा, लाकूड, सरकारी धान्य, केरोसिन यांचीही तस्करी मोठ्या प्रमाणावर सुरू असते.

**सीमेची सच्छिद्रता (Porous Border) :** जिथे गस्त घालणे अवघड असते अशा नदी तीरांवरील आणि जंगलांतील क्षेत्रे तर या समस्येत भर घालतात. निवडणुकांकरिता आणि इतरही कारणांस्तव सीमा सुरक्षा दले इथून काढून घेतल्यास घुसखोरी सोपी होते.

**सीमा भागातील लोकांची निष्क्रिय/बेदखल प्रवृत्ती :** काही सीमावर्ती भागांतील भारताकडील लोकसंख्येची घनता दर वर्ग किलोमीटरला सुमारे ७००-८०० व्यक्ती इतकी असते तर त्याच ठिकाणच्या बांगलादेशाकडील बाजूची लोकसंख्या-घनता दर वर्ग किलोमीटरला सुमारे १,००० व्यक्ती इतकी असते. लोकसंख्येची एवढी अतिघनता आणि सच्छिद्र सीमा, शोधकार्यात आणि गुन्हेगारांना पकडण्यात अडचणी उपस्थित करतात. कारण अटक टाळण्याकरिता दुसऱ्या बाजूस पळून जाण्याचा पर्याय त्यांना उपलब्ध असतो. काही गावे तर सीमेच्या इतकी जवळ वसलेली आहेत की, घुसखोरीमुळे तिथली लोकसंख्या-घनता, देशातील लोकसंख्या-घनतेच्या मानाने खूप जास्त झालेली आहे. दक्षिण बंगालातील सुमारे १८७ गावे सीमेपासून १५० यार्डांच्या आतच वसलेली आहेत.

**बांगलादेशी नागरिकांना परत मूळदेशी घालवून देणे:** पकडण्यात आलेले बांगलादेशी नागरिक बांगलादेशात परत पाठवावे लागतात. अनेकदा बांगलादेश रायफल्सकडून त्यांचेबाबत काहीच प्रतिसाद मिळत नाही. पकडलेल्या बांगलादेशी नागरिकांना मग ठेवून घ्यावे लागते आणि पोसतही राहावे लागते. यामुळे गंभीर स्वरूपाच्या प्रशासकीय समस्या निर्माण होत असतात.

**कुंपणाच्या मानवविहीन/अनारक्षित फटी:** भारतबांगलादेश सीमेवर कुंपण घालण्यामागचे प्राथमिक उद्दिष्ट गुन्हेगारांचा ओघ थांबविण्याचा, तस्करी रोखण्याचा आणि सीमावर्ती भागातील नागरिकांना सुरक्षितता पुरविण्याचा होता. मात्र, कुंपण पूर्ण झालेले नसल्याने त्यात रुंद फटी अस्तित्वात आहेत. भूसंपादनातील संथ प्रगती, स्थानिकांचा विरोध, प्रकल्प संकल्पनेतील त्रुटी आणि गांभीर्याचा अभाव यामुळे असे घडत आहे. कुंपण काही स्वत:हून अडथळा ठरत नाही. उत्साही गस्त तसेच २४ तास लक्ष असेल तरच ते प्रभावी ठरू शकते. कठीण भूप्रदेश, खराब हवामान स्थिती, घनदाट वने आणि सीमा भागातील लोकांच्या चालीरीती विचारात न घेता केलेली कुंपणाची बांधणी/जुळणी यामुळे वारंवार कुंपणाचा भंग होत असतो. सीमेच्या सुरक्षेकरिता तैनात केलेले सीमा सुरक्षा दल सीमेवर खूप लांबवर पसरवले तर विस्तृत मानवविहीन/अनारक्षित फटी निर्माण होतात, ज्यांचा लाभ गुन्हेगार उठवतात.

**काटेरी कुंपण तोडले जाणे :** घुसखोर/तस्करांनी त्यांच्या कारवायांना अडथळा करणाऱ्या सुरक्षा दलांना हाताळण्याचे अतिशय मौलिक उपाय शोधून काढले आहेत. ते काटेरी कुंपण काही ठिकाणी कापतात. लांबलचक काटेरी कुंपण काही ठिकाणी, सुरक्षा दलांच्या थेट निगराणीखाली नसलेल्या निर्मनुष्य भागांतूनही ते जात असते आणि काटेरी तारेचे कुंपण कापले गेल्यास सुरक्षा दलांवर कारवाई केली जाते. यामुळे सुरक्षा दलांना एकतर तस्करांशी जुळवून घ्यावे लागते किंवा कर्तव्यात कुचराई केल्याखातरच्या कारवाईस तोंड द्यावे लागते.

**गुन्हेगार-प्रशासन-पोलिस यांच्यातील संगनमत :** सीमावर्ती भागांत सीमापारची गुन्हेगारी; गुन्हेगार-प्रशासनपोलिस या त्रयींतील संगनमताचे आधारे फोफावत असते. अनधिकृत स्थलांतरित भारतात प्रवेश करण्यापूर्वीच काही महत्त्वाची कागदपत्रे जसे की रेशनकार्ड, गॅस कनेक्शनपत्र इत्यादी तयार करून त्यांच्या सुपूर्द केली गेलेली असतात; ज्यामुळे ते भारतीय नागरिक असल्याचे भासवले जाते आणि सीमेवर घेतल्या जाणाऱ्या शोधातून ते सुटू शकतात. अशा अनधिकृत स्थलांतरितांना मग देशाच्या कुठल्याही भागात पोहोचण्यास मदत केली जाते. अशा प्रकारच्या संगनमताचे एक ठळक उदाहरण, भारतातून तस्करीने बांगलादेशात नेली जाणारी गुरे, बांगलादेश सीमेपर्यंत पार मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, ओडिशा इत्यादी राज्यांतून आलेली असतात. नकली कागदपत्रांच्या आधारे आणि संबंधित तपास चौक्यांवरील कर्मचाऱ्यांना लाच देऊन हे साधले जात असते.

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे साखर, गहू, तांदूळ तस्करीने सीमापार :** भारताच्या बाजूच्या सीमा भागात सार्वजनिक वितरण व्यवस्था आहे; जिच्याद्वारे साखर, गहू, तांदूळ इत्यादी वस्तू गावकऱ्यांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्या जातात. सार्वजनिक वितरण व्यवस्थेची दुकाने सीमेपासून दूर आतल्या भागांत असतात. गावकऱ्यांना या वस्तू मात्र गावातील लोकसंख्येनुसार एकतर गोदामांतून किंवा स्थानिक विक्रेत्यांकरवी सीमेनजीकच्या गावांत आणून विकल्या जात असतात. वाहतूक करणाऱ्या विक्रेत्यास सीमा सुरक्षा दलास आवश्यकता पडल्यास; एक चिठ्ठी दाखवावी लागते, जिच्यात त्या सामानाचे वजन लिहिलेले असते. हे विक्रेते दिवसभरात अशा अनेक फेऱ्या करीत असतात. गावातील लोकसंख्येला लागेल त्याहून कितीतरी अधिक शिधा ते कुंपणाच्या पलीकडे घेऊन जातात. अशा प्रकारे वाहून नेलेले अतिरिक्त धान्य हे रात्रीच्या वेळी किंवा संधी मिळेल तसे तस्करीने सीमापार नेले जात असते.

**सीमापारचे नातेवाईक व नातेसंबंध :** सीमा रक्षणाच्या शैथिल्यामुळे सीमापारचे नातेसंबंध लग्न संबंधांत परिणत होत आसामात स्थिरस्थावर होतात. सीमा भागात कडक तपासणी सुरू झाल्यावर हे उत्तरोत्तर अवघड होत गेले तरी आजही सीमापार जाऊन नातेवाईकांना भेटण्याचे प्रयत्न सुरूच आहेत.

**भूमीचे कायदे लागू करण्यास पडणाऱ्या मर्यादा :** गुरेढोरे पळविणे, दरोडेखोरी, माणसे पळवणे, गुन्हेगारांना पळायला मदत करणे, स्त्रिया व मुलांचा व्यापार करणे इत्यादी सीमापार येऊन केले जाणारे गुन्हे हे एक वास्तव आणि उपजीविकेचा भाग झालेले आहे. सीमेपार पळून जाणे सोपे असते. गुन्हा करून पळून जातात आणि कायद्याचा दबाव नाहीसा होईपर्यंत बांगलादेशात सहानुभूतीदारांपाशी व नातेवाईकांपाशी आश्रय घेतात.


**नैसर्गिक साधनसंपत्तीचे अपहरण :** दोन्हीही देशांतील नागरिक, लाकूड, बांबू, चुनखडी इत्यादी सीमा भागातील सीमापारच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे अपहरण करत असतात. बांगलादेशात बांधकामांकरिता दगड मिळत नाही. भारतात मिळतात म्हणून त्यांची बांगलादेशात तस्करी केली जाते.

**सीमेवरील गहाळ झालेले स्तंभ:** सीमेवर खुणेकरिता प्रमुख, छोटे आणि किरकोळ स्तंभ उभारलेले असतात. सीमेवर तणाव निर्माण करण्याच्या उद्देशाने गुन्हेगारी टोळ्यांकडून काही वेळेला तेच चोरले जातात. ईशान्य भारतात गुन्हेगार, स्त्रिया आणि मुलांचा उपयोग तस्करीकरिता, टेहळणीकरिता केला जात असतो. सीमेवर महिला पोलिस उपलब्धच नसतात. त्यामुळे स्त्रिया आणि मुलांना अटक केली जाऊ शकत नाही. गुन्हेगार लोक याचाच पूर्ण लाभ उठवत असतात. स्त्रियांना गैरवर्तणूक दिली, असे आढळून आल्यास सुरक्षा रक्षकांविरुद्ध कठोर कारवाई केली जाते. त्याचा स्त्रियाही गैरफायदा घेताना दिसतात. त्या सुरक्षा दलांविरुद्ध खोट्या तक्रारीही करीत असतात. त्यामुळे सुरक्षा रक्षक स्त्रिया व मुलांना पकडण्यास नाखूश असतात. तक्रारींपश्चात दीर्घकाळ चालणाऱ्या चौकशा सुरक्षा दलांकरिता प्रचंड तणावाचा स्रोत ठरतात. ईशान्य भारतातील सीमा भागांत महिलांची अर्धसैनिक दलांत संख्या कमीत कमी ३०-३५ टक्के असली पाहिजे.

अमेरिका आणि मेक्सिकोमध्ये इलेक्ट्रॉनिक्स सर्व्हेलन्स फेन्स (कुंपण) लावले आहे. असेच कुंपण बांगलादेश सीमेवर नदी आणि इतर सीमेवर जिथे घुसखोरी थांबविणे कठीण आहे त्या सीमेवर लावले पाहिजे.

आज भारतामध्ये घुसखोरीच्या समस्येविरुद्ध लोकांना ज्ञान देण्याबाबत मोठे अभियान चालविण्याची गरज आहे. त्यासाठी ईशान्य भारत बचाव, आसाम बचाव यांसारखी अभियाने देशात चालविणे आवश्यक आहे. याखेरीज घुसखोरांविरुद्ध प्रचार करून नागरिकांना जागरूक करण्याचीही गरज आहे. प्रत्येक महिन्यात प्रत्येक गावात एक दिवस घुसखोरीविरुद्ध अभियान चालविले गेले पाहिजे.

(लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)



# जगण्याचे... बळ... तुकाराम...!

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास



संत तुकारामांच्या विचारांचे सामर्थ्य हे वर्तमान युगातील प्रत्येक समस्येची सोडवणूक करणारे आहे. त्यांची अभंगवाणी जगातील प्रत्येक व्यक्तीला दिशादर्शक आहे. **विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ।।** संत तुकारामांच्या अभंगवाणीने अवघ्या महाराष्ट्राला सुसंस्कारित करण्याचे कार्य केले. समाजमनावर संस्कारांचा फार खोल परिणाम त्यांच्या अभंग रचनेने केला आहे. त्यांच्या अभंग वाङ्मयाशिवाय मराठी साहित्याची व्याख्या पूर्ण होऊच शकत नाही.

आज संत तुकारामांच्या अभंग वाङ्मयातील अभंगांना सुविचाराचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते. त्यांच्या प्रत्येक अभंगामधून जीवनमूल्यांचा संदेश दिलेला आहे. **वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा। येरानी वाहावा भार माथा।।** आज यंत्रयुगामध्ये सर्वत्र जीवनमूल्यांची पायमल्ली होत असतानाच, पदोपदी नीतिमत्तेचा ऱ्हास होताना दिसत आहे. परोपकाराची जागा उपद्रवी वृत्तीने घेतलेली आहे. या सर्व उपद्रवी वृत्तींना संत तुकारामांनी साडेचारशे वर्षांआधी प्रखर विरोध करून आपले स्वतंत्र व सोपे जीवनोपयोगी तत्त्वज्ञान मांडले आहे.

**पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणीक नाहीं जोडा दुजा यासी ।। सत्य तो चि धर्म असत्य ते कर्म । आणीक हे वर्म नाहीं दुजे ।।ध्रु.।।** (तु. गा. १०२१) असा सोपा तत्त्वज्ञानाचा जीवनमूल्यविचार आपल्या अभंगातून त्यांनी सांगितला. प्रत्येकाला असे वाटावे की, तुकोबा आपल्याच जगण्याची कथा सांगत आहेत. वाचा बोलू वेद नीती । करु संती केले ते ।। तुकोबा त्यामुळेच सर्वांना जवळचे वाटतात. मराठी विचारविश्व आणि संस्कृतीचा मेरूदंड असणारा जो भागवत धर्म आहे त्याला अभिप्रेत असणाऱ्या भूमिकेप्रमाणे संत तुकाराम हे खरे लोकशिक्षक ठरलेले आहेत.

**मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास। कठीण ऐसे वज्रास भेदू।।** आपल्या आचरणाच्या माध्यमातून नीतिवान जीवन जगण्याचे धडे जगाला देणारे संत तुकाराम संतांची फक्त लक्षणेच पूर्ण करीत नाहीत, तर खऱ्या संतत्वाच्या कसोटीला त्यांचे जीवन उतरलेले आहे. समाज शिक्षण हे त्यांचे आद्य कर्तव्य त्यांनी लोकशिक्षकाच्या भूमिकेतून पूर्ण केलेले आहे. मध्ययुगीन काळात त्यांनी मांडलेली लोकशिक्षकाची भूमिका आजही महत्त्वपूर्ण ठरते.

**जेथे कीर्तन करावे। तेथे अन्न न सेवावे।।१।। बुका लावू नये भाळा। माळ घालू नये गळा ।।ध्रु.।। तटावृषभासी दाणा। तृण मागो नये जाणा।।२।। तुका म्हणे द्रव्य घेती। देती तेही नरका जाती।।३।।** (तु. गा. ३०७४) संत तुकारामांनी आपल्या अभंग वाङ्मयामध्ये जी मूल्यसंकल्पना मांडलेली आहे, त्यातील प्रत्येक 'जीवनमूल्यविचार' हा जणू ज्ञानाचा, अनुभवाचा व आनंदाचा अमृतकुंभच! ज्याद्वारा मानवी जीवनाला नैतिक अधिष्ठान प्राप्त होऊन, जीवन अधिक तेज:पुंज व नीतिमान करण्याचा तुकारामांचा अट्टाहास सामान्य व्यक्तीला अलौकिक आनंदाची व समाधानाची अनुभूती देणारा ठरलेला आहे. आजही तो वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अनुभवता येतो. ही त्याची अनुभवप्रामाण्यतेची कसोटी आज यंत्रयुगातही प्रत्येक व्यक्तीला लागू होणारी आहे.

**आनंदाचे डोहीं आनंदतरंग। आनंद चि अंग आनंदाचे ।।१।। काय सांगो जालें कांहींचियाबाही। पुढे चाली नाहीं आवडीनें ।।२।। गर्भाचे आवडी मातेचा डोहळा। तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ।।३।। तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा। अनुभव सरिसा मुखा आला ।।४।।** (तु. गा. ३२४२) संत तुकारामांनी सांगितलेली जीवनमूल्ये ही जीवनाला 'स्वाभिमानी' व 'तेजस्वी' करणारी असून त्याद्वारा कुणालाही आपल्या जीवन कालमर्यादेमध्ये समाधानाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचता येऊ शकते. आज सर्वत्र असमाधानाने, भ्रष्टाचाराने जगाला ग्रासलेले आहे. प्रत्येक व्यक्ती अशांत व असमाधानी दिसते. त्यामुळेच ती अनैतिक मार्गाने भौतिक सुख मिळवत आहे. त्यातून ना खरे सुख मिळत आहे ना खरे समाधान. जगात आज त्यामुळेच समाधानी वृत्ती निर्माण होण्याची गरज निर्माण झाली आहे. आज समाजामध्ये जी अनैतिकता, अराजकता व भ्रष्टाचारी लोकमानसिकता निर्माण झाली आहे, त्याला संत तुकारामांचा त्यागवाद हा प्रत्युत्तर आहे. भ्रष्टाचारी जे पैसा कमावून सुख विकत घेऊ इच्छितात, त्यांना समाधान व शांती कधीही प्राप्त होऊ शकणार नाही. समाधान प्राप्तीसाठी संत तुकारामांनी सत्यवादी व नीतिमान असले पाहिजे, अशी शिकवण दिली. आपण केलेले काम सत्य आहे का? असा सवाल त्यांनी विचारावयास सांगितला. आपण केलेले काम असत्य, अनीतिमान असेल, तर आपल्याला कदापि मन:शांती लाभणार नाही.

**सत्य असत्याशी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।।** संत तुकारामांनी आपल्या अभंग वाङ्मयातून सात्त्विकतेचा समाधानी भाव निर्माण केला आहे. त्यामुळेच त्यांचे अभंग वाङ्मय हे अक्षर वाङ्मय ठरलेले आहे. त्याच अक्षर वाङ्मयातील जीवनमूल्यांमुळे संत तुकाराम हे भागवत संप्रदायातील वैचारिक वाङ्:मयाच्या धर्ममंदिराचे कळस ठरले आहेत.

**उपाधीच्या नावें घेतला शिंतोडा। नेदूं आतां पीडा आतळों ते।।१।। काशासाठीं हात भरूनि धुवावे। चालतिया गोवे मारगासि ।।ध्रु.।। काही नाहीं देवें करूनि ठेविलें। असे ते आपुलें ते ते ठायीं ।।३।। तुका म्हणे जेव्हा गेला अहंकार। तेव्हा आपपर बोळविले ।।४।।** संत तुकाराम प्रस्तुत अभंगातून उपाधीच्या म्हणजे संकटांच्या, त्रासाच्या नावाने आम्ही शिंतोडा घेतला आहे, असे सांगतात. म्हणजे आम्हाला कोणतेही संकट, पीडा त्रास देऊ शकत नाही. कशासाठी उगीच हात धुवावे? जर, आपण योग्य मार्गावर असू तर. देवांनी काही वेगळी गोष्ट केलेली नसते. आपल्या अंत:करणामध्ये जे काही असेल त्याचीच प्रचीती येत असते. तुकाराम महाराज म्हणतात खऱ्या अर्थाने जेव्हा अहंकार जाईल तीच मनाची संपत्ती व आपपर भावाची बोळवण असेल. असा मन संकल्पनेचा भाव प्रस्तुत अभंगातून ते व्यक्त करतात.

**माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ।।१।। तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ।।ध्रु.।। उष्टावळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे ।।३।। तुका म्हणे बाहेरमुदी । आहाच गोविंदीं न सरती ।।४।।** प्रस्तुत अभंगातून संत तुकाराम महाराज कवित्वाचा गमतीदारपणा सांगतात. जे लोक स्वत:हून दारोदार उट लावतात आणि स्वत:ची स्तुती करून घेतात. त्यांना मात्र त्यांची शिव पारखी होते. उष्टावळी जमा करून, कुंथून खोटे प्रेम दाखवत असतात. तुकाराम महाराज म्हणतात, असे बाहेर मुदी लोकांना गोविंदाचे प्रेम कसे मिळेल, असा वास्तव भाव संत तुकाराम महाराज व्यक्त करतात. संत तुकारामांचे एकूणच अभंग साहित्य हे जीवन पथदर्शक आहे.

# तेलंगणातील काँग्रेस सरकार अस्थिर

सत्ताकारण

शैलेश रेड्डी

काँग्रेसला गेल्या वर्षी तेलंगणामध्ये सत्ता मिळाली. एक वर्षात काँग्रेसच्या तिथल्या सरकारची कामगिरी कशी होती, याचे मूल्यमापन सुरू असतानाच काँग्रेसमध्ये गटबाजी सुरू झाली आहे. एकीकडे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी दावोस येथे जाऊन तेलंगणामध्ये गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न करीत होते; दुसरीकडे दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात तेलंगणातील काँग्रेसच्या कामगिरीचे गोडवे गायले जात होते, तर त्याच वेळी पक्षाचे १० आमदार खुर्चीखाली सुरुंग पेरत होते. तेलंगणामध्ये याच महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधान परिषदेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत.

पक्ष एकसंध असल्याचे चित्र जनतेसमोर जाणे अपेक्षित असताना पक्षात जुने-नवे असा वाद उफाळून आला आहे. दुहेरी निष्ठेमुळे केंद्रातील जनता पक्षाचे सरकार पडले होते. आता तेलंगणामध्ये भारत राष्ट्र समिती (बीआरएस) मधून आलेल्या आणि आमदार झालेल्यांना अजूनही आपल्या कार्यालयात 'बीआरएस'चे अध्यक्ष के. चंद्रशेखर राव यांचा फोटो हवा आहे. कार्यालयातील राव यांचा फोटो काहींनी काढल्यामुळे 'बीआरएस'मधून आलेले १० आमदार नाराज झाले. त्यानंतर त्यांनी 'डिनर डिप्लोमसी'च्या निमित्ताने गोपनीय बैठक घेतल्याचे वृत्त बाहेर आल्यानंतर मुख्यमंत्री रेड्डी 'ॲक्शन मोड'वर आले. तेलंगणामध्ये २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने सरकार स्थापन केले आणि के. चंद्रशेखर राव यांच्या सरकारला सत्तेतून बाहेरचा रस्ता दाखवला. बहुतेक बंडखोर नेत्यांनी गेल्या वर्षी भारत राष्ट्र समितीमधून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. 'बीआरएस'मधून आलेल्या या नेत्यांना काँग्रेस नेत्यांशी समन्वय राखता येत नसल्याने स्थानिक काँग्रेस नेत्यांमध्ये नाराजी आहे. या पृष्ठभूमीवर काँग्रेसच्या १० आमदारांनी 'डिनर डिप्लोमसी'च्या वेळी आमदार अनिरुद्ध रेड्डी यांची भेट घेतली आहे; मात्र पक्षाच्या नेत्यांच्या म्हणण्यानुसार ही केवळ एक भोजन बैठक होती. पक्षांतर्गत विरोधक त्याचा उगीच बाऊ करत आहेत.

रेड्डी यांनी सात डिसेंबर २०२३ रोजी शपथ घेतल्यानंतर राज्याच्या आर्थिक स्थितीवर एक श्वेतपत्रिका जारी केली होती. १० वर्षांच्या 'बीआरएस'च्या राजवटीत तेलंगणाचे कर्ज १० पटीने वाढले असल्याचे श्वेतपत्रिकेत नमूद करण्यात आले आहे. राज्यावर ६.७१ लाख कोटींहून अधिक कर्ज असून ते राज्याच्या बजेटच्या एक तृतीयांशपेक्षा जास्त आहे. रेड्डी सत्तेवर आल्यापासून कलेश्वरम उपसा सिंचन योजनेपासून छत्तीसगडसोबत झालेल्या वीज खरेदी करारापर्यंतच्या प्रकल्पांमधील आर्थिक अनियमिततेची चौकशी करण्यासाठी न्यायिक आयोग स्थापन करण्यात आले आहेत. एकीकडे रेड्डी यांच्यासमोर राज्याची आर्थिक स्थिती सुधारणे, हमींची अंमलबजावणी करणे आदी आव्हाने असताना आता पक्षांतर्गत गटबाजीचेही आव्हान आहे. काँग्रेसमध्ये दाखल झालेले आमदार महिपाल रेड्डी यांनी माजी मुख्यमंत्री केसीआर यांच्यासोबतचे छायाचित्र कार्यालयातून काढण्यास नकार दिल्याने वाद निर्माण झाला होता. यानंतर काँग्रेसचे काही नेते आणि कार्यकर्त्यांनी आमदार कार्यालयात घुसून केसीआर यांची छायाचित्रे काढून त्या जागी रेवंत रेड्डी यांची छायाचित्रे लावली. महिपाल यांनी काँग्रेस मतदारसंघाचे प्रभारी काटा श्रीनिवास गौर यांच्यावर पक्ष कार्यकर्त्यांना भडकवल्याचा आरोप केला होता. २०१८ आणि २०२३ च्या निवडणुकीत महिपाल यांच्याकडून गौर यांचा पराभव झाला होता.

देशभरात केवळ तीन राज्यांमध्ये काँग्रेस स्वबळावर सरकार चालवत आहे. राहुल गांधी यांना आमदार, खासदार निवडून आणता आले तरी सांभाळता येत नाहीत, हे गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, पंजाब, अरुणाचल प्रदेश, कर्नाटक, छत्तीसगड, बिहार, गोवा आदी राज्यांमधील पक्षांतराच्या घटनांवरून स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीपूर्वी हिमाचल प्रदेश काँग्रेसमध्येही बंडखोरी झाली होती. मावळत्या प्रदेशाध्यक्ष प्रतिभा सिंह आणि मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांच्या गटात वाद होते. काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये काँग्रेसच्या राज्य, जिल्हा आणि ब्लॉक समित्या विसर्जित केल्या होत्या.



कर्नाटकमध्येही मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यात शहकाटशहाचे राजकारण सुरू आहे. तेलंगणामध्ये काँग्रेस पक्षांतर्गत कलहाचा सामना करत आहे. मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी सरकारमधील दोन मंत्र्यांवर नाराज आमदारांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. यासोबतच तेलंगणा काँग्रेसच्या सर्वेक्षणातून काँग्रेसमधील अंतर्गत कलहही समोर आला आहे. बहुतांश नाराज आमदार हे रेड्डी यांच्या जिल्ह्यातील म्हणजेच मेहबूबनगरचे आहेत. त्यामुळे हे बंड थांबवण्यासाठी मुख्यमंत्री सक्रिय झाले. ते मंत्री आणि आमदारांची भेट घेत आहेत. प्रामुख्याने पी. श्रीनिवास रेड्डी यांच्यावर आमदारांची नाराजी आहे. आपल्या आणि समर्थकांच्या जमिनी नियमित होत नसल्याबद्दल आमदार नाराज आहेत. या कामासाठी मंत्री ४० टक्के कमिशनची मागणी करत असल्याचा त्यांचा आरोप आहे. प्रलंबित बिले अर्थ मंत्रालयाकडून मंजूर होत नसल्यानेही आमदार संतप्त झाले आहेत. नाराज आमदारांच्या बैठकीपूर्वी काँग्रेसने निवडणूक सर्वेक्षण केल्याची टीका होत आहे. तेलंगणा काँग्रेसने जाहीर केलेले सर्वेक्षण काँग्रेसच्या विरोधात गेले. ६६ टक्क्यांपेक्षा जास्त लोकांना केसीआर यांची फार्म हाऊसची योजना आवडली होती. सर्वेक्षणात दिसून आलेला काँग्रेसविरोधातील निकाल हा काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणाचा परिणाम असल्याचे मानले जात आहे. रेड्डी यांनी अधिकाऱ्यांना बैठकीला उपस्थित न राहण्याचे निर्देश दिले आहेत, यावरून पक्षातील असंतोषाचे गांभीर्य दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधान परिषदेच्या निवडणुकांपूर्वी आमदारांनी केलेल्या बंडखोरीमुळे जनतेमध्ये चुकीचा संदेश जाऊ शकतो, अशी भीती काँग्रेस पक्षश्रेष्ठींना वाटत आहे. नाराज असलेल्या आमदारांमध्ये नैनी राजेंद्र रेड्डी, भूपती रेड्डी, येनाम श्रीनिवास रेड्डी, मुरली नाईक, कुचुकुल्ला राजेश रेड्डी, संजीव रेड्डी, अनिरुद्ध रेड्डी, लक्ष्मीकांत, डॉटी माधव रेड्डी आणि बिर्ला इलैया यांचा समावेश होता.

(पान ६ वर)

# प्रभाव संगतीचा; बदलतो रेख जीवनाचा!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. दिल्लीत राहणाऱ्या आईने मला व्हिडीओकॉल दरम्यान सांगितले की, तिचा ११ वर्षांचा मुलगा अभ्यासात फारच कमजोर झालाय. आता सर्वच बाबतीत त्याच्या तक्रारी येत आहेत. तो शिव्या देतो. शाळेतून त्याच्या खराब वागणुकीच्या तक्रारी आहेत. याच वर्षी तो सहाव्या वर्गात गेल्यावर त्याचा वर्ग विभाग 'अ' बदलून 'ड' देण्यात आला आणि तेव्हापासूनच हे बदल घडलेत. वर्ग सहाव्या 'ड' मधील मुले श्रीमंत कुटुंबातील असून त्यांची वागणूक अरेरावीची आहे. विनंती करूनही शाळेने वर्ग बदलला नाही... या तक्रारींचा माझ्या बोलण्यावर नकारात्मक प्रभाव न पडू देता त्या मुलाशी मी खूप प्रेमाने बोललो.

थोड्याच वेळात आमचे बोलणे रंगात आल्यावर त्याच्या आईच्या उपस्थितीचा त्याला विसर पडला; आणि काही मि निटातच मला अतिशय आश्चर्यकारक माहिती मिळाली. त्याने सांगितले की, त्याचा वर्ग बदलल्यावर तो फारच दुःखी झाला होता. कारण वर्ग अ मधील त्याच्या चांगल्या मित्रांशी त्याचे भेटणे-बोलणे बंदच झाले. नवीन ड वर्गात त्याला अनेक मुलांशी बोलायची इच्छाच होत नव्हती. कारण त्यांचे बोलण्याचे विषयच वेगळे; त्याच्या आवडीचे नव्हते. तो एकटाच राहू लागला. अभ्यासातील लक्ष उडाले. हळूहळू त्याच्या सारखेच एकटे राहणाऱ्या दोन मुलांशी त्याची मैत्री झाली. त्यांनी मागच्या बाकावर बसून एकमेकांच्या संगतीने अभ्यासात दुर्लक्ष करून रफ वहीत एकमेकांना संदेश किंवा कार्टूनची देवाणघेवाण करणे सुरू केले. एकदा त्याने आपल्या दोन्ही मित्रांना एक गोष्ट लिहिण्याची सुरुवात करून तिघांनी मिळून ती गोष्ट पुढे नेणे सुरू केले. तीन गोष्टी व त्यात त्यांनीच काढलेले कार्टून यांचा त्याच्या वहीत समावेश होता. मी त्याच्याशी बोलताना 'प्याराफ्रेजिंग टेक्निक'चा वापर केला. म्हणजे समोरच्याने जे वाक्य म्हटले असेल त्याचा काही भाग आपण पुन्हा बोलणे. आपण ज्या व्यक्तीशी बोलतोय त्याने आणखी छान बोलावे व बोलताना अधिक माहिती देण्यासाठी उत्तेजन द्यावे यासाठी हे टेक्निक वा-परतात. यामुळे ऐकणारा पूर्ण इंटरेस्ट घेतोय व त्याला समजतंय ही भावना बोलणाऱ्याच्या मनात दृढ होत जाते. असे उत्साही ऐकणारे असल्यावर बोलणाऱ्याचा ऐकणाऱ्या व्यक्तीवरील विश्वास वाढत जातो. याप्रकारे त्या मुलाचा माझ्यावरचा विश्वास वाढत गेला. त्याने त्याच्या अनेक गुप्त गोष्टी किंवा गमती मला सांगितल्या. हे सर्व ऐकून त्याच्या आईला प्रचंड धक्का बसला. त्याने मला दाखविलेल्या डायरीतील व वहीतील पाने तिने आधी पाहिलेलीच नव्हती.

खरे तर तो एक उत्तम लेखक व स्केच आर्टिस्ट म्हणून तयार होत होता, हे स्पष्ट होते. कारण त्याने मित्रांच्या मदतीने लिहिलेल्या गोष्टी, कार्टून्स व स्केचेस उत्तम दर्जाची होती. या बोलण्यादरम्यान त्याच्या आईला वाटणारे आश्चर्य काही प्रमाणात रागात बदलत जातेय, हे मला जाणवले. पण मुलाशी तयार झालेला दुवा मला तुटू द्यायचा नव्हता, म्हणून मी त्याच्या आईला विनंती केली की, तुम्ही काळजी करू नका. तुम्हीच सांगितलेल्या समस्या दूर करण्यासाठी मला थोडावेळ एकांतात मुलाशी बोलणे आवश्यक आहे. मग ती पण भानावर आली व दुसऱ्या खोलीत गेली. मी प्रथम मुलाचे अभिनंदन केले. त्यातील एका गोष्टीत कुठले बदल केलेत आणि त्यानुसार कुठले नवीन स्केचेस त्यात घातले, तर किती जास्त मज्जा येईल ते पटवून दिले. त्याला विश्वासात घेऊन सांगितले की, तुझ्या आईचे तुझ्यावर किती प्रेम आहे, पण सध्या तिला तुझी किती काळजी वाटतेय. अभ्यासात तू आधी किती छान मार्क्स आणून दाखवले आहेत. तुला आता अभ्यासात लक्ष देणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याला कोणत्या सम स्या आहेत ते समजून घेऊन त्याला योग्य मार्गदर्शन केले.

अभ्यासात त्याला क्षमतेची नव्हे तर संगतीने तयार झालेल्या मानसिकतेची समस्या होती. मग त्याच्याशी आणखी बोलल्यावर हे कळले की, त्याच्या आई आणि वडिलांची घरात सतत भांडणे सुरू असतात. त्यात दोघेही एकमेकांना खूप शिव्या देतात. त्याचे आई-वडील दोघेही शिव्यांचा घरी बोलताना सतत वापर करीत. त्यांच्या संगतीनेच मुलाला शिव्या देण्यात काही वावगे वाटत नव्हते. शाळेतील शिक्षिकेने त्याला इतर मुलांना शिव्या देताना पाहिले म्हणूनच त्याला अ वर्गातून ड वर्गात घातले होते. दोन नवीन मित्र मिळवून त्याने त्यांच्या संगतीत शाळेतील एकटेपणाची समस्या काही प्रमाणात सोडवली होती. आता त्याला घरातून मदतीची गरज होती, पण त्याऐवजी त्याला फक्त पालकांचा रागच सोसावा लागत होता.



## शास्त्र काय म्हणते?

**माझ्याकडे मुलांच्या तक्रारी घेऊन कुणी ना कुणी पालक येतच असतात. त्यांचे वय जरी वेगळे असले, तरी मुलांच्या समस्या त्यांच्या भोवतीच्या वातावरणातूनच तयार होतात. कारण आपल्या सर्वांचीच मानसिकता खाली निर्देशित १६ घटकांतून बालपणापासूनच तयार होत जाते. पुढे व्यवसायात प्रवेश केल्यावर व्यावसायिक घडामोडींची त्यात भर पडते. हे १६ घटक आपल्या जीवनाच्या तीन प्रमुख प्रकारात विभागता येतात.**




**पहिला भाग कुटुंब व नातेवाईक म्हणजे वैयक्तिक जीवन. दुसरा भाग व्यावसायिक जीवन मुलांच्या बाबतीत व्यावसायिक भाग म्हणजे शाळा व शिक्षण. तिसरा भाग सामाजिक जीवन म्हणजे सामाजिक जीवन त्यात शेजारपाजारचे लोक व समाज. या जीवनाच्या तिन्ही विभागात आपल्या भोवती असणाऱ्या वातावरणाचा व भोगलेल्या त्रासाचा, मिळालेल्या यशाचा किंवा अपयशाचा, अनुभवाचा आपल्या मानसिकतेवर प्रभाव पडून त्यानुसार आपण विचार करू लागतो व वागतो. जर आपले विचार आणि वागणे सकारात्मक नसेल आणि समाजविरोधी किंवा गुन्ह्याकडे झुकणारे असेल तर सर्वप्रथम वाईट विचारांनी ग्रासलेल्या व्यक्तीला दूषित वातावरणातून काढून सकारात्मक वातावरणात नेण्याची गरज असते. या बदलासोबतच समुपदेशन व नवीन विचार व विश्वास देणारे उपाय करावे लागतात तसेच भूतकाळातील झालेली मानसिक आजारी परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी गरज असल्यास औषधे किंवा मानसोपचार करावे लागतात. अशा समस्या निर्माणच होऊ नये यासाठी योग्य संगत असावी, याची काळजी घ्यावी.**

त्याच्या आईची मानसिकताच तिच्या आधीच्या संगतीमुळे मुलावर अविश्वास दाखवण्याची व चीडचीड करायची होती. तिचे स्वतःचे बालपण तशाच वातावरणात गेले होते. दुसऱ्या दिवशी त्याच्या दोन्ही पालकांची ऑनलाईन बैठक घेऊन त्यात नेमके काय करायला हवे, त्याची रूपरेषा समजावून सांगितली.

थोड्या वेळाने मुलाला त्या बैठकीत सामील केले. पालक, मुलगा आणि मी असे टीमवर्क करायचे ठरवून या वर्षाची परीक्षा झाल्यावर बरोबर ४५ दिवसात त्या मुलाने लिहिलेले व त्याने काढलेली चित्रं असलेलं पहिलं पुस्तक प्रकाशित करायचे पक्के ठरवले. परीक्षेच्या तारखा शाळेला विचारून घेतल्यावर अगदी दर दिवसाचे वेळापत्रक ठरवले. फक्त १२ वर्षाच्या वयात मुलाचे पुस्तक जर प्रकाशित झाले तर त्यामुळे मुलाची मानसिकता तर एकदम सकारात्मक होईलच; शिवाय घरातील वातावरण सुधारेल व मुलाचे भवितव्य उज्ज्वल असेल, याची त्या मुलाला व पालकांना खात्री पटली. त्याच्या शाळेतील वर्ग शिक्षिका आणि मुख्याध्यापिका यांच्याशी त्याच्या दोन्ही पालकांच्या उपस्थितीत, पण मुलाच्या गैरहजेरीत एकाच वेळी इंटरनेटच्या माध्यमातून व्हिडीओ बैठक घेतली. मुलाने आधीच तीन गोष्टी लिहिलेल्या आहेत, त्यात विषयानुरूप चित्रेसुद्धा काढलेली आहेत ते प्रत्यक्ष दाखवले. परीक्षा संपल्यावर उरलेले काम पूर्ण करून एक छोटेसे पुस्तक प्रकाशित करणार आहोत, हे त्यांना सांगितले व पुस्तकात त्यांची प्रस्तावना मागितली. याचे किती सकारात्मक परिणाम इतर विद्यार्थी, पालकांवर होतील, शाळेचे नावसुद्धा उज्ज्वल होईल हे सर्व समजावून सांगितले.

एकदम जरी १०० टक्के बदल झालेले नसले, तरी हळूहळू पुस्तक प्रकाशन व इतर सकारात्मक वातावरण तयार करण्यासाठी घर आणि शाळा सगळीकडेच प्रयत्न जोरदार सुरू झालेत. शिकायचे काय? **हीयते हि मतिस्तात्, हीनैः सह समागतात् ।। समैस्च समतामेति, विशिष्टैश्च विशिष्टितम्।।** (महाभारत) हीन लोकांच्या संगतीत आपली बुद्धी हीन होत जाते. सामान्य लोकांसोबत सामान्य राहते आणि विशेष लोकांच्या संगतीत विशेष होत जाते. **सठ सुधरहिं सतसंगति पाई, पारस परस कुधातु सुहाई ।।** या तुलसीदास रचित रामायणातील चौपाईमध्ये सांगितलंय की, चांगल्या संगतीने दुष्ट लोकसुद्धा सुधारू शकतात. जसे परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने बनते. तेच पुढे म्हणतात गगन चढ़इ रज पवन प्रसंगा। कीचहिं मिलइ नीच जल संगा।। साधु असाधु सदन सुक सारीं। सुमिरहिं राम देहिं गनि गारीं ।। म्हणजे हवेच्या संगतीने खालची धूळ वर आकाशात उठते, पण तीच धूळ खाली वाहणाऱ्या पाण्यात मिसळून चिखल तयार होतो तसेच पावसाचा थेंब वाहत्या नदीत शुद्ध राहतो, समुद्रात पडला तर खारट होतो, गटारात पडला तर घाण होतो, पण शिंपल्यात पडला तर मोती होतो. श्रीरामाच्या संगतीमुळे वानर बलिष्ठ झाले व दगड पाण्यावर तरंगले. श्रीकृष्णाच्या संगतीने पाचही पांडव अजेय झालेत. संतांच्या संगतीने त्यांचे असंख्य भक्त व प्राणी श्रेष्ठ झाले तसेच सज्जनांच्या संगतीने सामान्यसुद्धा असाम ान्य होऊ शकतात. म्हणून संगत चांगली हवी. सत्संगतीमुळे धैर्य, साहस आणि उत्साहाचा संचार होतो. मनातील आशा व विश्वास वाढतो. उत्तम व्यक्तीच्या संगतीत समृद्धी आणि सन्मान प्राप्त होतात. सत्संगतीमुळे माणसात सारासार बुद्धी वाढून विवेकबुद्धी वाढते. त्यामुळे प्रतिकूल व संकटकालीन परिस्थितीतही आपण संघर्ष व साहस करून यश संपादन करू शकतो. श्रेष्ठ कवी मोरोपंत त्यांच्या केकावलीत देवाला प्रार्थना करतात... सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो कलंक मतीचा झडो विषय सर्वथा नावडो... म्हणजे हे देवा मला निरंतर सत्संग लाभो. सज्जनाचेच भाषण माझ्या कानावर येवो, मनाचा पापदोष झडून जावो, ऐहिक सुखोपभोगाचा सर्वस्वी वीट येवो आणि माझे मन तुझ्या चरणी लीन होवो. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)



## उध्दार जीवाचा । हरिपाठ ।।

जयाचे अंगणी । चंदनाचे झाड ।।
परी नाही चाड । सुगंधाची ।।१।।

परीसाची खाण । गुणांची अंतरी ।।
संगतीने परी । घात केला ।।२।।

मुखी नाही नाम । नाही केली वारी ।।
गाथा ज्ञानेश्वरी । वाचली ना ।।३।।

ऐशा नरा कैसी । व्हावी उपरती? ।।
जेणे जागवीती । मुळ बुध्दी ।।४।।

नर नारायण । जाण अंतरीचा ।।
उध्दार जीवाचा । हरिपाठ ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## प्रेमाचे गाणे ...

चला गाऊ प्रेमाचे गाणे सजवू इतिहासाची पाने..
बुद्धीवरती ठेवू विश्वास ना भरकटू कधी भ्रमाने..
कोण आपला, नी परका पारखू अन होऊ शहाणे..
मानव जन्म बनवू सुंदर सारे दो दिसाचे पाहुणे..
प्रेम देऊ अन् प्रेम घेऊ जिंकावया सर्वांची मने..
'मानवता' हा एकच धर्म वागू सकलांशी प्रेमाने..

दादाराव अवचार

## शिवामृत

शिवम् ओम शिवम् हृदयं शिवम् शुभ्रम् शिवम् शांतम्
शंभु सुंदर ध्यानम् ।।
शिवम् सुंदरम् शिवम् सत्यम् शिवम्
शुभम् शिवम् क्रिष्णम् शंभु सुंदर ध्यानम् ।।
शिवम् गौरीपति पूजनम् शिवम्
ब्रह्मा स्वरूपम् शिवम् आत्मचिंतनम्
शिवम् आदि, शिवम् अनंतम् शंभु सुंदर ध्यानम् ।।

अवनी सप्रे

## जरासे

कधी तू मला रे जपावे जरासे सुखाच्या क्षणांना स्मरावे
जरासे कधी तू उगाही हसावे मला अन् उगा मी
तुझ्यावर रुसावे जरासे तुझी हाक येता इथे मी लपावे
लपूनी तुला मग बघावे जरासे तुझा स्पर्श होताच हरवून
जावे तुझ्या संगती मी फुलावे जरासे तुझे गीत माझेच
होऊन जावे तुझे सूर छेडून गावे जरासे कधी चालताना
दिसे वाट अवघड तिथे हात हाती धरावे जरासे फसावे
कधी पण मिळूनी हसावे तुझे दुःख त्याने हरावे जरासे
सख्या वाटते फक्त इतकेच अंती
तुझ्या अंतरी मी उरावे जरासे

मधुमती वऱ्हाडपांडे



# जोमाने वाढली क्रेडिट कार्ड्स आणि पर्यटक

अर्थोद्योग
महेश देशपांडे

असरत्या आठवड्यामध्ये आर्थिक आकडेवारीच्या अनुषंगाने काही रोचक तथ्ये समोर आली गेल्या पाच वर्षांमध्ये क्रेडिट कार्डांचा वापर दुप्पट झाल्याचे यावेळी दिसून आले. देशात मोबाईल डाटा महाग होत असताना इस्रायलमध्ये मोबाईल डेटा सर्वात स्वस्त असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, आध्यात्मिक पर्यटकांच्या संख्येत २१ टक्क्यांनी वाढ झाल्याची तसेच परदेशी शिक्षणावरच्या कराचा बोजा कमी झाल्याचे स्पष्ट करणारी आकडेवारी पुढे आली. गेल्या काही दशकांमध्ये क्रेडिट कार्डचा वापर झपाट्याने वाढला आहे. रिझर्व्ह बँकेच्या अहवालात याचा स्पष्ट पुरावा देण्यात आला आहे. या अहवालानुसार गेल्या पाच वर्षांमध्ये क्रेडिट कार्डची संख्या दुपटीने वाढली आहे. आता ही संख्या वाढून अंदाजे १०.८० कोटी झाली आहे तर डेबिट कार्डची संख्या स्थिर आहे. अहवालानुसार, डिसेंबर २०१९ मध्ये ५.५३ कोटी क्रेडिट कार्ड अस्तित्वात होते.

डिसेंबर २०२४ मध्ये ही संख्या १०.८० कोटी झाली. डेबिट कार्डची संख्या डिसेंबर २०१९ मध्ये ८०.५३ कोटी होती. डिसेंबर २०२४ मध्ये ती वाढून ९९.०९ कोटी रुपये झाली आहे. गेल्या दशकात भारतात डिजिटल पेमेंट खूप वेगाने वाढले, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०१३ मध्ये एकूण २२२ कोटी डिजिटल व्यवहार झाले. त्याची एकूण रक्कम ७७२ लाख कोटी रुपये होती. २०२४ मध्ये ही संख्या २०,७८७ कोटी रुपये व्यवहार आणि २,७५८ लाख कोटी रुपये अशी वाढली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये डिजिटल पेमेंटची संख्या ६.७ पट आणि मूल्य १.६ पटीने वाढले आहे. रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे की, त्यांनी सीमापार पेमेंट सुधारण्यासाठी यूपीआयला इतर देशांच्या जलद पेमेंट सिस्टिमशी जोडण्याचे काम केले आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये भारत आणि सिंगापूर जोडले गेले. याशिवाय भारताच्या ॲप्सद्वारे आता भूतान, फ्रान्स, मॉरिशस, नेपाळ, सिंगापूर, श्रीलंका सारख्या देशांमध्येही पेमेंट केले जाऊ शकते. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर्ज घेऊन आपल्या मुलांना परदेशात पाठवणाऱ्या पालकांप्रती पूर्ण औदार्य दाखवले आहे. आपल्या मुलांना परदेशात शिकवण्यासाठी कर्ज घेणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे; पण आयुष्यभराची बचत किंवा मालमत्ता किंवा दागिने विकून आपल्या मुलांना परदेशात पाठवणाऱ्यांना दिलासा मिळालेला नाही. कॉलेजच्या फीसाठी परदेशात पैसे पाठविल्यास २० टक्के 'टीसीएस' कापले जाईल; मात्र कर्ज न घेता परदेशी कॉलेजांमध्ये फी भरण्याची 'टीसीएस'ची मर्यादा वाढविण्यात आली आहे. सरकारने आता त्याची मर्यादा सात लाखांवरून १० लाख रुपये केली आहे. अशा पालकांनाही उत्पन्नाचा विचार करून दिलासा मिळायला हवा, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कारण यातील अनेक पालक असे आहेत, जे व्याजाचा बोजा पडू नये म्हणून कर्ज घेत नाहीत आणि पीएफ वगैरेची रक्कम काढल्यानंतरही आपल्या मुलांच्या भविष्यासाठी स्वतःच्या भवितव्याचा त्याग करतात.

अर्थमंत्र्यांचे हे पाऊल विदेशात उच्च शिक्षणाला चालना देऊन विकसित भारताच्या इराद्याला पुष्टी देणारे आहे. यामुळे मध्यमवर्गीय पालकांची स्वप्नेही पूर्ण होतील. आता एक लक्षवेधी बातमी. जगातील सर्वात स्वस्त मोबाईल इंटरनेट डेटाच्या बाबतीत भारत पहिल्या १० देशांमध्ये सामील आहे; परंतु पहिल्या स्थानावर नाही. केबल को. युके. च्या अहवालानुसार, इस्रायलमध्ये सर्वात स्वस्त मोबाइल डेटा उपलब्ध आहे. तिथे एक जीबी डेटाची किंमत फक्त १.७० रुपये आहे. हा अभ्यास जून ते सप्टेंबर २०२३ दरम्यान ५,६०० हून अधिक मोबाइल डेटा प्लॅनच्या आधारे करण्यात आला. त्याच वेळी सर्वात महाग इंटरनेट फॉकलॅण्ड आईसलॅण्डमध्ये आहे. तिथे एक जीबी डेटाची किंमत सुमारे ३,३४० रुपये आहे. दरम्यान, स्वस्त मोबाईल डेटाच्या बाबतीत पाकिस्तान भारताच्या पुढे आहे. इंटरनेट वापरताना बरेच लोक स्वस्त डेटा योजना शोधतात. बऱ्याच लोकांना वाटते की, सर्वात स्वस्त इंटरनेट भारतात आहे; परंतु हे खरे नाही. वास्तविक, इस्रायलमध्ये इंटरनेट सर्वात स्वस्त आहे. या यादीत इटली दुसऱ्या स्थानावर आहे. तिथे एक जीबी डेटाची किंमत सुमारे आठ रुपये आहे. यामध्ये फिजी (०.०८ डॉलर), सॅन मारिनो (०.०९ डॉलर) आणि कंबोडिया (०.१२ डॉलर) या देशांनंतर पाकिस्तान सहाव्या स्थानावर आहे. पाकिस्तानमध्ये एक जीबी डेटा सुमारे ११ रुपयांमध्ये उपलब्ध आहे. यानंतर भारताचा क्रमांक लागतो. येथे एक जीबी डेटाची किंमत सुमारे १३ रुपये आहे. त्यानंतर किर्गिस्तान (०.१७ डॉलर), फ्रान्स (०.२० डॉलर) आणि कोलंबिया (०.२० डॉलर) आहे. बांगलादेश, मलेशिया, इंडोनेशिया, पोलंड, चीन आणि ब्राझीलमध्येही इंटरनेटच्या किमती खूप जास्त आहेत. डेटाची किंमत अनेक घटकांवर अवलंबून असते. जगभरात इंटरनेटच्या किमतींमध्ये बरीच तफावत असल्याचे दिसून येते. काही देशांमध्ये इंटरनेट खूप स्वस्त आहे तर काही देशांमध्ये खूप महाग आहे. हा फरक देशाची आर्थिक स्थिती, इंटरनेट पायाभूत सुविधा आणि स्पर्धा अशा अनेक घटकांवर अवलंबून असतो.

**आर्थिक आकडेवारीच्या अनुषंगाने काही रोचक तथ्ये अलिकडे समोर आली. गेल्या पाच वर्षांमध्ये क्रेडिट कार्डांचा वापर दुप्पट झाल्याचे यावेळी दिसून आले. देशात मोबाईल डाटा महाग होत असताना इस्रायलमध्ये मोबाईल डेटा सर्वात स्वस्त असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, आध्यात्मिक पर्यटकांच्या संख्येत २१ टक्क्यांनी वाढ झाल्याची तसेच परदेशी शिक्षणावरच्या कराचा बोजा कमी झाल्याचे स्पष्ट करणारी आकडेवारी पुढे आली.**



आध्यात्मिक हेतूने भारतात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत २१.४ टक्के वाढ झाली आहे. 'ॲटलिस' या व्हिसा प्रोसेसिंग प्लॅटफॉर्मने जारी केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. या वाढीचे मुख्य कारण म्हणजे लाखो पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या महाकुंभ आणि इतर मोठ्या धार्मिक कार्यक्रमांचा प्रभाव. अहवालानुसार, सुमारे ४८ टक्के आध्यात्मिक भेट व्हिसा अर्ज हे प्रमुख धार्मिक कार्यक्रम आणि महाकुंभसारख्या तीर्थयात्रेशी जोडलेले आहेत. सध्या सुरू असलेला महाकुंभ हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक कार्यक्रमांपैकी एक आहे. त्यासाठी अंदाजे ४.२ कोटी भाविक उपस्थित राहतील. हा कार्यक्रम दर १४४ वर्षांनी एकदा होतो आणि भारताच्या समृद्ध आध्यात्मिक वारशाशी जोडले जाण्याची अनोखी संधी प्रदान करतो. अमेरिका आणि ब्रिटनसारख्या देशांमधून आध्यात्मिक पर्यटकांच्या संख्येत अनेक पटींनी वाढ झाली आहे. हे पर्यटक जीवन बदलून टाकणाऱ्या अस्सल अनुभवांच्या शोधात भारतात येतात. अहवालानुसार, आध्यात्मिक प्रवाशांमध्ये स्त्रिया प्रमुख भूमिका बजावत आहेत. तरुण पिढी आता पारंपरिक पर्यटनापासून दूर जात असून आध्यात्मिक आणि अर्थपूर्ण प्रवासांना प्राधान्य देत आहे, हे प्रवासाचे स्वरूप बदलण्याचे लक्षण आहे. आध्यात्मिक प्रवास करण्याची आवडही वाढली आहे. समूह प्रवासासाठी व्हिसा अर्जांमध्ये ३५ टक्के वाढ झाली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील आध्यात्मिक पर्यटनात सातत्याने वाढ होत आहे. वाराणसी, हृषीकेशसारखी प्रमुख ठिकाणे विदेशी पर्यटकांमध्ये अत्यंत लोकप्रिय झाली आहेत. गंगेच्या काठावर ध्यानधारणा, संध्याकाळची आरती, ऐतिहासिक घाटांवर वेळ घालवण्याचा अनुभव यामुळे ही ठिकाणे आकर्षणाचे केंद्र बनली आहेत. ही वाढती मागणी लक्षात घेता, प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या आसपास पायाभूत सुविधा आणि निवास सुविधा सुधारण्यात आल्या आहेत. यामुळे पर्यटकांना अधिक आरामदायी आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळत आहे. महाकुंभसारख्या घटना आणि भारताच्या आध्यात्मिक वारशाबद्दल वाढती जागतिक रुची यामुळे भारत आध्यात्मिक पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनले आहे. चांगल्या पायाभूत सुविधा आणि प्रवासाच्या बदलत्या ट्रेंडमुळे भारत पुढील वर्षांमध्ये आध्यात्मिक प्रवासाचे केंद्र राहण्याची शक्यता आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# 'श्रीशिवछत्रपती' (संकलित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने) शिवरायांचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व यांचा अभ्यास सुकर करणारा ग्रंथ

**छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य होय. महाराजांचा इतिहास त्यांच्या दरबारातील बखरकारापासून अगदी अलीकडच्या काळापर्यंत अनेकांनी लिहिला आहे. या सर्व इतिहासात त्र्यंबक शंकर शेजवलकरांच्या श्री शिवछत्रपती (संकलितशिवचरित्राची प्रस्तावना आराखडा व साधने) या ग्रंथाला अनन्य साधारण महत्त्व आहे. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील छोट्याश्या गावी, २५ मे १८९५ रोजी झाला. शेजवलकर हे महत्त्वाचे मराठी इतिहास संशोधक आणि इतिहास लेखक म्हणून सर्वांना परिचित आहेतच. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड तसेच पेशवाईचा कालखंड आणि मराठे आणि अहमदशाह अब्दाली यांच्यातील पानिपतचे तिसरी लढाई अत्यंत सूक्ष्म बारकाव्यासह आणि चिकित्सक पद्धतीने आपल्या लेखनीतून इतिहासप्रेमींसाठी लिहिली आहे. श्रीशिवछत्रपती: संकलित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने या त्यांच्या १९६४ मध्ये प्रकाशित झालेल्या ह्या ग्रंथाला १९६६ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला.**

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

त्र्यंबक शंकर शेजवलकर यांच्यावर मुंबईच्या मराठा मंदिर या संस्थेने शिवचरित्र लेखनाची जबाबदारी सोपवली होती. त्या अनुषंगाने त्यांनी शिवचरित्राची दीर्घ प्रस्तावना, शिवचरित्रातील काही प्रकरणे, इतर माहिती लिहिण्यासाठी अनेक महत्त्वाच्या नोंदी, महत्वाची टिपणे घेऊन आपल्या ग्रंथाचा एक आराखडा तयार केला होता. मात्र, हा ग्रंथ पूर्ण होणे अगोदरच शेजवलकर यांचे २८ नोव्हेंबर १९६३ रोजी निधन झाले आणि त्यांचे संकल्पित असे शिवचरित्र लिहायचे कार्य अपूर्ण राहिले. शेजवलकर यांनी शिवचरित्र लिखाणाच्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचा जो सूक्ष्म आणि चिकित्सक रीतीने अभ्यास केला त्याचा आधार घेऊन शिवचरित्राचे संशोधन करणाऱ्या अनेक अभ्यासकांना आणि इतिहास प्रेमींना शिवाजी महाराजांचा कालखंड, शिवरायांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व यांच्या जवळ पोहोचता येईल. या जाणिवेतून मराठा मंदिर संस्थेने १९६४ मध्ये साडेसहाशे पृष्ठांचा श्री शिवछत्रपती हा ग्रंथ प्रकाशित केला.

ग्रंथाचे महत्व इतके होते की या अपऱ्या ग्रंथालाही १९६६ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. कदाचित शेजवलकर यांच्या हातून स्वतः शोधलेल्या संदर्भाच्या आधारे परिपूर्ण असे शिवचरित्र लिहिल्या गेले असते तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील सूक्ष्म पैलूंवर प्रकाश पडला असता याशिवाय जागतिक दर्जाचे असे शिवचरित्र ते ठरले असते आणि साहित्य अकादमीच्या पलीकडे जाऊन मराठी भाषेने एखादा ज्ञानपीठ आणखी मिळवला असता असे वाटते.

त्र्यंबक शंकर शेजवलकरांनी अतिशय मोजके आणि नेमक्या शब्दात छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व त्याचप्रमाणे शिवरायांचे जगाच्या इतिहासातील स्थान याबाबत भाष्य केलेले दिसून येते. खरे म्हणजे शिवाजी महाराज जुनी व्यवस्था मोडून, फोडून, जाळून टाकून नवी व्यवस्था निर्माण करणारे महापुरुष होते. या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे परिवर्तनवादी राजे होते असे म्हणावे लागेल. शेजवलकर यांनी शिवपूर्व काळातील मराठी राज्याचा विचार मांडत असताना देवगिरीच्या मराठी राज्याचा आणि यादव राजांचा अभ्यास केलेला दिसून येतो, त्या काळात बहुतेक लोक मराठी बोलणारे होते. त्याचप्रमाणे यादवांच्या काळात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी म्हणजेच भावार्थ दीपिका या मराठी ग्रंथाची निर्मिती केली असे लेखक सांगतात. म्हणजे यादव काळात मराठी भाषा ही ज्ञानभाषा होती असा निष्कर्ष आपण काढू शकतो. त्याचप्रमाणे औपचारिक शिक्षणाची सुरुवात झालेली नसली तरी अनौपचारिक रीतीने शिक्षण घेत त्या काळातील विद्वान ग्रंथ निर्मिती करण्याइतके सक्षम होते. तसेच संस्कृतमधून मराठीमध्ये अनुवाद करण्याइतपत त्या काळातील प्रज्ञा सक्षम होती, असे म्हणावे लागेल. मात्र असे असले तरी परकीय गुलामगिरीने ग्रस्त असलेल्य ह्या समाजात स्वराज्याची अस्मिता कधी जागृत झाली नाही, ती जागे करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनीच केले. शेजवलकर म्हणतात, जी गोष्ट मराठी बोलणारे लोक मुसलमानी राज्यात विभागले जाऊ नये शिवाजीने घडवून आणली. महाराष्ट्रातील एका मागासलेल्या कोपर्यातील खेडवळ लोकातही महाराष्ट्र राज्य बद्दल, ते तळहाता एवढे असतानाही ईर्षा उत्पन्न झाली. या छोटेखानी होऊ घातलेल्या राज्याकडे महाराष्ट्रातील कर्तबगार लोक आकर्षित हे सांगत असताना माणसाची अस्मिता जागृत होण्यासाठी खेडवळ किंवा शहरी, सुशिक्षित किंवा निरक्षर असला भेद महत्त्वाचा ठरत नाही, असे सुतवाच लेखकाने केलेले दिसते. त्याचप्रमाणे स्वसंरक्षणाचा खात्रीचा मार्ग म्हणजे शत्रूवर चढाई करण्यात असतो हे राजनैतिक लष्करी तत्व छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकांच्या मनावर बिंबविले.




शहाजीराजांच्याबाबत लिहीत असताना शहाजीराजे कर्नाटकात भांडत होते. नवीन राज्य जिंकत होते ते सांगत असताना विद्वान कवी खुश मस्करे व इतर गुरुजनांचा परामर्श घेत होते, असा उल्लेख शेजवलकर करतात. त्यावेळी शहाजीराजांच्या दरबारात विद्वान आणि कवी यांना तसेच गुरुजनांना महत्त्व होते. शहाजीराजे त्यांच्यासोबत सल्लामसलत करत प्रसंगी त्यांचा विचार घेत असा अर्थ काढता येतो. त्यावरून शहाजीच्या दरबारात ज्ञानी माणसाची किंमत होती असे लक्ष्यात येते.

शेजवलकर म्हणतात त्याप्रमाणे राज्यकारभारास आवश्यक असणार्या सर्व शिक्षणाची व्यवस्था जिजाबाई व दादोजींनी केली होती. शिवाजी महाराजांना संस्कृत, उर्दू व फारसीचे प्राथमिक शिक्षण देण्यात आले. त्र्यंबक शंकर शेजवलकर म्हणतात, मुस्लीम राज्यपद्धतीचे शिक्षण शिवाजीस उत्तमपैकी मिळाले. त्याला थोडेबहुत फारसी व उर्दू भाषेचे अध्ययनही करावे लागले असावे. तत्कालीन हिंदुस्थानला एवढ्या शिक्षणावाचून मुस्लीम राजवटीतील कोणीही वरच्या पदास लायक ठरण्यासारखा नव्हता. लष्करी शिक्षण तर सर्वस्वी मुस्लीम धर्तीचे होते, कारण त्यावाचून कोणाचाही टिकाव लागण्यासारखा नव्हता. दीर्घ काळापासून मुघलांची सत्ता महाराष्ट्रावर असल्यामुळे शेजवलकर यांनी आपले हे मत मांडले असावी असे वाटते. राजमाता जिजाबाईंचा देशाभिमान, करारीपणा आणि कठीण प्रसंगांतून निभाऊन जाण्यासाठी लागणारे धैर्य, या त्यांच्या गुणांच्या तालमीत शिवाजीराजे तयार झाले. शेजवलकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जे व्यक्तिमत्व आपल्या लिखाणातून उभे केले आहे. मध्ययुगीन भारतात एक नवीन रस्ता बांधून दाखवणारे कल्पक पुरुष म्हणजे शिवाजी महाराज होय. असे वर्णन करत असताना शोधक म्हणजे संशोधक या व्याख्यानुसार जनतेच्या कल्याणाचे मार्ग शोधून काढण्याचे महत्त्वाचे काम शिवाजी महाराजांनी केले तसेच मध्ययुगीन भारताला नवीन मार्ग दाखवण्याचे म्हणजे दिशा दाखवण्याचे काम शिवाजी महाराजांनी केले असे लेखक म्हणतात, ते रास्त आहे.

आपल्या कार्यामुळे आपल्या वडिलांना अडचण निर्माण होणार नाही अशा पद्धतीने शिवरायांनी आपले कार्य सुरू केले होते असे लेखक म्हणतात आणि या बाबीकडे त्यांची सश्रद्ध वृत्ती त्यांना मानसशास्त्रीयदृष्टीने धीर देण्यास कारणीभूत होती, असेही लेखक म्हणतात. लेखक एके ठिकाणी ह्या ग्रंथात म्हणतात की, शिवाजीची देव भक्ती गीते जाज्वल्य होती तितकी साधू वर्गावर त्यांची श्रद्धा किंवा मदार नव्हती. या वक्तव्यासाठी ते सभासदाच्या बखरीचा आधार घेतात आणि सभासदाच्या बखरीमध्ये तत्कालीन संतांचा उल्लेख सापडत नाही असे ते म्हणतात. नंतरच्या काळातील बखरीत मात्र तसे उल्लेख सापडायला सुरुवात होते, शिवाजींनी त्या काळानुसार व तत्कालीन समाज धाटणीनुसार गुरु केले असतील पण त्यांचा पिंड आत्मबुद्धीने देवभक्त झालेल्यांचा होता; गुरुच्या मध्यस्थीने देवभक्ती त्यांना स्फुरली नाही असे ते म्हणतात. यावरून अत्त दीप भव या उक्तीप्रमाणे शिवाजी महाराजांनी स्वतःच्या अंत:प्रेरणेतून कार्य सुरू ठेवले असे म्हणावे लागते. कार्लाईल या विचारवंताच्या दाखल्यानुसार स्वतःच्या पराक्रमाने नवीन राज्य स्थापना जगातील सर्वात मोठा माणूस ठरतो आणि त्याच्यापुढे धर्मप्रवर्तक साधुसंत, देव माणूस, महाकवी, सुधारक व तत्वज्ञानी लेखक हे दुय्यम प्रतीचे ठरतात. यावरून तत्कालीन काळात राजसत्ता ही सर्वश्रेष्ठ होती ज्ञानी विद्वान हे सुद्धा सत्य पुढे झुकलेले असायचे. मात्र, शिवाजी महाराजांनी अखिल मानव जातीला कोठेही कशाही रीतीने दुसऱ्या ठिकाणी शिकता येणार नाही असे शहाणपणाची गोष्ट आणि कृती करून दुसऱ्या सर्व राज्यव्यवस्था स्वतः च्या राज्यव्यवस्थे समोर गौण ठरवल्या, असे लेखक म्हणतात.

(पान ६ वर)

पान १ वरून

## क्रांतीकारी शिवराय

मंदिरे पाडून मशिदी बांधत असाल तर मी त्या पाडून पुन्हा मंदिराची उभारणी करू शकतो, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. याद्वारे राजांनी धर्माचा जीर्णोद्धार केला. दुसरीकडे त्यांनी नेताजी पालकर आणि बजाबा निंबाळकर यांच्यावर लादलेले परधर्माचे जोखड उतरवून पुन्हा एकदा स्वधर्म स्वीकारण्याची संधी दिली. त्याचबरोबर त्यांनी परभाषेचे सांस्कृतिक आक्रमण काढून भाषाशुद्धीसाठी राज्यव्यवहार कोश निर्माण केला आणि मराठी प्रतिशब्द दिले. अशा प्रकारे त्यांनी सांस्कृतिक क्रांती केली आणि जीर्णोद्धार करून भारतीय संस्कृती सशक्त करण्याचा प्रयत्न केला. त्याचाच १८ व्या शतकातील परिणाम म्हणजे अटकपासून कटकपर्यंत आणि द्वारकेपासून कलकत्यापर्यंत सशक्त मराठ्यांचे साम्राज्य निर्माण झाले. अशा या जाणत्या राजाला जयंतीनिमित्त मानाचा मुजरा...

## द्विपक्षीय सहकार्य वाढविण्यावर भर

त्यात एक रेल्वेमार्गही समाविष्ट असून, तो पूर्ण झाल्यावर भारत-पश्चिम आशिया-युरोप अशा मोठ्या भूभागावर विद्यमान सागरी आणि रस्ते वाहतूक मार्गांना पूरक म्हणून एक विश्वासार्ह आणि किफायतशीर मार्ग तयार होणार आहे, 'आयएमईसी'विषयी पंतप्रधान मोदी-ट्रम्प यांच्यामध्ये या दौऱ्यात सविस्तर चर्चा देखील झाली. भारताने या प्रकल्पातील महत्त्वाचा घटक असलेल्या ग्रीससोबतही, संबंध सुधारण्यास प्राधान्य दिले आहे. गेल्या आठवड्यात ग्रीसचे परराष्ट्रमंत्री जॉर्ज गेरापेट्रिस यांनी भारताला भेट दिली. यावेळी परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासोबत द्विपक्षीय बैठकही घेतली. ग्रीस अशा ठिकाणी आहे, जेथून भारताला युरोपमध्ये प्रवेश करणे खूप सोपे होईल. याशिवाय, हा देश सुएझ कालव्याद्वारे समुद्री मार्गाने भारतीय वस्तू युरोपमध्ये जलद गतीने पोहोचवू शकतो. मोठी गोष्ट म्हणजे, या मार्गाने भारताला थेट युरोपमध्ये प्रवेश करण्याचा मार्ग मिळेल.

**व्यापार दुप्पट होईल-**

डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान मोदी यांनी भारत आणि अमेरिकेतील व्यापार दुप्पट करण्यावर सहमती दर्शवली आहे. सध्या भारत आणि अमेरिकेतील व्यापार १२९.२ अब्ज डॉलर्सचा आहे, परंतु २०३० पर्यंत हा आकडा ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेणे आवश्यक आहे. पंतप्रधान मोदी यांनी दोन्ही देशांनी २०३० पर्यंत त्यांचा द्विपक्षीय व्यापार ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळे दोन्ही देशांना फायदा होईल. या व्यापार कराराला अंतिम रूप देण्यासाठी दोन्ही देश काम करत असल्याचे सांगितले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इतिहासातील सर्वात मोठा ट्रेड रूट (व्यापारी मार्ग) देखील जाहीर केला. त्यांनी सांगितले की, दोन्ही देश या व्यापार मार्गाच्या निर्मितीसाठी काम करत आहेत.

**अमेरिका तेल आणि वायूचा पुरवठा करणार-**

चर्चेदरम्यान, तेल आणि वायू खरेदीबाबत एक मोठा करार झाला. अध्यक्ष ट्रम्प यांनी भर दिला आहे की अमेरिका भारताचा सर्वात मोठा तेल आणि वायू पुरवठादार बनणार आहे. ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य ऐतिहासिकदृष्ट्या वाढेल.

**अमेरिकेत आणखी दोन दूतावास-**

ट्रम्प आणि मोदी यांच्यात दोन नवीन दूतावास उघडण्याबाबत एक मोठी घोषणाही करण्यात आली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, लवकरच बोस्टन आणि लॉस एंजेलिसमध्ये दोन दूतावास उघडणार आहेत. याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी माहिती देताना, या दूतावासांमुळे भारत आणि अमेरिकेतील जनतेशी असलेले संबंध अधिक मजबूत होतील. असे म्हटले. तसेच अमेरिकेत राहणारे भारतीय आपल्यासाठी खूप महत्वाचे आहेत यावरही पंतप्रधानांनी भर दिला.

**आयात शुल्कावरही चर्चा-**

या दौऱ्यात आतिरिक्त आयात शुल्कावरही चर्चा झाली असणार यात शंका नाही. ट्रम्प गेल्या काही काळापासून सतत 'टॅरिफ बॉम्ब' टाकत आहेत. पंतप्रधान मोदींना भेटण्यापूर्वी त्यांनी नवीन आयात शुल्क धोरणावर स्वाक्षरी केली. पण असे दिसते की, पंतप्रधान मोदींनी अतिरिक्त आयात शुल्काच्या मुद्द्यावर ट्रम्प यांच्याशी यशस्वी वाटाघाटी केल्या आहेत.

दरम्यान, भारतातून बेकायदेशीरपणे अमेरिकेत घुसलेले लोक तसेच, काही अमेरिकन उत्पादनांवर भारताकडून आकारण्यात येणाऱ्या आयात शुल्काविरोधात ट्रम्प यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली असली, तरी भारत आणि अमेरिका संबंध एका नवीन उंचीवर नेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ट्रम्प यांच्या प्रशासनातील अनेक लोक भारत अमेरिका यांच्यातील घनिष्ठ संबंधांचे पुरस्कर्ते आहेत. दोन्ही देशांमधील व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, संरक्षण सहकार्य, हिंद प्रशांत महासागरीय सुरक्षा, दहशतवादाविरोधातील लढा आणि अर्थातच, लोकांमधील परस्पर संबंध अशा अनेक क्षेत्रांमध्ये दोन्ही प्रशासनांमध्ये एकवाक्यता आहे. आज अमेरिकेतील भारतीय वंशाचे लोक तसेच, भारतीय नागरिकांची संख्या ५४ लाखांवर असून, अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये भारतातील ३ लाख, ५० हजारांहून अधिक विद्यार्थी शिकत आहेत. मोदींच्या या भेटीमुळे भारताच्या दोन जवळच्या मित्रदेशांसोबतच्या संबंधांना एक नवीन उंची प्राप्त होणार आहे.

## संसाराचे गणित

काय म्हणता जुळलं कसं
संसाराचं गणित भाकरी
सोबत खावा जसा ठेचा
झणझणीत झाला वाद
की रहावं शांत बसावं
मूग गिळून फार तर काय
घालावी चप्पल निघावं
बाहेर यावं जरा फिरून
परतल्यावर घरात असेल
पिन ड्रॉप सायलेन्स आहे
तसाच असू द्यावा, अन्यथा
होईल व्हॉइलन्स घ्यावा
रिमोट, लावावा टीव्ही करावी
शांतता भंग लावावे एखादे
रोमँटिक गाणे ज्याने चढेल
गुलाबी रंग मागावी मग
आपणच माफी शेवटी येऊ
द्यावे शून्य बाकी गळू द्यावा
आपलाही अहंकार संतापाला
आता द्यावा नकार चूक तुझी
की माझी, कशास हवा वाद
झाले गेले विसरून जाऊ, दे
हातात तुझा हात त्याशिवाय
जुळतील कसे बंध हे रेशमाचे
संसाराच्या तापत्या तव्यावर
पाणी शिंपडावे सामंजस्याचे

आरती दलाल धारकर

## थंडी-ऊन्हाचा खेळ

रात्री थंडी शिरशिरी आणे, चंद्राच्या संगती स्वप्नं सजविणे ।
पांघरुणात लपून झोप गोड ये,
सकाळी ऊन नव्या साजाने फिरे ।
दिवसा ऊन तापते अंगावर,
हिवाळ्याचा ऋतू वेगळाच रंगावर ।
हवेतील गारवा अंगाला भिडे,
थंड वाऱ्याने मनही थरथरि उडे ।
रात्र झाली की गारठा वाढे,
निसर्गाचे चक्र सतत फिरत राहे ।
पाखरंही उबेसाठी वसती शोधती,
थंडी-ऊन्हाचा खेळ रोज नव्याने घडती।
थोडी थंडी, थोडं ऊन, निसर्गाचा हा साज नवा जुन । रोज
नवा बदल घेऊन येतो, आणि ऋतूचा गोडवा उलगडतो।

सचिन चव्हाण

कथा
ज्योती पुजारी

बँकेतून पैसे काढणे, पैसे बँकेत टाकणे, पासबुक अपडेट करणे वगैरे वगैरे. बँकेचे अशा वगैरे प्रकारात येणारे व्यवहार करताना माझा जीव अगदी मेटाकुटीला यायचा. पैसे काढायला आणि पैसे भरायला बँकेत जायचं म्हटलं की, माझ्या पोटात गोळाच यायचा, पण आमच्या ह्यांचा हट्टच होता, 'तुला आर्थिक व्यवहार कळले पाहिजे' म्हणायचे. मग काय अस्मादिकांना पैशाची काढ-टाक करण्यासाठी नेहमी नाही तरी अधूनमधून बँकेचा उंबरठा ओलांडावाच लागायचा. लग्न झाल्यानंतर सासरचा उंबरठा ओलांडताना आलं नव्हतं, त्याच्यापेक्षा जास्त टेन्शन मला बँकेचा उंबरठा ओलांडताना यायचं; पण देवाला नव्हे, आपल्या सरकारलाच माझी दया आली आणि सगळ्यांचे सगळे आर्थिक व्यवहार डिजिटल झाले.

आता बँकेत जायचं फारसं कामच पडत नाही. पैसे देणे- घेणे व्यवहार एका क्लिकवर आला. आता लक्ष्मी खरंच आपल्या कराग्रे वसली आहे. आता बँकेत जाऊन पैसे काढण्यासाठी अन् पैसे बँकेत भरण्यासाठी स्लिप भरायची गरज राहिली नाही. बँकेची स्लिप भरून त्याच्यावर सही करायची वेळ आली की, मला धर्मसंकट समोर उभं राहिल्यासारखं वाटायच. मी केलेली माझीच सही मी केलेल्या दुसऱ्या सहीसारखी जमत नाही. माझं खातं असलेल्या एका बँकेने तर माझा 'सही' गुण ओळखून चक्क माझ्या स्पेसिमेन सिग्नेचर पत्रकावर आठ सह्या घेतल्या, पण एकही सही दुसरीसारखी आली नाही. प्रत्येक सही 'आम्ही नाही जा' म्हणत वेगळ्याच दिशेला तोंड फिरवायची. प्रत्येक सही आपले वेगळेपण दाखवायला पुढे यायची. शेवटी बँक मॅनेजरने माझं सही कौशल्य सही सही ओळखून तुम्हाला जमेल तशी सही करा, असं उदार मनाने सांगितलं आणि मी गदगद होऊन सही केली; ती त्या वरच्या आठही सह्यांशी कणभरही जुळली नाही. मॅनेजरने आपल्या कपाळावरचा घाम पुसत 'तुम्ही तुमच्या मिस्टरांना घेऊन या' म्हणत माझी बँकेतून बोळवण केली. आमचे दोघांचं बँकेत एकत्र अकाऊंट असल्याने ह्यांना घेऊन येण्याचं फर्मान मॅनेजरने काढले. 'एवढी शिकली, पण उपयोग काय त्या शिक्षणाचा? साधी सही करता येत नाही.' ह्यांचा ताशेरा. बँकेत माझ्या बाबतीत नेहमीच असा किस्सा घडायचा आणि मी दरवेळी तो आमच्या ह्यांना सांगायचे. तसा ताजा ताजा बँक किस्सा ह्यांना सांगितला तर ह्यांनी 'सही' या विषयावर माझी तासभर तासंपट्टी केली होती. मी बँकेत जाऊन आल्यानंतर नेहमीच सुसंवाद व्हायचा. "अहो, सही साधीच असते. ती काय रांगोळी आहे ठिपक्यांची आणि मला खूप छान सही करता येत नाही, हे तुम्हाला चांगलेच माहीत आहे आपल्या लग्नाच्या रजिस्ट्रेशनच्या वेळेला..." "उगाच नको त्या आठवणी उगाळत बसू. लग्नाला दहा वर्षे झाली. या दहा वर्षांत तुझ्यात काही सुधारण झाली नाही." ह्यांनी माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला. 'तुम्हाला माझ्या सहीत काही सुधारण झाली नाही असं म्हणायचं आहे का? माझ्यात सुध-ारणा झाली नाही म्हणे! मी काय अडाणी आहे, बावळट आहे. काहीही बोलायचं म्हणजे काय...' असंच वाटत असणार ह्यांना. मनात शंका आली. प्रसंग कुठलाही असो माझ्यातला शंकासुर असा वेळी-अवेळी जागा होतो. काही जण काय फर्राटेदार मस्त सही करतात. कसं डोळे भरून पाहात राहावसं वाटत. माझी गिचमिड अक्षरातली सही मला टक्क उघड्या डोळ्यांनाही पाहवत नाही. आता आमच्या बँकवाल्यांना माझं सही रहस्य कळले होते. त्यामुळे कॅशियर माझ्या सहीकडे तुच्छ नजर टाकून माझी सही कधी चुकून जुळलीच तर त्याच्यासमोरच्या छोट्याशा खिडकीतून नोटा सरकवायचे. एकदा बँकेत गेले तर जुन्या कॅशियरच्या जागी नवा चेहरा दिसला. स्लिपवरची माझी सही पाहून बुचकळ्यात पडले. "मॅडम, तुम्ही ही सही कुठल्या भाषेत केली आहे?" सकाळपासून नोटा हाताळून वैतागलेल्या त्या खजिनदारांच्या कपाळावरच्या आठ्यांच्या जाळ्यात माझ्यामुळे अजून दोन-चार आठ्यांची भर पडली.

नोटा हाताळताना वैतागणारा हा जगातला एकमेव प्राणी असावा. त्याचंही बरोबरच आहे. त्याच्या हातात खेळणारी लक्ष्मी त्याची हक्काची नसते. ते परक्याचं धन असल्यानं त्याला जास्त ताण येत असणार. त्या ताणाचा दृश्य परिणाम त्याच्या कपाळावरच्या आठ्यांच्या स्वरूपात दिसत असणार. "इंग्रजीत केली आहे." माझं साशंक उत्तर. "चुकून आपण मराठीत सही केली की असं मला वाटलं." बँकेत मी इंग्रजीतलीच सही सुरुवातीपासून केलेली. मराठीचा कितीही अभिमान असला, तरी सहीसाठी मी इंग्रजीलाच जवळ केल होतं. "हो का, मला वाटलं तुम्ही पर्शियन, तुळू वगैरे भाषेत सही केली की काय." त्यांच्या स्वरातला उपहास कळला. "तुळू ही कुठली भाषा आहे." माझा निरागस प्रश्न. "काही नाही. तुमची सही स्पेसिमेन सिग्नेचरशी जुळत नाही." त्यांनी निर्विकारपण सांगितले. 'बाई दिसते तर सुशिक्षित, पण स्वतःची सही धड करत येत नाही. एकेक नमुने येतात इथे.' त्यांनी माझ्याकडे टाकलेल्या कटाक्षाने त्यांनी न बोललेल हे सगळं मला नीटच कळले. "त्यांची सही कधीच जुळत नाहीय.." शेजारच्या चौकोनी खिडकीपलीकडचा चौदहवी का चांद म्हणाला. त्याला चांगले तुळतुळीत टक्कल असल्याने मी त्याला चौदहवी का चांद म्हणायचे. आता ऑनलाईन बँकिंग सुरू झाले अन् बँकेत जाण्याचं काम फारसे पडत नसल्याने बँकेतले चांद-तारे आता फक्त आठवणीत राहिले. माझी सही आणि मी अख्ख्या बँकेत तेव्हा चर्चेचा विषय झाला होता. शाळा-कॉलेजात असताना फारसं सह्या ठोकण्याचं काम पडलेच नाही.





परीक्षेच्या फॉर्मपर्यंत आमच्या 'सही रे सही'चे महत्त्व असायचे. लग्नानंतर मॅरेज सर्टिफिकेटवर सही केली. ती पाहून माझा नवाकोरा नवरा माझ्याकडे पाहात म्हणाला होता, "सही कर सही. चित्र कसलं काढलंस." "ती सहीच आहे माझी." "ही तुझी सही आहे. मला वाटलं..." "तुम्हाला काय वाटलं, मला सहीपण करता येणार नाही. अहो चांगली एमए झाले आहे मी. लग्नाआधी माझ्या बाबांनी माझी सगळी माहिती तुम्हाला दिली होती. त्यात माझं शिक्षणही आलेच." मी ठसक्यात म्हणाले. "तुझ एमएपर्यंतच शिक्षण कळलं, पण तुझी सही एवढी दिव्य आहे, हे नव्हत कळलंय." स्वतःच्या डौलदार सहीकडे अभिमानानं पाहात नवरोबा बोलले तेव्हा आमच्या लग्नाला जेमतेम महिनाच झाला होता. त्यामुळे मी सणसणीत उत्तर द्यायला वळवळणाऱ्या माझ्या जिभेला प्रयासानं लगाम घातला होता. आमच लग्न जुनं होत गेलं तशी सरावानं जीभेला धार येत गेली. "तुझा तरी इंग्रजीत सही करण्याचा अट्टाहास कशासाठी? सरळ मराठीत सही करायला काय होते?" माझे सही मानअपमानाचे अनेक किस्से ऐकून एका मैत्रिणीने उपाय सुचवला. "काही हरकत नाही, पण इंग्रजीतली सही कधी रुबाबदार वाटते." मी. "आपल्या भाषेचा जरा तरी अभिमान बाळग आणि आपली मराठी आता अभिजात वगैरे झाली आहे." मैत्रीण म्हणाली. "अभिजात म्हणजे?" माझ्या मनातला शंकासुर बोलला. "ते नाही मला माहीत. सगळे म्हणतात मराठीला अभिजातचा दर्जा मिळाला म्हणून मी म्हटलंय. ते महत्त्वाचे नाही. तू मराठीत सही करत जा." "बरोबर आहे तुझं. आपली भाषा कशी अमृतातेही पैजा जिंके वगैरे आहे. आता मी मराठीत सही करणार." माझी भीष्मप्रतिज्ञा ऐकून मैत्रिणीचा जीव भांड्यात नव्हे, मोठ्या हंड्यात पडला असणार. कारण सतत माझी सही व्यथा ऐकून ती वैतागली होती. तिच्या आणि माझ्या सुदैवाने ऑनलाईन प्रकरण जन्माला आले. मनात म्हटल, 'ये सही काम हो गया.' माझ्या नेहमीच्या सही गोंधळाने माझ्या मैत्रिणीने माझ नाव 'सहीबाई' ठेवलं आहे.

सुदूर पूर्वोत्तर भारतातील 'आसाम' मधील राजकवी माधव कंदलीचे रामायण असामिया साहित्यातील पहिले रामायण महाकाव्य आहे. गोस्वामी तुलसीदासांच्या आधी १४ व्या शतकात हा राजकवी होऊन गेला. त्याचे रामायणातील फक्त पाच कांड उपलब्ध आहेत. पुढील काळात थोर संत शंकरदेव यांनी उरलेली, आदिकांड, उत्तरकांड लिहून माधव कंदलांचे रामायण पूर्ण केले आहे.

लेखांक ५८

# राजकवी माधव कंदलीचे रामायण
# असमिया भाषेतील रामायण

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५




भारताच्या पूर्वोत्तर प्रदेशातील 'आसाम' हे प्राचीन राज्य आहे. महाभारत काळी या राज्याची 'प्रागज्यातिषपूर' ही राजधानी होती. असूरांचा राजा नरकासूराचा श्रीकृष्णाद्वारे वध करून बंदीवासातील हजारो स्त्रीयांची मुक्ती केली ती येथेच. इतिहास काळात येथे वर्मन, शालस्तंभ, अहोम या राजघराण्यांनी राज्य केले. अहोम राजवंशाने येथे सुमारे ६०० वर्षे राज्य केले. मोगल बादशहांनी अनेक वेळा आसामवर आक्रमणे केली. पण, त्यांना आसाम जिंकता आला नाही. त्यामुळे आसाम हा मोगलांचे धर्मांध पाय न लागलेला प्रदेश आहे, ही गोष्ट असमिया शौर्याची अमर गाथा आहे. अशा या आसाम राज्यात १४ व्या शतकात माधव कंदली नावाचा विद्वान, व्यत्पन्न कवी होऊन गेला. हा थोर नैय्यायिक तत्त्वज्ञ-चिंतक होता. त्याला 'राजकवी' म्हणूनच ओळखले जाते. याने राजाच्या इच्छेस मान देऊन असमिया भाषेमध्ये रामायण महाकाव्य लिहिले. या रामायणालाच 'माधव कंदली रामायण' म्हणून ओळखले जाते. असमिया भाषेतील हे पहिलेच रामायण म्हणून त्याला 'असमिया रामायण' म्हणूनही ओळखले जाते.

आसाममधील नवगाव येथे त्यांचा १४ व्या शतकाच्या उत्तरार्धात कंदली ब्राह्मण समाजात त्याचा जन्म झाला. 'कंदली' हे गावाचे, समाजसमुहाचे नाव आहे. आसाममधील थोर संत शंकरदेव यांच्या आधी माधव कंदलीचा कार्यकाळ असून शंकरदेवांनी माधव कंदलीची विद्वत्ता- कवित्त्व आणि 'रामायण' आदि साहित्याने प्रभावित होऊन 'पूर्वकवि अप्रमादी' असा त्याचा गौरव केलेला आहे.

कविराज कंदली ये आमके बूलिकरा,
माधव कंदली आरो नाम।
सपाने सचिने मजि ज्ञान काय वाक्य मने,
अहर्निशे चिंतो राम राम।।

हे माधव कंदलींच्या रामायणातील स्वपरिचय देणारे काव्य, असमिया भाषेत असून देवनागरी लिपीत आहे. असमिया भाषेला स्वतःची लिपी आहे. ती एक दोन बदल वगळता बांग्ला आणि मणिपुरी या भाषांच्या लिपी सारखीच आहे.

कविराज माधव म्हणतो मला कविराज कंदली नावाने लोक ओळखतात. माझे नाव माधव कंदली आहे. मी स्वप्नात, जागृतीत, काया, वाचा, मने केवळ राम राम करीत श्रीरामाचे अहर्निश चिंतन-अनुसंधान करतो. कवी माधव कंदलीला आदि महाकवी वाल्मिकी ऋषींबद्दल अतिव आदर व पूज्यभाव आहे. कविराज कंदलीने वाल्मिकी रामायणाबरोबरच अन्य संस्कृत रामायणाचा अभ्यास केलेला आहे. वाल्मिकीचा राम हा मानव- मनुष्य आहे तर माधव कंदली रामाला मानव न मानता देव, विष्णुचा सातवा अवतार, अवतारी विभुती अशा देवत्त्वाच्या दृष्टीने रामाकडे पाहून सारे प्रसंग रंगवतो. माधव कंदली हा थोर वैष्णव भक्त आहे. आपल्या पंथीय निष्ठाची तो कोठेही प्रतारणा करीत नाही. कंदली रामायणाचे फक्त पाच कांडच उपलब्ध झालेली आहेत. त्यामुळे अभ्यासक-समीक्षकात माधव कंदलींचे रामायण पाच कांडाचे की सात कांडाचे याविषयी मतभिन्नता-वाद आहे. माधव कंदलीने लिहिलेले सुरूवातीचे 'आदिकांड' आणि शेवटचे 'उत्तरकांड' अशी दोन कांडे सापडलेली नाहीत. थोर संत शंकरदेव यांनी ही दोन कांडे लिहून, माधव कंदलींचे रामायण सप्तकांडात्मक रूपात पूर्ण केले आहे.

माधव कंदलीने आपले रामायण सात कांडाचेच असल्याचा स्पष्ट उल्लेख एका पदामध्ये केलेला आहे. साताकांडे रामायण पद बंधे साताकांडे रामायण पद बंधे साताकांडे रामायण पद बंधे निबंधिलो।'' त्यामुळे त्याचे रामायण किती कांडाचे? हा वाद निरर्थक आहे. तसेच त्याच्या रामायणातील आणखी एका ओळी वरून हे रामायण श्री राजा वराही महामाणिक्य यांच्या कारकिर्दीत लिहिले हे सुद्धा स्पष्ट होते. तो म्हणतो-'रामायण सुपयार श्री महामाणिक्य ये वाराह राजार अनुरोधे' असमिया भाषेमध्ये माधव कंदलीच्या रामायणा इतकेच कवी रुद्र कंदली यांचे 'द्रोण पर्व' नावाचे महाभारतपर काव्य खूपच लोकप्रिय आहे. कवी रुद्र कंदली, कवीराज माधव कंदली आणि संत शंकरदेव-माधवदेव हे असमिया साहित्याला वैष्णव भक्ती पंथाची संस्मरणीय देणगीच आहेत.

माधव कंदली याची भाषा संस्कृतप्रचूर अत्यंत मधुर असून ओज आणि प्रसाद असे दोन विशेष गुण आहेत. त्याने केलेली निसर्ग वर्णन बहारदार आहेत. युद्धवर्णने वीर रसयुक्त स्फुर्तीदायक आहेत. त्याच्या रामायणात स्त्री पात्रांना-सीतेला विशेष प्राधान्य आहे. माता कैकईच्या इच्छेस मान देऊन मातृपितृ आज्ञापालक, कर्तव्यपरायण श्रीराम जेव्हा वनगमनाचा निर्णय घेतो, तेव्हा सीतेला महालातच राहण्यास सूचवतो तेव्हा सीता, 'जेथे राघव तेथे 'जेथे राघव तेथे 'जेथे राघव तेथे सीता' निर्धार व्यक्त करते. त्याविषयी माधव कंदली म्हणतो-

कमन अंग मोक हिन देखिला हा।
सि कारणे प्रभु मोक उपेक्षित या हा।।
सूर्य अविहने येन नो शोभय दिन।
रजनी नो शोभे येन शशधर हीन।।
वसंत नो शोभे विने कोकिलेर रोले।
निष्फल जीवन प्रभु तुमि विने कोले।।

अर्थातः हे रामा! माझ्या अंगी असे कोणते उणे पण दिसले की तुम्ही मला इथे सोडून वनात जाऊ इच्छिता, ज्याप्रमाणे सूर्याविना दिवस, चंद्राविना रात्र, कोकिळकुजनाविना वसंत नाही तसे तुमच्या सान्निध्याविना माझे पत्नी जीवन नाही.


दृष्टांत, उपमा, संकत आणि शब्दसौष्ठव याद्वारे आपले काव्य मोहक, रंजक करण्यात माधव कंदली कमालीचा यशस्वी झालेला असून त्यामुळेच त्यांच्या रामायणाचा गुंजारव आसामच्या घराघरात, सण-उत्सवात गेली ७०० वर्षे ऐकू येत आह. कविराज माधव कंदलींच्या रामायणाने प्रभावित होऊन रामकथेवर काव्य करणार्या अनेक पिढ्या झाल्या आहेत. त्यामुळे असमिया भाषेतही अनेक रामकथा आहेत. ।। जय श्रीराम ।।

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग ३४)

## (रवींद्रनाथांची पत्रे...)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



रवींद्रनाथांनी अनेक राजकीय व्यक्तींना पत्र लिहिली. त्यात अगदी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांचा देखील समावेश होता. या पत्राची पार्श्वभूमी थोडक्यात अशी होती की त्यावेळी वंगभंगाची चळवळ हिंसक झाली होती. रवींद्रनाथ तर कोणत्याही प्रकारच्या हिंसेच्या विरोधात होते. पहिल्या महायुद्धाचे भीषण परिणाम पाहिल्यानंतर तर ते आक्रमक राष्ट्रवादाचे कट्टर विरोधक बनले. त्याच सुमाराला अमेरिकेत काही हिंदी सशस्त्र संघटनांनी जर्मनीच्या मदतीने हिंसक चळवळीचा कट आखला होता आणि या कटात रवींद्रनाथांचा सहभाग आहे अशा प्रकारचे बिनबुडाचे आरोप केले जात होते. अमेरिकेतील नागरिक या संदर्भात रवींद्रनाथांना दोषी समजत होते. हे समजल्यानंतर रवींद्रनाथांचे मन व्यथित झाले आणि त्यांनी स्पष्ट शब्दात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांना आपल्या भूमिकेची जाणीव करून देणारे पत्र लिहिले. या पत्रात ते म्हणतात, अमेरिकेतील माझे मित्र आणि माझे लिखाण ज्यांनी काळजीपूर्वक वाचले आहे, असे वाचक कधीही अशा गोष्टींवर विश्वास ठेवणार नाही याची मला खात्री वाटते तरी-ही यासारख्या आरोपात माझे नाव गोवल्यामुळे माझ्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचली आहे आणि मला अतीव दुःख झाले आहे. हे तुम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही की मानवतेच्या उच्च तत्वांना विरोध करणाऱ्या राष्ट्रवादावर माझा विश्वास नाही आणि गुप्त खलबते आणि हिंसेच्या पापकृत्यांनी भरलेली देशसेवा म्हणजे स्वतःच आपल्या देशाविरुद्ध केलेले पापकृत्य आहे असे मी समजतो. माझ्या देशाला गरज भासल्यास मी खुलेपणाने त्याचा उच्चार करतो आणि माझ्या देशाच्या शासकांना आणि देशवासीयांना कटू असे सत्य सांगण्याचे संकट देखील मी नेहमी ओढवून घेत आलो आहे. मात्र, कर्तव्याचे नाव घेऊन सैतानाशी हात मिळवणी करणाऱ्या काही राज्यकर्त्यांनी आणि संघटनांनी स्वीकारलेल्या पद्धतींचा मी तिरस्कारच करत आलो आहे. या अमेरिकेच्या तत्कालीन अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रातून रवींद्रनाथांचा आपल्या भूमिकेबद्दलचा निर्भीडपणा, ठामपणा स्पष्ट होतो आणि समोरची व्यक्ती कोणीही असली तरी आपले विचार स्पष्टपणे मांडायला ते कचरत नाहीत असे दिसते.

१९१८ च्या सुमारास रवींद्रनाथांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेऊन शांतिनिकतन मध्ये राहणे पसंत केले. याच सुमाराला लोकमान्य टिळक आणि डॉ. नी बेझंट यांची होमरूल लीगची चळवळ जोरात होती. रवींद्रनाथांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेऊ नये आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यात सहभागी व्हावे असे डॉ. नी बेझंट यांना वाटत होते पण रवींद्रनाथांचा निर्णय पक्का होता. त्यांनी डॉ. ॲनी बेझंट यांना लिहिलेल्या पत्रातून त्यांच्या निस्पृहतेचे दर्शन आपल्याला घडते. आपल्या पत्रात ते म्हणतात,

प्रिय मिसेस बेझंट,

मला पुढच्या काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपद भूषवण्यासाठी विनंती करणारे तुमचे पत्र नुकतेच मिळाले. माझ्यावर विश्वास ठेवा. माझ्या देशाविषयी तुमच्याकडून येणाऱ्या कोणत्याही आमंत्रणाचा अस्वीकार करणे माझ्यासाठी कठीण काम आहे. पण मला पक्क्या माहीत असलेल्या काही थोड्या गोष्टींपैकी एक गोष्ट आहे ती म्हणजे मी राजकारणासाठी सर्वस्वी अपात्र माणूस आहे. जेव्हा- जेव्हा काही विशेष प्रसंगांच्या गरजा ओळखून मी त्यात ढवळाढवळ करण्याचे प्रयत्न केले तेव्हा- तेव्हा मी स्वतःला वेदना करून घेतल्या आहेत. परिणामी जे कार्य करण्याचे माझे ध्येय आहे, त्यांनाही धक्का पोहोचला आहे. तसेच, एका विशिष्ट काळानंतर सर्व सार्वजनिक जीवनातल्या कार्यातून निवृत्ती घेतली पाहिजे, या शास्त्रमतावर माझा विश्वास आहे.

१९४१ च्या सुरुवातीचा काळ होता. त्यावेळी रवींद्रनाथ मृत्यूशय्येवर होते. या सुमारास दुसरे महायुद्ध सुरू होते. या महायुद्धात भारताने इंग्लंडला सहाय्य करावे, असे आवाहन करण्यासाठी इंग्लंड येथून मिस एलोनॉर राथबोन या भारतात आल्या होत्या. पण भारतात आल्यानंतर भारतीय पुढाऱ्यांची ठाम भूमिका पाहून त्या संतापल्या आणि त्यांनी भारतीयांवरच टीकेचा भडीमार केला. ते पाहून मृत्यूशय्येवर असताना देखील रवींद्रनाथांनी या बाईंना एक अनावृत्त पत्र लिहिले आणि ते अनेक इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले. त्या पत्रात रवींद्रनाथ जे काही म्हणतात त्याचे सार थोडक्यात असे आहे...

आम्ही इंग्रजांबद्दल कशासाठी कृतज्ञता बाळगायची? त्यांनी आम्हाला विद्यादान केले नसते तर आम्ही कायम अंधकार युगातच राहिलो असतो का? इंग्रजी शिक्षणातून आमच्यापर्यंत पोहोचली ती काही विचारधारांची श्रेष्ठ संपदा नव्हे. तो नुसता त्यांच्या उष्ट्याचा निःसत्व अंश. त्याचा परिणाम एकच झाला तो म्हणजे भारतीय स्वतःच्या देशातल्या हितकर संस्कृतीच्या योगाला मुकले. दोन शतकांच्या त्या इंग्रजी शिक्षणानंतर फक्त एक टक्का भारतीय इंग्रजी भाषा लिहिण्या- वाचण्यात साक्षर झाले आहेत. आमची संपत्ती लुटली जात आहे, बायकांच्या जीविताला धोका आहे. तरीही शक्तिमान म्हणवणारे इंग्रज त्यांच्या संरक्षणासाठी अजिबात हालचाल करत नाहीत. उलट आम्हालाच आमच्या कुटुंबाचे रक्षण करता येत नाही अशी ओरड परदेशात बसून ते करत आहेत. आमच्या देशाचा दरिद्री, निःशस्त्र शेतकरी, रडून आक्रोश करणाऱ्या मुलाबाळांच्या भाराने वाकून गेलेला शेतकरी, हजारो गुंडांपासून आपले संरक्षण न करू शकल्यामुळे जीवाला भिऊन पळतो आणि इंग्रज अधिकारी त्याची भयग्रस्त अवस्था पाहून फिदीपिदी हसत आहेत. आपल्या आयुष्याच्या अंतिम क्षणी देखील रवींद्रनाथ आपल्या पत्रांमधून अशा प्रकारचे परखड आणि तेजस्वी विचार मांडण्यास जराही घाबरले नाहीत. रवींद्रनाथांवर इंग्रजांचे लांगुलचालन करण्याचा आरोप करणार्यांनी डोळे उघडून त्यांची ही पत्रे वाचावीत म्हणजे त्यांची निर्भयता, स्पष्टपणा आणि आपल्या मनातील विचार कोणताही आडपडदा न ठेवता व्यक्त करण्याची त्यांची तळमळ आणि देशभक्ती लक्षात येऊ शकेल. (क्रमशः)



गेल्या वर्षी अनुभवायला मिळालेल्या हवामानाशी संबंधित घटनांमध्ये आशिया, आफ्रिका, अमेरिका आणि युरोपमधील उष्णतेच्या लाटांचा समावेश होता. वाढत्या हवामान बदलामुळे वायू प्रदूषणाची स्थिती बिकट होऊन आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. झपाट्याने बदलणाऱ्या हवामानामुळे हवेतील प्रदूषकांचे विषारी मिश्रण वाढून भारत, नायजेरिया तसेच ब्राझीलमधील गंभीर परिस्थितीचा समावेश आहे.

# वाढत्या तापमानामुळे जागतिक आरोग्य धोक्यात

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

युरोपियन महासंघाच्या 'कोपर्निकस क्लायमेट चेंज सर्व्हिस'ने २०२४ हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष असल्याचे म्हटले आहे. इतिहासातील हे पहिले वर्ष आहे, जेव्हा सरासरी जागतिक तापमान पूर्व-औद्योगिक कालावधीपेक्षा १.५ अंशा सेल्सिअसपेक्षा जास्त होते. त्यामुळे धोकादायक हवामानाचा धोका वाढला आहे.

२०२४ मध्ये जगातील अनेक भागात अनेक आठवडे तीव्र उष्णता होती. त्याचे गंभीर परिणाम समोर आले आहेत. सौदी अरेबियात वार्षिक हज यात्रेदरम्यान उष्णतेच्या लाटेमुळे किमान १३०० लोकांचा मृत्यू झाला. त्याच वेळी आफ्रिकेच्या दक्षिण भागात शतकातील सर्वात भीषण दुष्काळामुळे २१ दशलक्ष मुले कुपोषित झाली. मोठ्या दुष्काळाने दक्षिण अमेरिकेलाही उद्ध्वस्त केले. त्यामुळे ॲमेझॉन व्हॅलीतील नद्यांमधील पाणी सर्वात खालच्या पातळीवर गेले. उत्तर अमेरिकादेखील अस्पर्श राहिला नाही. जागतिक दक्षिणेत विक्रमी उष्णतेमुळे प्रदूषण आणि आरोग्य बिघडत आहे. अतिउष्णतेमुळे हवेची गुणवत्ता खराब होते आणि लोक आजारी पडतात. वातावरणातील बदलामुळे संपूर्ण पृथ्वीवर हवेची गुणवत्ता खालावत चालली आहे. जागतिक हवामान संघटनेच्या बुलेटिनमध्ये हवामान बदलामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांविषयी सांगितले आहे. उष्णतेच्या लाटेव्यतिरिक्त जागतिक हवामान संघटनेने वणव्याच्या विक्रमी घटना आणि वारा आणि पावसाच्या नमुन्यांमध्ये तीव्र बदलदेखील पाहिले आहेत. नवी दिल्लीत २०२४ चा उन्हाळा कुणाला आठवत नसेल इतका भयंकर होता. दिवसाचे तापमान अनेक आठवडे ४० अंशाच्या वर राहिले. शहरातील सव्वातीन कोटी लोकांसाठी ही उष्णता जीवघेणी होती. यापैकी बरेच लोक उघड्यावर काम करतात किंवा त्यांच्याकडे वातानुकूलन यंत्रे नसतात.

दक्षिण दिल्लीतील अरुंद भागात रात्रंदिवस भिंती आणि रस्त्यांमधून उष्णता बाहेर पडत असते. दिल्ली जगातील सर्वात प्रदूषित ठिकाणांपैकी एक आहे. आता हवामानातील बदल आणि शहरी विकासामुळे उन्हाळ्यात शहरांचे तापमान वाढत आहे. त्यामुळे अतिउष्णता आणि वायू प्रदूषणाचे परस्पर दुष्परिणाम कमी स्पष्ट आहेत; परंतु आरोग्यावर गंभीरपणे हानिकारक परिणाम होत आहेत. स्ट्रॅटोस्फियरच्या वर, ओझोन सूर्याच्या हानिकारक अल्ट्राव्हायोलेट किरणांना शोषून एक फायदेशीर भूमिका बजावते; परंतु पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळ हे एक शक्तिशाली प्रदूषक आहे, जे हवेला विष देते. त्याचा आरोग्यावर घातक परिणाम होतो. वाहनातून बाहेर पडणारे नायट्रोजन ऑक्साईड्स आणि वाष्पशील सेंद्रिय संयुगे आणि कारखान्यांसारख्या इतर स्रोत सूर्यप्रकाशाशी प्रतिक्रिया देतात, तेव्हा जमिनीच्या पातळीवर ओझोन तयार होतो. दिल्ली स्थित थिंक टॅंक 'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट' (सीएसई) च्या अलिकडील विश्लेषणात असे आढळून आले आहे की, उन्हाळ्यात ओझोनसाठी नवीन हॉटस्पॉट शहरभर उदयास आले आहेत. एप्रिल ते जुलै २०२४ दरम्यान दिल्लीने १०२ दिवसांत सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त ओझोन असल्याची नोंद केली. हे अनेकदा १३ तासांपेक्षा जास्त काळ चालू होते. रहदारीमुळे हिवाळ्यात वायू प्रदूषण आणि उन्हाळ्यात ओझोन वाढते. अशोका विद्यापीठातील 'सेंटर फॉर हेल्थ ॲनालिटिक्स रिसर्च अँड ट्रेंड्स्?'च्या संचालक पूर्णिमा प्रभाकरन यांनी ओझोनच्या जमिनीच्या पातळीत वाढ होणे चिंताजनक असल्याचे म्हटले आहे.

अमेरिकेच्या 'हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूट'ने प्रकाशित केलेल्या 'स्टेट ऑफ ग्लोबल एअर' अहवालानुसार, जमिनीवरील ओझोन पातळीमुळे फुफ्फुसीय रोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण भारतामध्ये सर्वाधिक आहे. २०१९ मध्ये भारतात ओझोनमुळे २ लाख ३८ हजार लोकांचा मृत्यू झाला. लोक वाहने आणि चिमण्यांमधून इतर विषारी प्रदूषकाचादेखील श्वास घेतात. भारतातील स्वच्छ हवा कार्यक्रम हवेची गुणवत्ता सुधारण्यात मोठ्या प्रमाणावर अपयशी ठरले आहेत. कारण ते वर्षभर प्रदूषकांचे सर्वात मोठे स्रोत वाहतूक आणि औद्योगिक उत्सर्जन कमी करण्याऐवजी धूळ नियंत्रणावर लक्ष केंद्रित करतात. बेरोजगारीचा दराने विक्रमी उच्चांक गाठला असताना भारत सरकार भरभराट होत असलेल्या गिगा अर्थव्यवस्थेकडे रोजगाराला चालना देणारे क्षेत्र म्हणून पाहते; परंतु या नोकऱ्या बऱ्याचदा कामगारांच्या दीर्घकालीन आरोग्यासाठी घातक आहेत.

दिल्लीच्या विषारी हवेत रात्रंदिवस श्वास घेतल्याने आजारपण आणि अकाली मृत्यू होऊ शकतो. हे कामगार विमा किंवा सशुल्क वैद्यकीय रजेशिवाय काम करतात. 'पीपल्स असोसिएशन इन ग्रासरूट्स ॲक्शन अँड मूव्हमेंट्स्?' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हेनिया'ने भारतातील १०,३८४ ॲपआधारित महिला कामगारांचे सर्वेक्षण केले. जवळजवळ १०० टक्के प्रतिसादकर्त्यांनी सांगितले की, त्यांना प्रसूतीच्या कामामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सम स्यांचा सामना करावा लागला. सुमारे ४३ टक्के लोकांनी दररोज ५०० रुपयांपेक्षा कमी कमावले. या कामगारांनी एकही सुटी घेतली नसल्याचे सांगितले. ब्राझीलच्या ॲमेझॉन रेनफॉरेस्टमधून वाहणाऱ्या झिंगू आणि तिच्या उपनद्या या प्रदेशातील १६ आदिवासी गटांसाठी जीवनरेखा आहेत; पण २०२४ मध्ये इथल्या लोकांसमोर दुष्काळ हे एकमेव आव्हान नव्हते. नदीतील पाणी जसजसे कमी होत गेले तसतसे, गुदमरणाऱ्या धुराचे दाट लोट पसरले. अलिकडच्या वर्षांत या प्रदेशात सर्वात वाईट वणव्याचा परिणाम झाला. मध्य ब्राझीलमधील मातो ग्रोसो राज्यात झिंगू ट्रायबल पार्क आहे. १९६१ मध्ये या उद्यानाला संरक्षित क्षेत्र घोषित करण्यात आले. आदिवासी संस्कृती आणि नैसर्गिक जैवविविधता वाचवणे हा त्याचा उद्देश होता. १९९४ मध्ये झिंगू परिसरात राहणाऱ्या आदिवासी लोकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी एक गट स्थापन करण्यात आला आहे. अलिकडच्या वर्षांत स्थानिक भूदृश्य नाटकीयरीत्या बदलले आहे. शेती व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी जंगलतोड आणि हवामानातील बदल यांनी एकत्रितपणे हा प्रदेश कोरडा झाला आहे. त्यामुळे उरलेल्या जंगलांची आगीपासून बचाव करण्याची क्षमता कमी झाली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये, जमीन बळकावणाऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी नवीन कुरणे आणि पिकांसाठी जंगल साफ करण्यासाठी लावलेल्या वणव्याने झिंगू पार्क अगदीच कमी झाले आहे. २०२० ते २०२१ दरम्यान सुमारे तेरा हजार चौरस किलोमीटर (पाच हजार चौरस मैल) ॲमेझॉन रेनफॉरेस्टचा नाश झाला. ब्राझीलचे माजी अध्यक्ष जैर बोल्सोनारो यांच्या रेन फॉरेस्ट शेती आणि खाणकामांना प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांमुळे हा दर आणखी वाढला. बदलत्या हवामानामुळेही जंगल अधिक असुरक्षित झाल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. २०२४ मध्ये ॲमेझॉनमध्ये ५३,६२० पेक्षा जास्त आगीच्याघटना घडल्या असल्याचे सॅटेलाईट इमेजेसमध्ये दिसून आले आहे. यापैकी सर्वाधिक आग माटो ग्रोसो राज्यात लागली. पावसाला विलंब झाल्याम ुळे सप्टेंबरच्या अखेरीपर्यंत अनेक महिने जंगल जळत राहिले. जंगलातील आगीमुळे केवळ वर्षावनातील जैवविविधता नष्ट होत नाही, तर आदिवासी रहिवासी आणि इतर पारंपरिक लोकांच्या आरोग्याच्या समस्याही निर्माण होतात. नायजेरियाच्या कानो राज्य आणि कानो शहर दोन्ही वसले आहेत. येथे डिसेंबर ते मे या कालावधीत हरमट्टन नावाचा वारा पश्चिम सहारामधून थंड, कोरडी, धुळीची हवा घेऊन येतो. उत्तर नायजेरिया बोडेले मंदीच्या जवळ आहे. हे उत्तर चाडम धील एक बुडलेले वाळवंट आहे. यामुळे, कानो भाग अनेकदा धुळीच्या वादळांनी भरलेला असतो. गेल्या वर्षी तापमानात वाढ झाल्यामुळे मेंदुज्वराचे प्रमाण वाढले. आफ्रिकन मेनिंजायटीस पट्ट्यातील हवामान बदल आणि मेंदुज्वर यांच्यात संबंध असल्याचे संशोधकांना आढळले आहे. संशोधनानुसार मेंदुज्वराचा उद्रेक जेव्हा सापेक्ष आर्द्रता कमी असते, तेव्हा होतो. मेनिंजायटिसचा उद्रेक होण्यास कारणीभूत असलेल्या मुख्य परिस्थितींपैकी एक म्हणजे धुळीच्या वादळानंतर वाढलेले तापमान.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, १६ फेब्रुवारी ते शनिवार, २२ फेब्रुवारी २०२५)

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर

**ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)**

✻ **रविवार, १६ फेब्रुवारी-** संकट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २१:४८, अहिल्यानगर- २१:४१, कलबुर्गी- २१:३१, कोल्हापूर-२१:४२, जालना-२१:३६, धाराशिव-२१:३५, नांदेड-२१:२९, पंढरपूर-२१:३७, परभणी- २१:३२, पुणे-२१:४४, बीड-२१:३६, बीदर-२१:२८, लातूर-२१:३३, विजापूर-२१:३५, छत्रपती संभाजीनगर- २१:३९, सांगली-२१:४०, सातारा-२१:४३, सोलापूर-२१:३५). मायाक्का यात्रा चिंचली ता. रायबाग, चित्रमहर्षी दादासाहेब फाळके पुण्यदिन, जोतिबा खेटे प्रारंभ, श्री चिंतामणी गणेश जन्मोत्सव दिन थेऊर, भैरवनाथ यात्रा वेलंग ✻ **सोमवार, १७ फेब्रुवारी** - औंदुबर पंचमी, कालभैरवनाथ यात्रा पसरणी, भैरवनाथ यात्रा शिरगाव, क्रांतीवीर वासुदेव फडके पुण्यदिन, क्रांतीगुरू लहुजी साळवे पुण्यदिन ✻ **मंगळवार,१८ फेब्रुवारी** - मीनायन, सौर वसंत ऋतू प्रारंभ, श्री रामकृष्ण जन्मोत्सव भालकी जि. बिंदर, मंडूर डोंगरी शिमगोत्सव समाप्त ✻ **बुधवार, १९ फेब्रुवारी-** छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तारखेप्रमाणे), गोपाळ कृष्ण गोखले पुण्यतिथी, पूर्वेद्युः श्राद्ध ✻ **गुरुवार, २० फेब्रुवारी** - कलाष्टमी, भारतीय फाल्गुण मासारंभ, आष्टका श्राध्द, अष्टमी श्राध्द, श्री गजानन महाराज प्रकट दिन शेगाव ✻ **शुक्रवार, २१ फेब्रुवारी** - अन्वष्टका श्राध्द, जागतिक मातृभाषा दिन, अंबाबाई यात्रा हुपरी व माद्याल, सदानंद महाराज पुण्यतिथी रायापूर ✻ **शनिवार, २२ फेब्रुवारी-** श्री रामदास नवमी, नरवीर तानाजी मालुसरे पुण्यतिथी, सज्जनगड यात्रा, घाटजाई यात्रा पाचगणी, श्री संत मुक्ताई यात्रा मुक्ताईनगर, भैरवनाथ यात्रा करंजमाळ (भोर)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १६, १७, २० (१३ नंतर) फेब्रुवारी, २१ (१६ पर्यंत) फेब्रुवारी ✻ **डोहाळ जेवण-** १६ फेब्रुवारी ✻ **बारसे-** १७ फेब्रुवारी ✻ **जावळ-** १६ फेब्रुवारी, १७ फेब्रुवारी ✻ **गृहप्रवेश-** १७, २१ फेब्रुवारी (दुपारी १२ पर्यंत)

### मेष :- प्रगती साधता येईल

वेळ जर चांगली असेल तर सगळेच आपले असतात, नाही तर कोणीच नाही. धनस्थ गुरूचा गुरूवारी लाभस्थ बुधाशी होणारा केंद्रयोग आर्थिक कामे यशस्वी करणारा आहे. उत्साह, धडाडीने चांगली प्रगती साधता येईल. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. कौटंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शुभ ता. १६, २०

### वृषभ:- अपेक्षित घटना

वेळ व विश्वास एक असा पक्षी आहे, एकदा उडून गेला तर पुन्हा परत येत नाही. राशीतील गुरूचा कर्मस्थ बुधाशी होणारा केंद्रयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. आत्मविश्वास वाढेल. अनावश्यक खर्च टाळायला हवेत. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अडचणी कमी होतील. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. १७, २१

### मिथुन:- पाऊल जपून टाकावे

अपयशाचा हंगाम हाच यशाची बीजे पेरण्याचा सर्वोत्तम काळ असतो. कोणतेही पाऊल जपून टाकावे. उत्साहाच्या भरात नवीन जोखीम स्वीकारू नका. भागीदारीच्या व्यवसायात समस्या संभवतात. घरातील वातावरणही शांततेचे ठेवावे. नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. कला गुणांचा विकास होईल. उष्णतेपासून त्रास संभवतो. जपून असावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. १७, २०

### कर्क:- फार चिंता करू नका

घरात वडिलांचा धाक असेल तर उन्नती निश्चित असते. लाभातील गुरू, बुधाशी केंद्रयोग करणार आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत फार चिंता करू नका. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नोकरीत वरिष्ठांची मर्जी सांभाळावी लागेल. हितशत्रूंना धडा शिकविण्याचा सध्या प्रयत्न करू नका. त्रास संभवतो. शुभ ता. २०, २१

### सिंह:- मनासारखी प्रगती

जीवन समुद्र आहे. वादळ, वारा, लाटा येणारच. तडाखे सोसत किनारा गाठता आला पाहिजे. बुध-गुरूचा केंद्रयोग कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती करणारा आहे. ज्ञानदान, बॅक,विमा अशा क्षेत्रात अनुकूलता राहील. अपेक्षित संधी लाभतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अनावश्यक खर्च टाळावा. शुभ ता. १७, २०

### कन्या:- कामांना गती मिळेल

दुसऱ्यांचं वागणं आपल्या वागण्यावर अवलंबून असते. राशी स्वामी बुधाचा गुरूशी होणारा केंद्रयोग भाग्यवृध्दिगत करणारा आहे. नोकरी, व्यवसायात मनासारखी घटना घडतील. योजलेल्या कामांना गती मिळेल. नव्या संधींचे स्वागत करावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. उष्णतेपासून त्रास संभवतो. जपून असावे. प्रगतीच्या संधी लाभतील. शुभ ता. १६, २०

### तुला:- स्पर्धांमध्ये यश मिळेल

दुसऱ्यांची कडू अथवा गोड चव फक्त आपल्या वागण्यावर अवलंबून आहे. पंचमातील बुधाचा अष्टमातील गुरूशी होणारा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. काम, क्रोधादि रिपूपासून सावध रहावे. कोणीतरी आपणास अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत आहे. नवे विचार विचाराने स्विकारावेत. शुभ ता.१७, १७

### वृश्चिक:- सौख्यदायी घटना

जवळची नातीच माणसाला कधी कधी खूप छळतात. सुखस्थ बुधाचा सप्तमातील गुरूशी होणारा केंद्रयोग सौख्यदायी घटना घडविणारा आहे. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. स्थावर प्रश्न मार्गी लागतील. नवीन कामे विचारपूर्वक करावीत. शुभ ता. २०, २१

### धनु:- शॉर्टकट नको

नावं ठेवताना लोकं आई- वडिलांना नावं ठेवतात. मुलांना नाही. सुखस्थानी शुक्र, राहू, नेपच्यूनसह आहे. सप्तमात मंगळ त्यामुळे विचारपूर्वक रहावे. कोणत्याही कार्यसिध्दीसाठी शॉर्टकट वापरण्याचा प्रयत्न करू नका. अडचणीत याल. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. सरकारी कामे मनासारखी होतील. घाईने निर्णय घेऊ नका. समस्या सुटत जातील. शुभ ता. २०, २१

### मकर:- समस्यांतून मार्ग निघेल

आपण कसे आहोत हे फक्त परमात्मा व अंतरात्मा यांनाच माहित असते. धनस्थ बुधाचा पंचमातील गुरूशी होणारा केंद्रयोग आर्थिक समस्यांतून मार्ग काढणारा आहे. नव्या कामांना गती देता येईल. दुसऱ्यांवर फार विसंबून राहू नका. अडचणी कमी होतील. शुभ ता. १७, २०

### कुंभ:- चिंता करू नका

कोणी नसेल कोणाचा म्हणून जगणं थांबत नाही. राशीतील बुधाचा सुखस्थ गुरूशी होणारा केंद्रयोग समस्यातून मार्ग काढणारा आहे. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. अंगिकृत कार्यात समाधानकारक यश मिळेल. घाईने निर्णय घेऊ नका. चिकाटीने राबविलेली धोरणे आता शुभ फलदायी ठरतील. फार चिंता करू नका. शुभ ता. २०

### मीन:- प्रकृतीकडे दुर्लक्ष नको

परिवार एक असे मेडिकल स्टोअर्स आहे, जेथे प्रत्येक दुखण्यावर मोफत औषध मिळते. बुध-गुरूचा केंद्रयोग अपेक्षित प्रगती करणारा आहे. चौथा मंगळ फार दगदग वाढविणारा आहे. जनसंपर्क वाढणार आहे. नव्या कामांना गती मिळेल. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. अनावश्यक खर्च टाळावेत. शुभ ता. १७, २०

!! शुभ भवतु !!



# अडुळसा आणि एरंड

**आजीचा बटवा**

**नारायण कारंजकर**

भ्र. ९४२३७५८४०१

निसर्गाने कितीतरी विविध प्रकारच्या वनौषधी निर्माण केल्या आहेत. आपल्या परिसरात असलेल्या या कित्येक वनौषधींची आपणास आज ओळख नसल्याने आपण त्या क्षुद्र समजतो, त्याकडे दुर्लक्ष करतो. शालेय जीवनापासूनच मुलां-मुलींना अशा वनौषधींचे ज्ञान दिले गेले तर आज ते निश्चितच मोलाचे ठरणार आहे. शहरी भागात तर आता वनौषधींचे ज्ञान जवळजवळ नष्टच झाले आहे, त्यामुळे वनौषधींचा उपयोग केला जात नाही. ग्रामीण भागात आज काही प्रमाणात वनौषधींची ओळख आहे. काही वनौषधी दिसतातही पण त्या वनौषधीविषयी अधिक विस्तृत माहिती त्यांना नसते. अशा वनौषधींचा एकादा- दुसरा औषधी उपयोग त्यांना माहित असतो. त्यांना वनौषधींची विस्तृत माहिती मिळणे आवश्यक आहे.

रेल्वेतून अथवा बसमधून प्रवास करताना सभोवार पाहा. एकामागून एक विविध प्रकारची झाडे दृष्टीस पडतील. आपल्याकडे कडुनिंब, बाभूळ, वड, पिंपळ, आंबा, उंबर आदि विविध मोठ्या वनौषधी बरोबरच तरवड कोरफड, निवडुंग, अडुळसा, एरंड, निर्गुडी आदि विविध प्रकारच्या लहान वनौषधी सर्हास आढळून येतात. मोकळ्या रानात, बांधावर अथवा पडीक जागेत त्या आपले जीवन कंठीत असतात. अशा वनौषधींची दखल घ्या. एकाद्या सुट्टीच्या दिवशी गावाबाहेर जा. अशा विविध वनौषधी पाहून त्यांची माहिती घ्या. घराच्या परिसरात शक्य असेल त्या वनौषधी लावण्याचा प्रयत्न करा, त्यामुळे आल्हाददायी वातावरण तरं तयार होईलच पण अशा वनौषधी किरकोळ आजारावर उपयोगीही पडतील.

शाळेची मैदाने मोठ्या प्रमाणात आज उजाड दिसतात. खऱ्या अर्थाने अशा ठिकाणी वृक्षारोपण व्हावे. विविध संस्थांची कार्यालये, गिरण्या, गृहनिर्माण संस्था आदि ठिकाणी शक्य होईल तेथे अशी विविध उपयुक्त झाडे लावली जावीत. ती उपयोगी ठरणारी आहेत. अडुळसा आणि एरंड यांच्या औषधी उपयोगाची माहिती घेऊ...

### अडुळसाः-

अडुळशाचे क्षुडूप १-२ मीटर उंच असते.

**विविध भाषी नावेः-**

संस्कृत वासा, हिंदी अडुसा अरडुसी, लॅटीन आघाटोडा, वासीका अशी विविध भाषी नावे आहेत.

अडुळसा शीतवीर्य, लघु, तिखट, कडू आहे. भारतात सर्वत्र ही वनौषधी होते. पंचांगही उपयोगी आहेत. अडुळसा खोकला, कावीळ, शीतपित्त, ज्वर, कफ, श्वास, कुष्ठ यांचा नाश करतो.


**औषधी उपयोगः-**

श्वास, रक्तपित्त, कफक्षय या विकारावर अडुळशाच्या पानांचा फुलासहित रस काढून मधाशी द्यावा. कफपित्त, ज्वर, कावीळ यावर अडुळशाच्या पानाचा फुलासहित रस काढून त्यात साखर व मध घालून तो द्यावा.

श्वासावर अडुळशाचा रस व गाईचे लोणी एकत्र कालवून त्यातून त्रिफळाचूर्ण द्यावे. खरजेवर अडुळशांची कोवळी पाने व आंबेहळद ही गोमूत्राशी एकत्र वाटून त्याचा खरजेवर लेप करावा. अडुळशाची पाने पाण्यात कडवून त्या पाण्याने स्नान करावे.

श्वेतप्रदर (पांढरी धुपणी) या महिलांच्या विकारावर अडुळशांच्या मुळीचा रस मधाशी द्यावा.खोकल्यावर अडुळशाच्या पानाला वाफ देऊन हातावर चोळून रस काढावा. त्यात खडीसाखर घालून मधासारखा दाट पाक करावा. मग त्यात बेहडा व हळद चूर्ण घालून ठेवावे व ते वरचेवर चाटवीत जावे. विंचवाचे विषावर अडुळशाची मुळी पाण्यात उगाळून लावावी.

त्रिदोषावर अडुळशाच्या पिकल्या पानास वाफ देऊन त्याचा रस व आल्याचा रस एकत्र करून त्यात तुळशीचा रस घालून मध व ज्येष्ठमध उगाळून लावावे. मुखरोगावर अडुळशाच्या रसात मध मिश्रण त्यात उपरसाळीचे मूळ उगाळून लेप करावा. मूत्राघातावर अडुळशाचा काढा द्यावा. जखमेवर अडुळशाची पाने वाटून बांधावीत. जखम लवकर भरून येते. डोकेदुखीवर अडुळशाची पाने बारीक वाटून डोक्यावर लेप करावा. जीर्णज्वर, जुनाट खोकला, क्षय यावर अडुळशाचा लेह देतात. ती आयुर्वेदिक औषधी दुकानात मिळतात. अडुळसा



प्रत्येक घरी कुंडीत अवश्य लावावा. अडुळशाचे पान व आल्याचा तुकडा चावून खाल्ला असता खोकला व ताप कमी होतो. तसेच ओकारी सूज आदि विकारातही अडुळशाचा उपयोग होतो.

### एरंडः-

निसर्गात नेहमीच्या परिचयाच्या आणि औषधी गुणांनी उपयुक्त अशा अनेक वनौषधी आहेत. एरंडाचे झाड त्यापैकीच एक आहे. पूर्वी एरंडेलने अनेक सामान्य आजार बरे होत.

एरंड ही अत्यंत उपयोगी वनौषधी आहे. एरंडाची पाने, फुले, साल, मुळी, लाकूड ही सर्व काही अत्यंत उपयुक्त आहेत. एरंडाचे कोळसेसुध्दा काही प्रमाणात मसाल्यात घालतात. एरंडेल तेलास अमृतांची उपमा आहे. अंगास लावण्यास, पोटात घेण्यास, डोके व तळ पायांना शांतता येण्याकरता हे तेल अवश्य वापरतात. या तेलाच्या दिव्यानेसुध्दा थंडावा होतो.

एरंडाच्या तांबडा व पांढरा अशा दोन जाती आहेत. दोन्हीही जाती श्रेष्ठ आहेत. एरंडाचे झाड २-३ मीटर उंच होते.

**विविध भाषी नावेः-**

एरंडास संस्कृत- वातारी, हिंदी- अरडी, गुजराती- एरंडो, कन्नड- हरळ, बंगाली- एरडा, इंग्रजी- कॅस्टर, ऑईल प्लॅन्ट, लॅटीन-रिसीनस कॉम्युनिस अशी विविध भाषी नावे आहेत.

एरंडाची झाडे भारतात सर्वत्र होतात. एरंडाची पाने, मूळ, तेल औषधीदृष्ट्या उपयुक्त आहेत. कडू, सारक, उष्ण व वातनाशक असे एरंडाचे गुणधर्म आहेत. वातरोग, कफ, ज्वर, खोकला, उदर, सूज, शूळ, कंबर, मस्तक शूळ, आम्लपित्त, प्रमेह, उष्णता, वृषण वृध्दी, रक्तदोष, अरुची, कृमी, अर्श, मूत्रकृच्छ आदि विकारांवर एरंड वापरतात.

**कावीळ-** सर्व शरीर, डोळे, नखे पिवळे होणे, बारीक ज्वर येणे अशावेळी एरंडाची कोवळी पाने व मेंदीचा पाला एकत्र वाटून तो दूधात मिसळावा. ते दूध रोज सकाळी, सायंकाळी घ्यावे. एरंडाच्या सालीचा रस काढून त्या रसात दूध घालून ते दूध घ्यावे. कावीळ बरी होते.

**शूल-** पोटात बारीक बारीक व राहून राहून दुखते, भूक लागत नाही, अन्नाचे पचन होत नाही, अस्वस्थ्यता वाटते, अपचन, करपट ढेकर, अन्नावर वासना नसते, अशावेळी एरंड मूळाचा काढा एक अष्टमांश करावा व त्यामध्ये हिंग, पादेलोण व सुंठीची पूड घालून किमान ३-४ सप्ताह द्यावा.

**संधीवात-** आमवात, संधीवातात हातापायाची हालचाल नीट करता येत नाही. वेदना होतात. सांध्यांना सूज येते. उठता बसता येत नाही. बारीक ज्वर असतो. अशावेळी रोज सकाळी व रात्री अर्धा तोळा, एक तोळा एरंडेल तेल ज्वारीच्या पिठात घालावे. त्याची भाकरी करून दिवसातून दोनवेळा खावी. नंतर एरंडेल तेल एरंडाच्या पानास लावून दुखणाऱ्या सांध्यानाही पाने बांधावी, हातापायाची हालचाल नियमित व्हावी. जितके फिरता येईल तितके- फिरावे.

**कंबरेचा, पाठीचा शूल-** कंबर वाकविता येत नाही, पाठही दुखत असते, कोणत्याही परिस्थितीमध्ये ती कमी होत नाही, वाकता येत नाही. चालताना चमका मारतात. अशावेळी एरंड मुळांचा काढा करावा व या काढयामध्ये दोन ते तीन गुंजा जवखार घालून तो रोज घेत जावा.

**रक्तदोष-** अंगावर बारीक पुरळा उठतो, खाज सुटते, अंगावर गजकर्ण, नायटे येतात, अशावेळी एरंडेल तेल एक चमचा, दोन चमचे



तूप व एक चमचा मध एकत्र करून पोटात देत जावे. एरंडाच्या सालीचे गंध उगाळून ते अंगास लावावे.

**दमा-** सारखा श्वास लागतो. चालवत नाही, छाती भरल्यासारखी वाटते. चढण चढवत नाही, अशावेळी एकपट एरंडेल तेल दुप्पट मध एकत्र करून घेतले असता बरे वाटते. सर्व दमेकऱ्यांना हे औषध उपयोगी पडते. त्यामुळे कोठा साफ होतो व मलाची शुध्दता झाली म्हणजे श्वास कमी होतो.

**ओठ फुटणे-** अनेकवेळा थंडीने किंवा उष्णतेनेसुध्दा ओठांना भेगा पडतात, रक्त येते. अशावेळी रात्री एरंड्या बारीक वाटून त्यात थोडे दूध घालावे व ते मिश्रण ओठांना लावावे भेगा मऊ पडून आराम वाटतो.

**गळवावर-** एरंडाची मुळी पाण्यात उगाळावी व गरम करून गळवावर लेप करावा. लेप सुकला म्हणजे वर एरंडाचे पान बांधावे. रक्त दोषाच्या कोणत्याही विकारावर एरंडेल तेल एक चमचा, दोन चमचे तूप व एक चमचा मध एकत्र करून पिण्यास द्यावे.

झोप न येणे, डोके गरम होणे इत्यादी विकारावर रोज डोक्यास व तळपायास सावकाशपणे एरंडेल तेल चोळून जिरवावे व तळपायानाही तेल लावून काशाच्या वाटाने घासावे. तळहातांनाही तेल लावावे. तळपाय, तळहात यांना एरंडाचे पान बांधावे.

एरंडाचे तेल रेचक आहे. पोट साफ न होणे, पोटदुखी, पोटफुगी, संधीवात, उदर व सर्व रोगात एरंड तेलाचा जुलाब देतात.

पान ४ वरून

# ‘श्रीशिवछत्रपती’ (संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना...

श्री शिवछत्रपती संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने या ग्रंथात त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी ९८ पानाची दीर्घ अशी प्रस्तावना लिहिली आहे. यात शिवचरित्र लिहितानाची त्यांची भूमिका किती स्पष्ट आणि प्रांजळ होती. त्याचप्रमाणे इतिहासाचा अभ्यास आणि लेखन कसे करावे याचा एक वस्तूपाठच या निमित्ताने आपल्याला वाचायला मिळतो. १७ व्या शतकातील हिंदुस्तान या प्रकरणामध्ये सतराव्या शतकामध्ये संपूर्ण भारताची राजकीय, सामाजिक परिस्थिती कशी होती, याबाबत शेजवलकर आपले मत मांडतात. शिवाजी आणि इंग्रज या प्रकरणांमध्ये शिवरायांच्या काळात नुकतेच आगमन होऊ लागलेल्या इंग्रजांस इतर परकीय व्यापाऱ्यांसोबत येणाऱ्या संबंधांचा उल्लेख लेखकाने केलेला आहे. इंग्रज फक्त व्यापारासाठी आलेले नसून त्यांची सत्ता लालसा शिवरायांनी ओळखली आणि इंग्रजांवर वचक ठेवण्यासाठी स्वतः चे भक्कम आरमार त्यांनी उभी केले. छत्रपती शिवरायांनी संभाजी राजांना इंग्रजी भाषेचे ज्ञान घेण्यास लावल्याचा उल्लेखही काही ठिकाणी येतो. शिवरायांच्या दरबारात त्यांच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगी इंग्रज अधिकारी उपस्थित होते याचा अर्थ दरबारात इंग्रजी भाषा समजणारे कोणी तरी उपस्थित असणारच. व्यापाराचे महत्त्व ओळखून शिवरायांनी मिठाचे व्यापारासाठी आपले नौदल तयार ठेवले होते. सिंधुदुर्ग हा त्यांनी बांधलेल्या जलदुर्गाचा उत्तम नमुना होता. आज्ञापत्रांमध्ये त्यांनी आपल्या आरमाराचे महत्त्व सांगितले आहे. त्याच वेळी वृक्षाचे महत्त्व सुद्धा नमूद केलेले दिसून येते. परमानंद ह्या नेवासी येथील कवीने शहाजी ते संभाजी महाराज यांच्या कालखंडावर आधारित अनुपुराण हा काव्य ग्रंथ लिहिला ३१ अध्यायाच्या या ग्रंथाचे परीक्षण शेजवलकरांनी केले आहे. हे परीक्षण करण्यामागचा हेतू छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल सखोल माहिती मिळवणे हाच होय. असे म्हटले जाते की शिवभारत हे शिवचरित्राचे एक समकालीन आणि अतिशय विश्वसनीय साधन आहे. कै. सदाशिव महादेव दिवेकर यांनी इ.स. १९२७ मध्ये त्या ग्रंथाची संहिता मराठी अनुवादासह प्रकाशित केली. परमानंदाचे शिवकालीनत्व अनेक पुराव्यांनी सिद्ध आहे. आपण हे काव्य शिवाजीच्या सांगण्यावरून रचले असल्याचे परमानंद सांगत असल्याने आणि त्याची विश्वासार्हता वारंवार प्रत्ययास आली असल्याने ते शिवाजीचे अधिकृत चरित्र आहे असे समजण्यास हरकत नाही. एकूणच, शिवभारत हा ग्रंथ शिवचरित्राच्या आणि इतिहासाच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास अफझलखानाने पाठविलेले पत्र आणि त्याला महाराजांनी दिलेले उत्तर ही दोन्ही कवी परमानंदाने आपल्याशिवभारत काव्यात संस्कृतमध्ये अनुवाद करून दिली आहेत. या सर्व विचारातूनच छत्रपतींचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व याच्या अभ्यासासाठी शेजवलकर यांनी शिवभारतचे परीक्षण केले असावे असे वाटते. बसरूरची स्वारी, या प्रकरणांमध्ये बसरूर या सागरी मोहिमेचे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेले नेतृत्व आणि त्यातील त्यांचे नेतृत्व गुण शेजवलकर यांनी अधोरेखित केले आहेत. शिवाजी आणि संभाजी यांच्यातील परस्पर संबंधाबाबतीतही अतिशय वेगळा विचार करत बापलेकांचे हे नाते लेखकाने लिहिले आहे यात मानसशास्त्रीय दृष्टीने तसेच भावनिक दृष्टीने लेखकाने हा विचार मांडला आहे. एकंदरीत शेजवलकर यांचा श्री शिव छत्रपती प्रस्तावना आराखडा व साधने हा ग्रंथ मुळातच शिवछत्रपतींच्या जीवन कार्याचा, त्यांच्या कालखंडाचा, त्यांच्या चरित्रात्मक इतिहासाचा, कर्तृत्वाचा, व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचा ग्रंथ आहे. शिवपूर्वकाल, शिवकाल आणि शिवोत्तरकाल या तिन्ही पातळीवर तत्कालीन समाज जीवनाची ओळख आपल्याला या ग्रंथातून होण्यास मदत होते. त्यामुळे बऱ्यांपैकी दुर्मिळ असलेला हा ग्रंथ छत्रपतींचा इतिहास जाणून घेण्यासाठी महत्त्वाचा आहे.

पान २ वरून

# तेलंगणातील काँग्रेस सरकार अस्थिर

काँग्रेसच्या काही आमदारांच्या गुप्त बैठकीनंतर मतभेद लपवण्याचा प्रयत्न करताना नगरकुर्नूलचे खासदार मल्लू रवी म्हणाले की, ही फक्त डिनर मीटिंग होती. आमदारांची बैठक कोणत्याही फार्म हाऊसवर झाली नसून ‘आयटीसी कोहिनूर’ येथे झाली. आपण सर्व आमदारांशी वैयक्तिकरीत्या बोललो आहोत. बंडखोरीची शक्यता नाही, असे त्यांनी सांगितले. अर्थात त्यांनी कितीही लपवण्याचा प्रयत्न केला, तरी पक्षात गटबाजी आहे, हे लपू शकत नाही. बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व आमदारांकडून तेलंगणा काँग्रेस स्पष्टीकरण मागणार आहे. तेलंगणा काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्याने सांगितले की, राज्य नेतृत्व आमदारांकडून स्पष्टीकरण मागण्याची शक्यता आहे. तसे न केल्यास कार्यकर्त्यांमध्ये चुकीचा संदेश जाईल. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्र समितीचा राजीनामा देऊन काँग्रेसमध्ये प्रवेश करणारे आमदार नाराज आहेत. विधानसभेचे १० आणि विधान परिषदेचे सहा सदस्य काँग्रेसमध्ये सामील झाले होते. चर्चीत गुप्त बैठक जुन्या असंतुष्ट आमदारांनी महसूलमंत्री पोंगलेटी श्रीनिवास रेड्डी यांच्या विरोधात घेतली. आमदारांनी मंत्री श्रीनिवास रेड्डी यांच्यावर मनमानी केल्याचा आणि काँग्रेसच्या जुन्या नेत्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. निवडणुकीपूर्वी काँग्रेसमध्ये दाखल झालेल्या नेत्यांना अधिक प्राधान्य दिले जात असून जुन्या आमदारांकडे दुर्लक्ष होत असल्याचे या बैठकीला उपस्थित असलेल्या आमदारांचे मत आहे. मुख्यमंत्री ए. रेवंथ रेड्डी आणि मंत्री श्रीनिवास रेड्डी ‘बीआरएस’मधून येऊन महत्त्वाच्या पदांवर विराजमान झाले आहेत. त्यामुळे जुने नेते नाराज आहेत. या गुप्त बैठकीची माहिती मिळताच मुख्यमंत्री रेड्डी यांनी तातडीने मंत्री पोंगलेटी श्रीनिवास रेड्डी आणि इतर वरिष्ठ नेत्यांची बैठक घेतली. पक्षात शिस्त पाळणे ही सर्वांची जबाबदारी असून मतभेद दडपण्यासाठी लवकरच मोठे निर्णय घेतले जाऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील नव्या नेत्यांकडून जुन्या नेत्यांकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल त्यांना काँग्रेस पक्षश्रेष्ठींची भेट घेऊन गाऱ्हाणे मांडायचे आहे. आमदारांच्या तक्रारी दूर न झाल्यास पक्षात मोठी फूट पडू शकते. आता काँग्रेस पक्षश्रेष्ठी या संकटाला कसे सामोरे जातात आणि मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आपले सरकार एकसंध ठेवण्यासाठी कोणती रणनीती अवलंबणार हा प्रश्न आहे. तेलंगणात काँग्रेसकडे बहुमतापेक्षा चारच आमदार जास्त आहेत.

पान ५ वरून

# वाढत्या तापमानामुळे जागतिक आरोग्य धोक्यात

हवामानातील बदलांमुळे मेंदुज्वराचा पट्टा वाढत असल्याचे पुरावे आता वाढत आहेत. जंगलतोड आणि खाणकाम हे दोन्ही उपक्रम वाळवंटीकरण वाढवतात. अशा घटनांमुळे युगांडा आणि अंगोलासारख्या देशांमध्ये मेंदुज्वर होऊ शकतो.

अभ्यासानुसार, १९९०२००५ पातळीच्या तुलनेत २०६० पर्यंत उत्तर नायजेरियामध्ये मेंदुज्वर प्रकरणांमध्ये ४७ टक्के वाढ होऊ शकते. चांगली आर्थिक स्थिती असलेल्या लोकांकडे मोठी घरे आहेत, हवेशीर क्षेत्रे आहेत. २४ तास वीजदेखील आहे; परंतु बहुतेक प्रकरणांमध्ये, मेनिंजायटिसमुळे रुग्णालयात येणारी मुले ज्या भागात कमी सामाजिक- आर्थिक स्थिती असलेले लोक राहतात, अशा भागातील असतात. हवामान बदल जगभरातील सार्वजनिक आरोग्य बिघडवत आहेत. जसजसे हवामान बदल अधिक वाईट होत जाईल, तसतसे ते आपल्या ग्रहाला अप्रत्याशित मार्गांनी बदलत राहतील. यामुळे रोगांचा प्रसार होण्याच्या नवीन संधी निर्माण होतील आणि सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञांना हे आजार समजून घेण्यासाठी आणि त्यावर उपचार करण्यास वेळ लागू शकतो. त्यामुळे मृतांच्या प्रमाणात वाढ होऊ शकते. (लेखक पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

# चाहूल उद्याच्या भावनांची !

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २५४

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com



घडून गेलेल्या घटनांना प्रतिक्रिया /प्रतिसाद म्हणून भावनांच्या रूपाने व्यक्त होणे नैसर्गिक असते. जिवलगाच्या मृत्यूच्या बातमीने रडू येते, परीक्षेच्या निकालानंतर आनंदाने जल्लोष करावासा वाटणे, नोकरी मिळाली/ विवाह ठरला की हायसे वाटणे हे स्वाभाविक असते. आपल्या अभिव्यक्ती साधारणतः संवेदनांच्या/ जाणिवांच्या माध्यमांतून स्वतःपर्यंत आणि इतरांपर्यंत पोहोचविण्याचा आपला अट्टाहास असतो. पण हे झाले होऊन गेलेल्या घटनांबद्दल. भविष्याची स्वप्ने डोळ्यांत तरळत असतील तर त्यानुरूप भावनाही शब्दबद्ध होतात.

अष्टविनायक या चित्रपटात नायिकेच्या ओठी एक सुंदर गीत आहे. तिचे लग्न ठरले आहे आणि म्हणून अतिशय तरल शब्दांमध्ये ती गाते

**दिसते मजला सुखचित्र नवे**
**मी संसार माझा रेखिते**

या गीताच्या कडव्यांमध्ये तिचा मधुचंद्र, दिवाळसण असे सगळे भावी घटनाक्रम नववधूच्या नजरेतून चित्रित केलेले आहेत.

भविष्याच्या अंदाज वर्तविण्याचा, भाकीत मांडण्याचा छंद बऱ्याचजणांना असतो. त्यासाठी ज्योतिषी, टॅरो कार्ड आणि विनोदाने म्हणायचे तर पिंजऱ्यातील पोपटाकडून उत्सुकतेने कार्ड काढून उद्यामध्ये डोकावण्याचीही सवय असते. भावी घटनांची नांदी डोळ्यांसमोर आणण्याची, पूर्वानुमान करण्याची आवड असते. उदा. सायंकाळी पतीदेव गुस्सेल मूडमध्ये परततील कारण त्यांचा दिवस खराब गेला असेल. उदा. उद्या मसाजिस्ट कडून स्मरण येईल की उपचाराची वेळ सायंकाळी ठरलेली आहे. अशाच प्रकारे येणाऱ्या समारंभांची घंटी मेंदूत वाजण्याची शक्यता संभवते आणि त्यानुरूप आपल्या भावनिक प्रतिक्रियांची, प्रतिसादांची कल्पना करता येते. याला मानसशास्त्रीय संज्ञा आहे- अफेक्टिव्ह फोरकास्टींग! या प्रक्रियेतून स्वतःच्या अपेक्षा नियंत्रणात ठेवता येतात, चांगल्या सुगीची प्रतीक्षा करता येते आणि सर्वात निकृष्ट/वाईट प्रसंगांसाठी तयार राहता येते.

विल्सन आणि गिल्बर्ट यांनी २००३ साली केलेली सोपी व्याख्या- माणसाच्या भविष्यातील भावनांचे अनुमान! चार प्रकारचे भावनिक अनुभव आपल्या आयुष्यात संभवतात आणि त्याचे अचूक अनुमान आपण काढून त्याचे प्रतिसाद आगाऊ ठरवू शकतो-

१) भावना सकारात्मक असेल की नकारात्मक
२) एखादी भावना, उदा- अपराधगंड, उत्तेजना
३) भावनेची तीव्रता
४) भावनेचा कालावधी

थोडक्यात हे भाकीत करताना आपण विचार करतो- त्या भावनेच्या छटेबद्दल, तिच्या क्षमतेबद्दल, त्यावेळेस जाणवणाऱ्या संवेदनांबद्दल! आपले आकलन, त्या भावनेकडे आपण कितपत त्रयस्थपणे पाहू शकतो आणि आपला भवताल यांचाही परिणाम विचारात घ्यावा लागतो.

काहनेमान आणि स्नेल यांनी मानवी निर्णय क्षमतेबद्दल १९९२ साली सुरु केलेल्या संशोधनादरम्यान भविष्यातील भावनांचे शास्त्र उलगडण्याची गरज भासू लागली. ज्या अनुमानातून आनंददायी जाणिवा निर्माण होऊ शकतात त्यांवर पॉलीपोर्टीस, कोक्किनाकी, हॉर्वथ आणि क्रिस्टोपोलस यांचे संशोधन आधीच सुरु झालेले होते. फक्त इथे कोणत्याही निर्णयाच्या शेवटी आनंद मिळतो कां एवढेच निष्कर्ष अभिप्रेत होते. पुढे जाऊन टिमोथी विल्सन आणि डॅनियल गिल्बर्ट यांनी शोध लावला की बरेचदा आपल्याला अभिप्रेत होता तितका आनंद प्रत्यक्षात होत नाही.

हवं असलेलं हाती पडलं की आनंद होतोच पण तो अनुमानित केल्याइतका नसतो. काहीतरी हवंय या कल्पनेपासून भावी भावनांची चाहूल सुरु होते कारण त्याची पूर्ती झाली की सुख, समाधान, मनःशांती वगैरे गृहीत धरलेलंच असतं. अर्थ असा की प्रतिसादात्मक भावनांबद्दल अपेक्षांची बांधणी आपोआप होत असते. आजचे संशोधन एक पाउल पुढे गेले आहे. त्यांनुसार फक्त आनंदासारख्या सुखद अनुभूतींचे भाकीतच नाही तर २०१२ सालच्या संशोधनानुसार वेन्झे, गुंथर्ट आणि जर्मन म्हणतात की एकाकीपण, चीडचीड, भयगंड अशा भावनांचेही भाकीत करता येते.

परीक्षेत कमी मार्क्स मिळाले तर घरी होणारी पाद्यपूजा आधी नजरेसमोर येते आणि अंगाला कंप सुटतो. परीक्षेचा निकाल जवळ आला की अनुत्तीर्ण होण्याच्या भीतीने भूक न लागणे, झोप न येणे याबरोबर आत्महत्येचे विचारही मन करू लागते. विल्सन, व्हेटली यांनी २००० साली असं प्रतिपादन केलं- सुखाचे तसेच दुःखाचे अंदाजही चुकतात आणि निराशा येते.

**काही उदाहरणे-**

१) नियोजित सहलीच्या निव्वळ कल्पनेनं डोळ्यांसमोर धमाल येते, सुखासीन, निवांत दिवस हवेसे वाटतात आणि कल्पनेने आपण तिथे विहार करीत असतो.

२) दंतवैद्याकडे जाण्याच्या कल्पनेनेच घाम फुटतो कारण वेदनांचे चित्र डोळ्यांसमोरून जात नाही.

३) सकाळी उठल्यावर ऊर्जादायी चहाच्या प्रतीक्षेने उल्हसित व्हायला होतं.

४) कंपनीत जाऊन वरिष्ठांसमोर प्रेझेंटेशन करायचे असेल तर बराच काळ भय त्या व्यक्तीला व्यापून उरते. भलेही प्रेझेंटेशननंतर हवाहवासा विश्राम, कौतुक वाट्याला येते.

५) बाळाच्या जन्माच्या आधी उत्सुकता खूप ताणली गेली असते कारण जन्मानंतरच्या जल्लोषाची, आनंदाची क्षणचित्रे डोळ्यांसमोर सतत तरळत असतात. विशेषतः तो अनुभव पहिलावहिला असेल तर भावनांची आंदोलने खूप हेलकावे खात असतात.

६) एखाद्या कॉफी शॉपमध्ये कॉफीची वाट बघत असताना अचानक जुन्या मित्राची आठवण व्हावी आणि त्याच्याबरोबर शाळेच्या स्मरणरंजनात गुंगून जावे असे वाटत असतानाच तो दत्त म्हणून समोर ठाकावा.

७) आयुष्यात अपेक्षित यश मिळाले नाही म्हणून खंतावल्यावर, एखाद्या यशस्वी मित्राची भेट टळावी असं मनापासून वाटत असतं आणि ती अचानक रद्द होते.

८) खेळाच्या मैदानावर आवडती टीमच जिंकावी आहि तसे झाल्यावरच्या आगाऊ आनंदाची कल्पना मनात यावी.

अनिश्चिततेने आणि तितकेच भयाने व्यापलेले वैद्यकीय क्षेत्र विचारात घेऊ या. आजारातून बरे झाल्यावर उद्भवणाऱ्या अपंगत्वावर आणि घसरत्या आरोग्यावर कशी मात करायची याचेच विचार रुग्णांच्या मनात सतत सुरु असतात. अपघात /आघात त्यांनी मनाविरुद्ध कां होईना स्वीकारलेले असतात, पण नंतरच्या चित्राने त्यांना चिंताक्रांत केलेले असते.

विशेषतः हे पंगुत्व जर आजन्म टिकणारे असेल तर. शारीरिक आणि कदाचित आर्थिक परावलंबित्व त्यांना स्वाभाविकपणे भेडसावत असते- घरच्यांनी, डॉक्टरांनी कितीही आधार दिला तरीही अपूर्ण भविष्याचे चित्र अशा रुग्णांच्या नजरेसमोरून हटता हटत नाही आणि ते नकारार्थी विचारांनी घेरले जातात. कारण भविष्य कायम अनिश्चित असते. अर्थात ही भाकिते खरी होतातच असे नाही. आघातांना प्रतिसाद देताना माणसे नकारात्मकतेचा प्रभाव आणि कालावधी यांना अधिक महत्व देत असतात. वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींनाही याचा सामना करावा लागतो, कारण रुग्ण आणि त्यांचे स्वजन त्यांना सतत सतावत असतात. डॉक्टरांना वास्तव माहित असते की रुग्णांच्या आस्था आणि जीवनाची गुणवत्ता त्यांची भावी वाटचाल ठरवीत असते. तसे निश्चित निर्णय रुग्णांना घ्यावे लागतात आणि भवितव्य निमूटपणे स्वीकारावे लागते. अशावेळी रुग्ण उपचारांचे पर्याय शोधत असतात, जे नैसर्गिक असते.

वैद्यकीय क्षेत्रातील सध्याची संरचना/वाटणी अशी आहे- डॉक्टर्स वैद्यकीय सत्याचे अखेरचे रूप आणि रुग्ण उपचारांच्या फलिताचे (सकारात्मक अथवा नकारात्मक) धनी. यात दोष एकच- जुळवून घेण्याच्या क्षमतांबद्दल रुग्णांना असणारा विश्वास/अविश्वास. भावनिकदृष्ट्या भलेही परिस्थितीला ते सामावून घेतील पण शारीरिक परिणाम कदाचित दूरगामी आणि म्हणूनच क्षितिजांपलीकडे ! आकलन अधिक भावनिक प्रतिसाद + सामाजिक पूर्वग्रह यांचा प्रभाव रुग्णाच्या बरे होण्यावर पडत असतो.

आजाराच्या आणि पंगुत्वाच्या विविध टप्प्यांचा प्रभाव नक्कीच भाकितांवर पडत असतो. भावी प्रतिकूल आयुष्याशी जुळवून घेण्यात आपण कमी पडू अशी सर्वसामान्य धास्ती सगळ्यांच्या मनात कमीअधिक प्रमाणात असतेच. हा वैद्यकीय उपचारांचा पाया असतो कारण आरोग्याचे गंभीर प्रश्न जीवनाकडे सकारात्मक नजरेने बघण्यावर अवलंबून असतात.

**या अनुमानात तीन चुका होऊ शकतात-**

**(१) केंद्रस्थ दृष्टिकोन-** काय राहणार आहे यापेक्षा काय बदलणार आहे यावर अधिक लक्ष केंद्रित करणे इथे होत असते. स्वतःच्या जुळवून घेण्याच्या क्षमता कशाप्रकारे रोगप्रतिकार वाढवतील, वेदना कमी करतील याकडे निव्वळ दुर्लक्ष होत असते.

**(२) अनुकूलन-** भौगोलिक परिस्थितीत टिकून राहणे, नैसर्गिक शत्रूपासून बचाव करणे,परिस्थितीतील बदलास प्रतिसाद देणे.

**(३) महत्वाचे काय?** पर्यावरणानुरूप बदलत जाणे आणि या प्रक्रियेत प्राधान्यक्रम ठरविता येणे हे अधिक महत्वाचे असते. या चुका टाळणे तसे सोपे असते, पण तितकेच सजग असणेही.

चुकीच्या अनुमानांच्या आधारे वावरणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाची गुणवत्ता प्रायः अपंगत्व घेऊन जगणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाच्या गुणवत्तेपेक्षा बरीच कमी असते.

विशेषतः पक्षाघात, दृष्टिदोष, हृदयविकार, दमा, डायलिसिस आणि कोलोस्टोमी (उदरपोकळीची शस्त्रक्रिया) असे आजार असले तरी या रुग्णांच्या सकारात्मकतेने त्यांचे आयुष्य वाढू शकते.

**भावी भावनांच्या अनुमानातील त्रुटी-**

शेवटी हे अंदाज असतात, हे एकदा मनाला समजावले की त्यांमध्ये त्रुटी असू शकतात, हेही सहज पटण्यासारखे आहे.विल्सन आणि गिल्बर्ट यांचे २००३ मधील संशोधन या त्रुटींवर आधारित एक तक्ता सादर करते-

**(१) आकलनातील त्रुटींमुळे होणाऱ्या चुका-**

अ) एखाद्या गर्भवती स्त्रीला सुलभ प्रसूती होईल असे वाटत असते, प्रत्यक्षात तिला सिझेरियन ला तोंड द्यावे लागते, ज्यासाठी कदाचित तिची मानसिक तयारी नसते.

ब) एखादा गोलंदाज त्याच्या चेंडू फेकीमध्ये आयत्यावेळी बदल करून वेगळ्या प्रकारे गोलंदाजी करतो आणि समोरच्या फलंदाजाला फसवतो आणि आऊट करतो.

**(२) प्रसंगांची चौकट आणि त्यातील त्रुटी -**

अ) भविष्यातील घटनांकडे बरेचदा आपण अरुंद चौकटीतून बघतो आणि इतरांना वगळतो पण कदाचित ते इतरेजन बरेच महत्वाचे असू शकतात. उदा. हॉस्टेलमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांना ते राहात असलेल्या खोलीची लांबी- रुंदी खटकते, पण या भौतिक वैशिष्ट्यांपेक्षा रूममेटशी होणारे नातेबंध अशा मर्यादित नजरेपलीकडे असतात याकडे त्यांचे दुर्लक्ष होते.

**(३) विस्मरणामुळे होणाऱ्या त्रुटी -**

भूतकाळातील घटनेच्या चुकीच्या स्मृती बरेचदा भावनिक मानवी प्रतिक्रियांना जन्म देतात आणि त्याआधारे भावी आणि समांतर घटनांबद्दल आडाखे बांधणे हेही चुकीचे ठरते. उदा. एखादी व्यक्ती परदेशवारीहून आल्यावर तिला प्रवासाचे तपशील आठवतातच असे नाही किंवा काही खोट्या स्मृतींचे कौतुकही वाटू शकतं आणि भावी परदेशगमनाच्या वेळी अशाच भावना पृष्ठभागावर येऊ शकतात.

**(४) अभिव्यक्तीच्या त्रुटी-** संस्कृती आणि भूतकाळातील अनुभव यांच्या आधारे एखादी घटना घडलीच तर कसे वाटेल यांवरही बरंच अवलंबून असते. उदा. एखाद्या रात्री चांगली झोप मिळाली नाही तर लगेच दुसऱ्या दिवशी मूड वाईट असतो असे सरसकट भाकीत चुकीचे ठरू शकते.

**(५) अनुमानांवरील असाधारण प्रभाव-**

अंदाज बांधताना सध्याचे मूड, संसाधने यामुळे पूर्वग्रह निर्माण होऊ शकतात. उदा. सर्दी-खोकला झालेल्या व्यक्तीने पुढील महिन्यात होऊ घातलेल्या पार्टीबद्दल नकारार्थी भावना येऊ शकतात पण तसे होईलच असे नसते. हे अनुमान सध्याच्या खराब मूडमुळे पक्षपाती ठरू शकते.

**(६) अपेक्षांचे परिणाम -**

प्रत्यक्ष प्रसंग घडतो तेव्हा भावनिक अनुभव बदलतात. उदा. चित्रपट बघायला जाताना खूप अपेक्षा असतात, पण प्रत्यक्षात निराशा पदरी पडते आणि चित्रपट आवडत नाही, कारण अपेक्षापूर्ती झालेली नसते.

**(७) परस्परांमधील करुणेतील दरी-**

आज अस्तित्वात नसलेल्या, अंदाज करण्याच्या प्रसंगी करुणेचा अभाव असलेल्या भावनांवर होणारा परिणाम सहजी लक्षात येतोच असे नाही. उदा. अंत्ययात्रेच्या वेळी होणाऱ्या भावनिक उद्रेकाचा विचार न करता मंडळी मनात मात्र इतरच विचार घोळवत जात असतात तेव्हा करुणा कोठेच आढळत नाही.

**(८) जुळवून घेण्यातील त्रुटी-**

भावनांचा प्रभाव कसा ओसरत जातो याचा विचारच न होता बरेच वेळा भाकिते केली जातात उदा. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीचे कौतुक बराच काळ टिकेल असे वाटणाऱ्या/ मानणाऱ्या व्यक्तींना नंतर भावनिक अवस्थेचे भान उरत नाही आणि अपेक्षेपेक्षा तो भर उणावतो.

अशा उणिवा असल्या तरीही भविष्यात डोकावून बघण्याचे मानवाचे आकर्षण कमी होणार नाही आणि उत्सुकताही. आणि त्यांवर आधारित भावनांचे परिष्करणही!

# विमानी बैंसले । तुका ब्रह्म ॥

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८



## (भाग-४८)

परमार्थात ब्रह्म सुख तर आहेच पण त्याच बरोबर परमार्थ आम्हाला मोक्षाचा मार्ग दाखवते. नव्हे नव्हे मोक्ष प्राप्त करून देते. म्हणून निष्काम वृत्तीने कर्म करत संसारात राहून परमार्थ केला तरच आपला जन्म सार्थकी लागेल. हेच तुकोबांनी आम्हाला सोप्या भाषेत पण खडसावून सांगितले आहे. म्हणूनच तुकोबाचे सांगणे केवळ शाब्दिक नसून अत्यंत मौलिक आहे.

त्रिकालाबाधी सत्य आहेत. म्हणूनच त्यांचे बोल हे शब्दब्रह्मच आहेत. ते आपण थोडे जरी आचरणात आणले तरी निश्चितच आपल्याला जगण्याचे सूत्र सापडेल आणि जगण्याचे वर्म कळेल असे वाटते

**बुध्दिला लागता । ज्ञानाचे डोहाळे ॥**
**पुरवी उमाळे । अभंगात ॥२॥**

जसजसे आपण एकाग्रतेने तुकोबांच्या साहित्याचा अभ्यास करू लागतो तसा तसा शब्दातला गुढार्थ कळायला लागतो, आणि त्यांच्या शब्दा शब्दातून ज्ञानामृताचे झरे पाझरायला लागतात. मानवी जन्माचं प्रयोजन काय आहे हळुवारपणे उकलत जातं. दुःखाचं मुळ जरी हा संसार असला तरी त्यातू सुटका व्हावी म्हणून माझे तुकोबा मोक्षाची मागणी नकरता पांडुरंगाला **तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी॥** असे का म्हणतात हे कळु लागतं.

पुनरपि जननम् पुनरपी मरणम्'च्या चक्रातून सुटका तुकोबांना नको आहे, कारण पुढे सांगतात की, **गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥** देवा तुझं गुणगान करायचं असेल. शुद्ध कर्म करत तुझं नामस्मरण करून तुझी सेवा करायची असेल तर ते या मानव जन्मतच ते शक्य होते. म्हणून मलमुत्राचा अतिशया वेदनादायी गर्भवास असला तरी मी तो आनंदाने स्विकारेन कारण तुझे गुण आवडीने मला गाता येतील. मुखने नामस्मरण करून तुझी चरण सेवा करता येईल.

तुकोबांच्या शब्दातील हे गुढज्ञान कळु लागते तेव्हा बुद्धी सतेज होते. आणि ही बुद्धी चंचल अशा मनाला नुसतीच आवर घालत नाही तर बजावते की, हे मना, तु आता सांसारिक मिथ्या गोष्टींकडे फुकाचा धाऊ नकोस तर तर तू सत्य व शाश्वत अशा ज्ञानाचाच वेध घे. कारण मला (बुद्धीला) आता अशा सत्य आणि शाश्वत अशा ज्ञानाचे डोहाळे लागले आहेत. तेव्हा मन म्हणाले, अगं पण हे तुझे डोहाळे पुरवणार तरी कोण? तेव्हा बुद्धी म्हणाली, ज्याने मला हे डोहाळे लावले ते माझे तुकोबाच त्यांच्या अभंगातून माझे सारे डोहाळे परवणार आहेत. त्याची तू अजिबात चिंता करू नकोस. गुमान माझ्या मगे चल. आणि मन बुद्धीचं बोट धरून चालू लागलं पण त्याला शंका होती की, हे तुकोबाराय हीला भेटतील तरी कुठे? आणि त्याला या प्रश्नाचे उत्तर मिळाले की...

**काया वाचा मने । भजे हरिनाम ॥**
**तेथे तुकाराम । सर्वकाळ ॥३॥**

आपुली आपण करा सोडवण या भवसागरातून आपली सुटका करून घ्यायची असेल तर आपल्यालाच प्रयत्न करावे लागतील. ज्या प्रमाणे भूक लागली असता आपल्यालाच अन्न सेवन करावे लागते. आपल्या ऐवजी दुसऱ्याने सेवन केले तर चालत नाही. त्याप्रमाणे कुणीतरी येईल आणि आपली सुटका करेल या भ्रमात राहू नये. हा सद्गुरू किंवा संत आम्हाला मार्ग जरूर दाखवतात पण आचरण मात्र आपल्यालाच करावे लागते एवढं मात्र खरं आहे. हेच तर आम्हाला तुकोबांचनी सांगितलं आहे.

कलयुगात तर या भवसागरातून आपली सुटका करून घेणं फार सोपं आहे. ते म्हणजे नामस्मरण करणे, हरिभजन करणे. पण...इथे 'कळतय पण वळत नाही' अशी आमची अवस्था होते. आणि हे नाम केव्हा सदैव आमच्या मुखात येईल तर ज्याप्रमाणे वाल्याच्या मुखातून राम राम म्हणतांना मरा मरा असे येत होते.

मग नारदांनी त्याला सांगितले की, तू मरा मरा म्हण वाल्या तसे म्हणू लागला त्याच्या मुखातून राम नाम येऊ लागले आणि त्याच्या पापाचं क्षालन होऊन त्याचा उध्दार झाला. त्याप्रमाणे आपण 'मनाला' उलटं करा आपो नाम येईल. अतीचंचल मनाला उलटं करणे याचा अर्थ नामाच्या ठायी त्याला स्थिर करणे होय. एकदा का मन नामाच्या ठायी स्थिर झालं की, अंतःकरणात काया वाचा मने हरिचं भजन सुरू होईल. आणि जिथे असे काया वाचा मने हरिचं भजन होते तिथे सदासर्वकाळ जगद्गुरु तुकाराम महाराजांचा वास असतो हे ध्यानात घ्यावे. आणि मन इंद्रायणीकडे धाव घेऊ लागते. कारण...

**अभंगात न्हाली । माय इंद्रायणी ॥**
**अमृताची वाणी । चिंब झाली ॥४॥**

सगळ्या जगाला इंद्रायणी माय न्हाऊ घालते पण तिला कोण न्हाऊ घालणार? तिलाही न्हाण्याची ईच्छा होते, पण घलणार कोण? माझ्या तुकोबांच्या अभंगाच्या वह्या इंद्रयणीत बुडाल्या तर चमत्कार असा झाला की, या वह्या तसल्या, भिजल्या तर नाहीतच उलट माझ्या तुकोबांच्या अभंगातच माय इंद्रायणी न्हाऊन निघाली आणि इद्रायणी मायच्या स्पर्शाने तुकोबाची 'अभंग' अमृतवाणी चिंब चिंब झाली. तेव्हा इंद्रायणी तिरी संजीवन झालेली माऊली स्मित करू लागली कारण ये हृदयीचे ते हृदयी घातले हेच तर तीला सांगायचे होते ते द्वैतातील अद्वैत दर्शन आज घडत होते. तेरा दिवस उपोषणास बसलेले तुकोबा आत जागे झाले. मनोभावे त्यांनी इंद्रायणी मायला नमस्कार केला आणि...

**मौनात विरले । वैकुंठी निघाले ॥**
**विमानी बैसले । तुका ब्रह्म ॥५॥**

आम्ही जातो आमुच्या गावा । आमुचा राम राम घ्यावा म्हणत मौनात विरले, एकरूप झाले. आता त्यांना ओढ लागली ती पैलतीराची. **आम्ही वैकुंठवासी आलो याची कारणासी। बोलले जे ऋषी साचे वर्ताया॥** घरून निघालेला व्यक्ती कितीही फिरला तरी शेवटी घरीच येतो त्याप्रमाणे वैकुंठातून आमचा उध्दार करण्यासाठी आलेले माझे तुकोबा त्यांच्या स्वगृही म्हणजे वैकुंठी निघाले. त्यांच्या सन्मानार्थ प्रत्यक्ष भागवंतानेच त्यांच्यासाठी विमान पाठवले.

वीणा झंकारली चिपळ्या छुम छुम मंजुळ स्वरात नाद करू लागली. माझे तुकोबा नव्हे नव्हे **तुका ब्रह्म** विमानात विराजमान झाले. नेत्राच्या कडा पाणावल्या, हृदयी हुंदका दाटला आणि माझा तुका...

**आणु रेणिया थोकडा । तुका आकाशा तेवढा ॥**
**झाला तुका आकाश येवढा झाला.**

(लेखकाने ज्या अभंग रचनेचे निरूपण केले आहे ती अभंग रचना त्यांचीच आहे)

**॥ राम कृष्ण हरि ॥**

# समर्थ विचार शलाका

## सवाई : एक मराठी काव्यप्रकार



निमित्त
दिवाकर बुरसे

**रामदास नवमीनिमीत्त समर्थ विचार शलाकेतील 'सवाई' या काव्यप्रकाराचा घेतलेला वेध...**

सवाई हा एक दुर्मिळ काव्यप्रकार समर्थ रामदास स्वामी महाराजांनी प्रथम उपयोगात आणला. सवाई या काव्यप्रकाराचे जनकत्व निःसंशयपणे त्यांच्याकडेच जाते. भक्ती व वीररसातील समाज प्रबोधन करणाऱ्या बहुतेक सवाया स्वतः समर्थांनी, समर्थ संप्रदायातील संत आणि भक्तांनी रचलेल्या आढळतात. इतर संप्रदायांनी, त्यातील संत आणि कवींनी हा प्रकार हाताळलेला दिसत नाही.

समर्थांच्या वेळी भारतभर यावनीराज्य होते. मुसलमान फकीर गावोगाव फिरून मोठमोठ्याने पदे म्हणत धर्मप्रचार करीत, धर्मांतरे करीत. भयभीत हिंदू मात्र गप्प बसून ते चूपचाप सहन करीत असत. त्या काळात धर्मजागरणासाठी समर्थांनी आपल्या सहस्रावधी शिष्यांकरवी या सवायांच्या माध्यमातून महाराष्ट्रभर हिंदू धर्माचा व राष्ट्रधर्माचा प्रसार व प्रचार केला. जनजागृती केली. सवाया अत्यंत आवेशाने म्हणतात. तो आवेश एखाद्या सैन्याच्या अधिकाऱ्याने आपल्या सैन्याला दिलेल्या आज्ञेसारखा असतो. त्यात आत्मविश्वास, आश्वासन, प्रभुत्व, स्फूर्ती, पौरुष, वीरता, भक्ती, समर्पण इ. भाव आणि उदात्त जीवनमूल्ये ठासून भरलेले असतात. सवाईच्या ओवीची पहिली ओळ दोनदा म्हणायची. पुढची प्रत्येक ओळ सव्वावेळा म्हणायची. अशी सवाई म्हणण्याची विशिष्ट पद्धत आहे. यात कल्पना अशी आहे.... राजाची राजसभा भरली आहे. सभामंडपात सिंहासनासमोरील मार्ग रिक्त ठेवून दोन्ही अंगाला आपापल्या योग्यतेनुसार योद्धे व राजमंत्री, निमंत्रित अतिथी बसले आहेत. त्यामागे सामान्य जनता उभी आहे. आता एकेक व्यक्ती राजासमोर येणार आहे. राजासन्मुख येणाऱ्या व्यक्तीच्या नावाने, त्याच्या बिरूदासह, पदव्यांसह द्वारपाल ललकारी देत आहे. येणारी व्यक्ती राजासन्मुख येऊन, आदराने झुकून राजाला अभिवादन करीत आपले निवेदन, म्हणणे, गाऱ्हाणे सादर करीत आहे. त्या ललकाऱ्या, ते निवेदन म्हणजे सवाई. या सवाया राजराजेश्वर रामरायासमोर सादर करण्याची सज्जनगडावर प्रथा आहे. सज्जनगडावर सायंप्रार्थनेनंतर रामरायासमोर रामदासी या सवाया उच्चरवाने, धीरगंभीर आवाजात जेव्हा म्हणतात तेव्हा उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे राहतात. गडावर विशिष्ट क्रमाने सवाया सादर केल्या जातात. प्रथम गणपतीची 'वंदिला गजवदन, सुखसुखाचे सदन। जेणे जाळिला मदन त्याचे अंतर धरा।' ही सवाई होते. नंतर मारुतीची, 'रामदूत वायुसूत भीमगर्भ जुत्पती', त्यानंतर 'नाम श्रीराम सुंदर। ध्याती उमामहेश्वर।' नंतर 'नयनी पाहता हनुमंत। ज्यासी वर्णिती महंत।' ही सवाई म्हटली जाते. पाचवी सवाई समर्थांची. 'श्री समर्थ मुख्यप्राण। सच्चिदानंदाची खाण। जगदोद्धारासी ठाण। मांडिली जेणे।' असा क्रम असतो. पूजनीय श्रीधरस्वामीकृत सवायांचाही त्यात समावेश असतो. प्रत्येक वारासाठी असलेली सवाई त्या त्या दिवशी म्हणतात. शिवाय विठ्ठल, खंडोबा, भवानीमाता, सद्गुरू इ. देवदेवतांच्या सवाया प्रसंगोपात म्हटल्या जातात. शेवटी 'साचा उपदेश देत। भली भली मती देत। समता समबुद्धि देत। कुमतीकु हरत है। ही सवाई म्हणून जोहार म्हणण्याची प्रथा आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची एक सवाई आहे. मात्र हे पद दररोजच्या कथेच्या शेवटी म्हणावयाचे असते. ती प्रार्थना अशी, जय हो महाराज गरीबनवाज। बंदकमीना कहना के तू साहेब तेरीही लाज। हो महाराज॥ मैं सेवक बहु सेवा मांगू। इतना है सब काज। हो महाराज॥ छत्रपती तुम, सेकदार सिव। इतना हमारा अर्ज। हो महाराज॥ हनुमंताच्या दोन वैशिष्ट्यपूर्ण सवाया सद्गुरू समर्थ रामदास स्वामी विरचित मारुतीच्या दोन सवाया पुढे देत आहे. रामदूत वायुसूत भीमगर्भ जुत्पती जो नरात वानरात भक्ति प्रेम वित्पती दासदक्ष स्वामिपक्ष नीजकाजसारथी वीरजोर शीरजोर धक्कधिंग मारुती। म्हणावा जय जय राम॥१॥ वरील सवाई सर्वपरिचित असून सज्जनगडावर रोज संध्याकाळच्या आरतीच्या वेळी म्हटली जाते. ही खालील सवाई संत वाङ्मयच्या 'समर्थांचे समग्र वाङ्मयमधे आढळली, जब हनुमंत जनकदुहिता शुद्ध लेनेकू गभार दौर दौर आये है। तब कंठ गुरगुरगुरीत नेत्र गरगरगरीत रोम थरथरथरीत पुच्छ झारे। तब लंका घरघरघरीत बनमो दरदरदरीत सीता शोक हरत झरझरझरीत बन उफारे। तब कंठ कुचकुचकुचीत ईंद्रजीत चकचकचकीत रावण थकथकथकीत कर नगर ज्यार ज्यार मखमखमखीत दास लियो जय तु राम मिले तब कपि भुःभुःकारे ॥

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**

# आस्थेचा कुंभ





**हिंदू समुदायाचे प्रचंड आध्यात्मिक एकत्रीकरण हा महाकुंभ मेळ्याच्या निमित्ताने जगभर चर्चेत असणारा विषय असला, तरी त्यातील अपघात आणि भाविकांचे जीव गमावण्याच्या घटनाही नोंद घेण्याजोग्या आहेत. इथेच नव्हे, तर रेल्वेरुळांवर, बोगदे बांधकामात, रस्त्यांवर, जल वाहतूक अशा सर्वच ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनासाठी काय करायला हवे, याची चर्चा आवश्यक ठरते.**

नोंद

**शिरीष जोशी**

माणसासाठी आपत्ती नवीन नाहीत. आपत्तीमध्ये होणारी हानी हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. मात्र सध्या माणसाला इजा होते, तेव्हाच त्या घटनेकडे आपत्ती म्हणून बघितले जाते. सध्याच्या महाकुंभ मेळ्यामध्ये घडलेली घटना याचेच उदाहरण. तसेही वर्षभरात कुठे पूर येत असतात, दरडी कोसळत असतात. वळवे लागून जंगले जळत असतात. जगभर हे प्रकार सुरूच असतात. पण माणूस प्रभावित झाल्यानंतरच त्या घटनेला आपण आपत्ती म्हणतो. यंदा प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळ्याचे आयोजन होण्याआधीच त्यासंबंधीच्या बातम्या, सुरू असणारी तयारी बरीच चर्चेत होती.

स्वाभाविकच लोक प्रभावित झाले होते. प्रत्यक्ष ही पर्वणी साधण्यासाठी अपेक्षेपेक्षा अधिक संख्येने लोक तेथे दाखल झाले. ही बाब कुंभमेळ्यामध्येच नव्हे तर अनेक ठिकाणी बघायला मिळते. गिरनार वा दत्ताच्या ठिकाणी होणारी अलोट गर्दी याची उदाहरणे आहेत. केवळ महत्त्वपूर्ण दिवशी वा पर्वातच नव्हे तर अलिकडे एरवीदेखील देवालयांना भेटी देणाऱ्या, तीर्थक्षेत्री गर्दी करणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड वाढली आहे. वेगवेगळ्या सणांच्या निमित्तानेही लोक मोठ्या संख्येने एकत्र येत असतात. खेरीज वेगवेगळ्या संतांचे मेळावे, त्याला होणारी अलोट गर्दी आपण नेहमीच पाहतो. मग त्यातूनच कधी तरी स्वाध्याय परिवाराच्या कार्यक्रमात मागे घडला तसा चेंगराचेंगरीचा प्रसंग समोर येतो. याचे कारण असे की, इतक्या प्रचंड संख्येने लोक येण्याची कल्पना संयोजकांना नसते. जाहिरात, आकर्षण, तिथे त्या वेळी उपस्थित राहण्याची आत्यंतिक इच्छा या सगळ्यापोटी साामान्य माणूस तिथे येतो.

महाकुंभ मेळ्यामध्ये चेंगराचेंगरी झालेल्या दिवशी साधारणपणे १२ कोटी भाविक येतील, असा अंदाज होता. आत्तापर्यंत इतका मोठा जनसमुदाय तिथे कधीच एकत्र आला नव्हता. मागील वर्षी मी स्वत: तेथील व्यवस्था बघण्यासाठी गेलो होतो. गेलो त्या दिवशी संगमावर तीन कोटी भाविकांनी स्नान केले होते. विशेष म्हणजे तेथे सगळ्याची अतिशय उत्तम सोय होती. आताही आधी आठ ते नऊ कोटी भाविक येण्याचा अंदाज असला, तरी १२ कोटी लोक येतील, असे गृहीत धरले होते. त्यानुसार सगळ्या गोष्टी नियंत्रितही केल्या होत्या. मात्र तरीही चेंगराचेंगरी होऊन काहींचे जीव गेले. बरेचदा अशा घटना अफवांमुळे घडतात. पूर्वीदेखील चेन्नईमध्ये त्सुनामीच्या अफवेने वा अलिकडेच रेल्वेच्या डब्यात आग लागल्याच्या अफवेमुळे लोकांनी पटापट उड्या मारल्याने अशा दुर्घटना घडल्या आहेत. घाबरलेल्या प्रवाशांनी कोणताही विचार न करता उड्या मारल्या आणि वेगाने येणाऱ्या रेल्वेखाली काही जण चिरडले गेले. अशा घटना अगदी सेकंदांमध्ये घडतात. मुंबईमधील पूल पडल्याची अफवा आणि झालेल्या चेंगराचेंगरीत गेलेले काही जणांचे जीव हेच सत्य दाखवून देतात. थोडक्यात, असे अपघात समुदायाच्या त्या क्षणाच्या मानसिकतेमुळे घडताना दिसतात. मात्र कालावधी पाच मिनिटांचा असला, तरी होणारे नुकसान प्रचंड असते. आधीच आपल्याकडे सामान्य माणूस गर्दीत एखादी आपत्ती आली, दुर्घटना घडली तर कसे वागायचे हे जाणत नाही. खेरीज तो मानसिकरीत्या आपत्तीला तोंड देण्यासाठी तयारही नसतो. त्यामुळेच १० कोटींची व्यवस्था असताना अचानक दोन कोटी लोक वाढले तर अपघाताची मोठी शक्यता निर्माण होते.

प्रयागराजमध्ये आपत्तीच्या दिवशी एकट्या पुण्यामधून कमीत कमी १०० खासगी वाहने गेली होती. यावरून संपूर्ण देशामधून तेथे किती वाहने आणि भाविक आले असतील, याची कल्पना येऊ शकते. हे सगळे लोक संगमाकडे जाण्याच्या रस्त्यावर होते. त्यामुळेच कधी कधी माणूसच आपत्ती शोधत जातो की काय, असे वाटते. म्हणजे बरेचदा आपत्ती माणसाला शोधत नाही तर माणूसच आपत्तीला शोधतो आणि दुर्घटना घडते. हे टाळण्यासाठी आपण त्या दिवशी त्या ठिकाणी उपस्थित असणे गरजेचे आहे का, तेथे जायला हवे का याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. एक प्रकारे स्वत:ची धार्मिक जागृती करून घेण्याची गरज आहे, असे वाटते. महाकुंभमेळा हा संपूर्ण भारताला एकत्र आणणारा, परस्परांना जोडणारा दुवा आहे. स्वाभाविकच अगदी हिमाचल, अरुणाचल, केरळ अशा विविध ठिकाणांहून माणसे इथे येण्याचा प्रयत्न करत होती. अशाच प्रकारे चारधाम यात्रेसाठीही देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक येत असतात. बाकी सगळ्यात विविधता असली, तरी संस्कृतीचे हे दुवे जपण्यासाठी एकत्र येण्यात मात्र एकता दिसते. त्यातही आर्थिक सुबत्ता वाढल्यामुळे लोकांना प्रवास करणेही सुकर आणि शक्य झाले आहे. त्यामुळेही लोक पर्वणी साधण्याचे नियोजन करतात. मोठ्या गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी सरकार जय्यत तयारी करते. सैन्य दलाची मदत घेतली जाते. स्थानिक पोलिस तैनात असतात. खेरीज आपत्ती व्यवस्थापन करणाऱ्या एनडीआरएफसारख्यांची मदत असते. केंद्राचे रेस्क्यू फोर्स असतात.

यंदा तर प्रयागराजमध्ये वॉटर ॲब्युल्सनही होती. हेलिकॉप्टरद्वारे हवेतून गर्दीवर लक्ष ठेवण्यात येत होते. मात्र इतके सगळे असूनही दुर्घटना घडण्यास एका सेकंदाचा वेळ पुरेसा असतो. एवढ्या काळातही आपत्ती ओढावते आणि मोठा फटका बसतो. आपल्याला माहितीच आहे की, कुंभमेळ्यामध्ये साधू, संन्यासी, उपासक मोठ्या संख्येने सहभागी असतात. त्यांचे काही नेम-नियम असतात. त्यातील काहींना लोकांनी पायाला स्पर्श केलेला, नमस्कार केलेला चालत नाही. पण सामान्य भक्तांना याची जाण नसते. त्यातील काही भावनिकतेमुळे जवळ जातात आणि चूक घडते. अशातच छोट्याशा घटनेमुळेही चेंगराचेंगरी होते आणि गोंधळ उडतो. म्हणूनच सामान्य माणसाने नेहमीच सांगितलेले नियम पाळायला हवेत. स्वत:वर थोडे नियंत्रण ठेवले तर बऱ्याच अप्रिय गोष्टी टाळता येतील. जत्रा, यात्रा वा पर्वणीच्या काळात बाहेरून येणाऱ्यांप्रमाणेच स्थानिक वा पंचक्रोशीतल्या नागरिकांचीही मोठी गर्दी असते. गंगा ही संस्कृतीत मोठे महत्त्व असणारी नदी आहे. तिचे पावित्र्य सर्वश्रुत आहे. तेव्हा यापुढेही विशिष्ट काळात इथे गर्दी होणारच आहे. अर्थातच हे लक्षात घेऊन सरकार पुढच्या काळात १५ ते २० कोटी भाविक येण्याचा अंदाज घेऊनच नियोजन करेल. मात्र यंदाच्या ताज्या आपत्तीचा दोष सरकारवर टाकता येणार नाही. यंदाही प्रयागराजमध्ये उत्तम व्यवस्था आहे. प्रवासी रेल्वेतून उतरल्यानंतर निर्देशित केलेला रस्ता घेतला तर थेट संगमावरच पोहोचेल, अशी व्यवस्था आहे.

स्वाभाविकच शहरात भरकटण्याचा प्रश्नच येत नाही. येतानाही रस्त्यांची व्यवस्था चोख आहे. त्यामुळे प्रत्येक प्रवासी थेट आपापल्या फलाटावरच पोहोचतो. इथे चुकण्याची वा गोंधळ उडण्याची शक्यता जवळपास नाही. म्हणजेच नियम पाळले, दिशादर्शनासाठी लावलेल्या पाट्या वाचल्या तर प्रत्येक भाविक कमीत कमी वेळेत पोहोचून संगमावर स्नान करू शकतो. मात्र नियम पाळले जात नाहीत, तेव्हा आपत्ती ओढावणे स्वाभाविक आहे. आपत्ती विविध मार्गांनी येत असतात. त्यामध्ये कोणीही अडकू शकतो. म्हणूनच अन्य विषयांप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन हा विषयही मुलांना शालेय पातळीपासून शिकवला गेला पाहिजे. यामुळे काय घडल्यानंतर काय करायला हवे, याविषयीची समज वाढेल. यापुढच्या काळात देशाची लोकसंख्या वाढणार आहे. हे लक्षात घेता असे प्रसंग कोठेही घडू शकतात. काही कळतात, काही कळत नाहीत. पण अगदी दोन गुणांसाठी का होईना, याचे शिक्षण दिले गेले तर जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल. अलिकडे शालेय शिक्षणामध्ये 'हायजिन' हा विषय शिकवला जातो. त्याच धर्तीवर याकडे बघायला हवे.



खेरीज गर्दीच्या ठिकाणी काय करु नये, काय खाऊ नये, काय पिऊ नये याविषयीची जागरुकताही वाढायला हवी. सरकार पाट्या लिहून, सूचना देत हे सगळे सांगत असतेच. स्वयंशिस्त असेल तर त्यांचे पालन होऊन असे अपघात टळतील. आधी उल्लेख केल्याप्रमाणे सध्या प्रयागराजमध्ये चोख व्यवस्था आहे. त्यांची टीव्ही रूम पाहूनही आपल्याला आश्चर्य वाटेल. प्रत्येक पोलिसाकडे १०० चौरस फूट जागेची जबाबदारी होती. तो आपल्या भागात कुठे गर्दी होत आहे, कोठे काय सुरू आहे यावर चोख लक्ष ठेवून होता.

आवश्यक वाटल्यास तेथे आणखी मदत पुरविली जात होती. मात्र एका क्षणाने या व्यवस्थेवर पाणी फिरवले. तेव्हा अफवेमुळे घबराट पसरते हे सर्वसामान्यांनी जाणून घ्यायला हवे आणि त्या परिस्थितीत शांत राहण्याचा प्रयत्न करायला हवे. आपण सुरक्षित ठिकाणी असल्यास आहे तेथेच शांत थांबण्याचा नियम पाळला तरी पुढचा अनर्थ टळू शकतो. लोक घाबरून उड्या मारतात, सामानाची फेकाफेकी होते आणि पुढे रेटारेटी करत पुढे जाऊ पाहतात. ही भीती, अडकण्याची भावना आपत्ती घडवून आणते. म्हणूनच आता तरी या चुका टाळायला हव्या.

(लेखक आपत्ती व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या 'मैत्री' या संस्थेमध्ये गेली २५ वर्षे कार्यरत आहेत. त्यांनी संपूर्ण भारतात काम केलेले आहे.)

---

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अवकाशात



**अमेरिका आणि चीनपाठोपाठ आता भारतही एआयच्या क्षेत्रामध्ये पाऊल ठेवत असल्याची बातमी अनेकार्थाने महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल. विशेषत: जगभर 'डिपसीक'चा बोलबाला असताना भारतीयांनी या बदलाचे महत्त्व आणि होणारे परिणाम जाणून घेणे गरजेचे आहे. अर्थातच त्यासाठी पृष्ठभूमी जाणून घेणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांमध्ये एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता हा घटक सर्वसामान्यांच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. तो त्यांची अनेक कामे सोपी, सुलभ करत असल्याने याची उपयुक्तता आणि आवश्यकता सर्वसामान्यांना समजली आहे. दुसरीकडे याविषयीची भीतीही बघायला मिळते. अनेकांचे रोजगार जातील का, हा प्रश्नही वारंवार विचारला जातो. मात्र या भीतीपोटी आता चॅटजीपीटीचा वापर थांबणे शक्य नाही. याद्वारे आपल्याला अत्यंत समर्पक उत्तरे मिळतात. केवळ माहितीच नव्हे तर जोडीला व्हिडीओ, ऑडिओ, प्रतिमा हे सगळेही मिळते. चॅटजीपीटीच्या या तंत्रज्ञानामागे लार्ज लँग्वेज मॉडेल नामक तंत्रज्ञान वापरले जाते. यातील तांत्रिकतेकडे न बघता अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर गुगलचे सर्च इंजिन आणि चॅटजीपीटी यातील फरक लक्षात घेता समजते की, सर्च इंजिनवर आपण आवश्यक ती माहिती पुरविण्याची मागणी नमूद करतो आणि त्यानुसार ते संबंधित माहिती पुरविते. मात्र, चॅटजीपीटी वापरत असणाऱ्या एलएलएमकडून मिळालेल्या माहितीचे स्वरूप शब्द पुरवलेल्या मजकुराचे नसते तर माणसाची नैसर्गिक भाषा अर्थात नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग समजून घेण्याची क्षमता या अत्याधुनिक तंत्रज्ञानात असते. म्हणजेच एखाद्या माणसाला समजतो तसा त्याला विचारलेला प्रश्न समजतो आणि तो समजून माणूस उत्तर देईल, तशा प्रकारे आपल्याजवळ असणाऱ्या माहितीच्या ढिगाऱ्यातून बिनचूक माहिती तो समोर मांडतो. एलएलएमला हे महत्त्व असल्यामुळे तंत्रज्ञानातील नवीन टप्पा अर्थात जनरेटिव्ह एआय असे म्हणतात. नवनिर्मिती करण्याची क्षमता त्याला वेगळे महत्त्व देऊन जाते. थोडक्यात, आपण याला अल्लाउद्दिनचा जादूचा दिवा म्हणू शकतो.**

तंत्रज्ञान

**अतुल कहाते**

आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

असे हे ओपन एआयचे तंत्रज्ञान जगासमोर आणल्यानंतर लोक अक्षरश: चाट पडले होते. कारण आपल्यासमोर असे काही येईल, याची कल्पनाही त्यांनी केली नव्हती. पुढे याच धर्तीवर अल्फाबेट कंपनीचे जेमिनी, फेसबुकच्या मेटा कंपनीचे लामा असे तंत्रज्ञान समोर आले. त्यामुळे या क्षेत्रावर अमेरिकेची मक्तेदारी असल्याचे चित्रही स्पष्ट झाले. ते खरेही होते. या तंत्रज्ञानासाठी माहितीचे मोठमोठे ढीग उपसावे लागतात. त्यासाठी संगणकाची प्रचंड मोठी क्षमता वापरावी लागते.

सर्वसामान्यपणे संगणकाचे काम चालविण्यासाठी सेंट्रल प्रोसेसिंग युनिटचा वापर होतो. तो संगणकाचा मेंदू असतो. मात्र एआयमध्ये हा मेंदू पुरेसा ठरत नाही. म्हणूनच त्यासाठी विशिष्ट प्रकारची चीप वापरली जाते. त्याला ग्राफिकल प्रोसेसिंग युनिट (जीपीयू) असे म्हणतात. हे जीपीयू तयार करणारी अमेरिकेतील 'एनव्हिडिया' ही कंपनी असून तिची या कामात मक्तेदारी आहे. या चीपच्या बळावर सगळी कामे वेगाने केली जातात आणि म्हणूनच हे काम फक्त अमेरिकेतच होऊ शकते, असे समजले जात होते. एआयमधील आपली एकाधिकारशाही टिकविण्यासाठी काही दिवसांपूर्वी अमेरिकेने या चिप्सच्या निर्मितीवर मर्यादा घातल्या होत्या आणि चीनला चीप्सची आयात करता येऊ नये, अशा प्रकारचे नियमही आणले होते. मात्र हे सगळे अडथळे पार करून त्यांच्या 'डिपसीक' या कंपनीने एका वर्षाच्या आत ओपनएआय, जेमिनी, लामा या सगळ्यांसारखे एलएलएम अत्यल्प खर्चामध्ये उभे करून दाखवले. त्याची क्षमता ओपनएआय वा वर उल्लेख केलेल्या कंपन्यांसारखीच आहे. त्यामुळेच चीनकडून पुढे आणल्या गेलेल्या या तंत्रज्ञानाने जगाला मोठा धक्का बसला. याचे जागतिक परिणामही बघायला मिळाले.

अगदी सर्वसामान्य लोकही याचा विनामूल्य वापर करू शकणार असल्याने स्पर्धेला तोंड फुटल्याची भीती व्यक्त केली गेली. कंपन्यांना ओपनएआयचा व्यावसायिक वापर करायचा असेल तर पैसे भरावे लागतात. मेटाचे 'लामा' हे सॉफ्टवेअर मात्र फुकट आहे. त्याला ओपन सोर्स म्हटले जाते.

आता डिपसीक कंपनीचे बाजारात आलेले एलएलएमही ओपन सोर्स असणे हादेखील एक मोठा आणि महत्त्वाचा घटक समजला गेला. त्यामुळेच चॅटजीपीटी वा जेमिनी या कंपन्यांना सॉफ्टवेअरमधून मिळणाऱ्या निधीला धोका पोहोचण्याची भीती वाढली आणि जागतिक पातळीवर त्याचे आर्थिक पडसाद बघायला मिळाले.

या सगळ्या पृष्ठभूमीवर सध्याच्या चर्चेप्रमाणे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) ची निर्मिती भारत नव्याने करणार आहे की, त्यासाठी सध्या उपलब्ध असणारे तंत्रज्ञानच वापरणार, याची स्पष्टता अद्याप आलेली नाही. आहे ते तंत्रज्ञान वापरून भारत या क्षेत्रात उतरणार असेल तर हे इतके मोठे काम वा महत्त्वपूर्ण बाब वाटणार नाही. मात्र भारत नव्याने हे तंत्रज्ञान विकसित करणार असेल आणि भारताशी संबंधित असणाऱ्या गोष्टींसाठी त्याचा उपयोग होणार असेल तर निश्चितच त्याला खूप जास्त महत्त्व आहे. याकडे दोन अंगांनी बघावे लागेल. एक म्हणजे याद्वारे भारताशी संबंधित अचूक माहिती मिळेल. जागतिक पातळीवरील लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रकारचे तपशील तितक्याशा मोठ्या प्रमाणात येत नाहीत. तुलना करायची झाल्यास जगाचा ज्ञानकोश आणि भारताचा ज्ञानकोश यात दिसते तसेच अंतर बघायला मिळेल. पण भारत आपल्यासाठी एआयच्या तंत्रज्ञानाची निर्मिती करेल तेव्हा भारताशी संबंधित सर्व छोटेमोठे तपशील येऊ शकतील. अर्थातच ते स्थानिक व्यापारउदिमसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात.

अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर भारतातील कला, संस्कृती, इतिहास अशा बाबींची माहिती तिथे असेल तर सर्व प्रकारचे व्यवसाय, धंदे त्या अनुषंगाने आपला व्यवसाय पुढे नेऊ शकतात. त्या दृष्टीने सॉफ्टवेअर निर्माण करणे वा अशी कामे ते करु शकतात. भारतात येऊ पाहणाऱ्या विदेशी पर्यटकांनी या चॅटजीपीटीला भारताशी संबंधित प्रश्न विचारले तर अधिक अचूक आणि परिपूर्ण माहिती मिळू शकते. या माध्यमातून ते हवा तेवढा तपशील मिळवू शकतात. भारतीय भाषांचे महत्त्व हादेखील यातील महत्त्वपूर्ण भाग म्हणता येईल.

आताही जॅटजीपीटीला हिंदी, मराठी आदी भाषा कळतात आणि तो या भाषांमध्ये संवाद साधतो. बऱ्यापैकी चांगल्या मराठीत त्याच्याकडून उत्तरेही मिळतात. मात्र आपल्याकडे ही यंत्रणा वा तयार होणाऱ्या तंत्रज्ञानाची क्षमता अर्थातच यापेक्षा कित्येक पट चांगली असेल. भारतासाठीच हा प्रकल्प उभा राहणार असेलतर अधिक विस्ताराने होईल. त्यामध्ये अधिक सखोल विचार केला जाईल. अशा अर्थाने भारतीय भाषांसाठी येऊ घातलेला हा बदल खूप महत्त्वाचा ठरू शकेल.

लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये माहितीचे साठे खूप मोठ्या प्रमाणावर असतात. पण याच्या जोडीला भारतात स्मॉल लँग्वेज मॉडेल्सही तयार होऊ शकतात. ती त्या त्या व्यवसायासाठी, राज्यासाठी वा अगदी गावासाठीही कामी येऊ शकतात, कारण विविध पातळ्यांवर बनवता येऊ शकतात. याला आपण फोकस लँग्वेज मॉडेलही म्हणू शकतो. पण त्याचबरोबर इथे केवळ फोकस माहितीच नव्हे तर, अन्य प्रकारेही कृत्रिम बुद्धिमत्ता मदत करू शकते. जसे की, हे तंत्रज्ञान विशेष मुलांसाठी कशा प्रकारची चित्रे आणि व्हिडीओ असू शकतात, हे बघून त्यानुसार संशोधन समोर मांडेल. थोडक्यात, अशा प्रकारचे अनेक प्रयोग करण्यास मोठा वाव आहे. स्थानिक पातळीपासून देशाच्या पातळीपर्यंत ते राबवता येऊ शकतात. पण त्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. आवश्यक तेवढा निधी आला पाहिजे. विशेष म्हणजे अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठी याचा वापर करून घेता येतो, यासंबंधीची जाण लोकांमध्ये आली पाहिजे. अशा अंगांनी वापरल्यास हे तंत्रज्ञान लक्षणीय बदल घडवून आणू शकेल. एकदा हे साधले की, जागतिक पातळीवरील व्यापारवृद्धीच्या संधी खुल्या होण्यास वेळ लागणार नाही.

